# कार्तिक माहात्म्य

## Contents


अध्याय १ .......... 5
अध्याय २ .......... 7
अध्याय ३ .......... 8
अध्याय ४ .......... 9
अध्याय ५ .......... 10
अध्याय ६ .......... 12
अध्याय ७ .......... 13
अध्याय ८ .......... 14
अध्याय ९ .......... 16
अध्याय १० .......... 17
अध्याय ११ .......... 19
अध्याय १२ .......... 20
अध्याय १३ .......... 21
अध्याय १४ .......... 24
अध्याय १५ .......... 25
अध्याय १६ .......... 27
अध्याय १७ .......... 28
अध्याय १८ .......... 30
अध्याय १९ .......... 31
अध्याय २० .......... 32
अध्याय २१ .......... 34
अध्याय २२ .......... 35
अध्याय २३ .......... 37
अध्याय २४ .......... 38
अध्याय २५ .......... 39
अध्याय २६ .......... 41

अध्याय २७ ........ 43
अध्याय २८ ........ 44
अध्याय २९ ........ 45
अध्याय ३० ........ 46
अध्याय ३१ ........ 48
अध्याय ३२ ........ 50
अध्याय ३३ ........ 51
अध्याय ३४ ........ 55
अध्याय ३५ ........ 56
अध्याय ३६ ........ 60
अध्याय ३७ ........ 62

# अध्याय १

॥ श्रीगणेशायनमः ॥एकदां नारद देवाधिदेव भगवंताच्या दर्शनाकरितां स्वर्गलोकाहून द्वारकेस गेले ॥१॥नंतर भक्तीनें कृष्णाची पूजा करुन कृष्णाला एक पारिजातकाचें फूल देते झाले ॥२॥ कृष्णांनी तें फूल घेऊन रुक्मिणीला दिलें; इतक्यांत नारदांनीं त्वरेनें जाऊन ती सर्व हकीगत सत्यभामेला सांगितली. मग भगवान् कृष्ण सत्यभामेच्या गृहीं गेले तों आपली प्रिया दुःखित होऊन एकीकडे बसली आहे असें त्यांनीं पाहिलें ॥३॥४॥५॥ तेव्हां भगवान् हसून म्हणाले हे प्रिये ! तुला कशापासून दुःख झालें तें मला सांग ॥६॥ तेव्हां रागानें जिचे ओंठ थरथर कांपत आहेत अशी सत्यभामा म्हणाली कीं, पारिजाताचें फूल मला न देतां तुम्हीं रुक्मिणीला कां दिलें ॥७॥ तेव्हां वासुदेव बोलले कीं, तूंही माझी आवडती आहेस. तुलाही मी पारिजाताचें पुष्प देईन; नंतर पारिजात वृक्ष आणण्याकरितां सत्यभामेसहवर्तमान गरुडावर आरोहण करुन स्वर्ग लोकास जाऊन इंद्रास जिंकून तेथील पारिजात वृक्ष उपटून घेऊन द्वारकेस आले आणि सत्यभामेला म्हणाले, हा पारिजात वृक्ष तुल घे; तूंच मला फार प्रिय आहेस ॥८॥९॥१०॥ पुढें एकदां सत्यभामा मुनिश्रेष्ठ नारदाला म्हणाली कीं, हे नारदा, ॥११॥ जेणेंकरुन श्रीकृष्णाचा व माझा केव्हांही वियोग होणार नाहीं असा उपाय मला सांग. तेव्हां नारद सत्यभामेला म्हणाले ॥१२॥ जें दान करावें त्याचाच उपभोग मिळतो; याकरितां कृष्णच दान दे म्हणजे तुझा व त्याचा वियोग कधींच होणार नाहीं ॥१३॥ बरें आहे, असें म्हणून सत्यभामेनें नारदाला कृष्ण दान दिला. नंतर कृष्णास घेऊन निघाले ॥१४॥तेव्हां सत्यभामा नारदास म्हणाली कीं, तूं याच लोकीं मला कृष्णांचा वियोग केलास ॥१५॥ मग परलोकीं त्यांची प्राप्ति कशी होईल ? तेव्हां नारद हसून म्हणाले ॥१६॥ जर तराजूमध्यें श्रीकृष्णास तोलून त्यांचे भारंभार द्रव्य ( सोनें ) मला देशील तर मी ह्याला परत देतों ॥१७॥ तेव्हां सत्यभामेनें घरांतील सर्व जिन्नस डागिने वगैरे वजनांत घातले तरी वजन पुरें होईना ॥१८॥ तेव्हां सत्यभामेनें श्रीकृष्णाच्या आज्ञेनें एक तुलसीपत्र आणून तराजूंत टाकिलें ॥१९॥ व त्या तुलसीपत्राचे बरोबर भक्तवत्सल कृष्णाचें वजन झालें व तेवढें तुलसीपत्रच नारदांनीं घेतलें ॥२०॥ व भगवंताची स्तुति करुन नारद स्वर्गलोकास गेले ॥२१॥ नारद कृष्णास विचारुन गेल्यानंतर आनंदानें जिचे नेत्र प्रफुल्लित झाले आहेत अशी सत्यभामा कृष्णाला म्हणाली, ॥२२॥मी धन्य आहें, कृतकृत्य आहें, माझें जन्म सफल आहे, व माझे जन्मदाते आईबापही धन्य आहेत ॥२३॥ ज्यांनीं मला त्रैलोक्यांत दैववती अशी उत्पन्न केली; कारण तुम्हांला तुमच्या सोळा हजार स्त्रियांमध्यें मीच प्रिय आहे ॥२४॥ म्हणूनच मी भगवान् कल्पवृक्षासह यथाविधि नारदास दान दिला ॥२५॥ पृथ्वीवरील लोक केवळ ज्याची वार्ताही जाणत नाहींत तो प्रत्यक्ष कल्पवृक्ष पारिजात माझे आंगणात आहे ॥२६॥ त्रैलोक्यपति देवाची मी अति प्रिया आहें. म्हणून तुम्हांला थोडें विचारावें अशी इच्छा आहे ॥२७॥ जर तुम्ही माझे प्रियकर असाल तर विस्तारानें सांगा म्हणजे तें मी ऐकून पुन्हां आपलें हित करीन. म्हणजे त्यायोगानें कल्पपर्यंत तुमचा व माझा वियोग होणार नाहीं ॥२८॥ सूत म्हणाले - असें प्रियेचें वाक्य ऐकून कृष्ण हांसले ॥२९॥ व तिचा हात धरुन

कल्पवृक्षाखालीं आले व सेवक लोकांना दूर केलें ॥३०॥ प्रियेच्या अतिप्रीतीनें संतुष्ट होऊन रोमांचित असे भगवान कृष्ण हंसत सत्यभामेस हांक मारुन म्हणाले, ॥३१॥ हे प्रिये, सोळा हजार स्त्रियांमध्यें तूंच एक मला प्राणाप्रमाणें अति प्रिय आहेस ॥३२॥ तुझ्याकरितां इंद्राशीं व सर्व देवांशीं मी विरोध केला ॥ तूं पूर्वी कोणती इच्छा केलीस ती चमत्कारिक गोष्ट ऐक ॥३३॥ सूत म्हणतात - श्रीकृष्ण सत्यभामेची इच्छा पूर्ण करण्याकरितां गरुडावर बसून जेव्हां इंद्र लोकास गेले ॥३४॥ व इंद्रापाशीं कल्पवृक्ष मागितला; तो इंद्र देत नाहीं म्हणाला. तेव्हां गरुड रागावून त्याकरितां युद्ध करुं लागला ॥३५॥ गरुडानें गोलोकीं गाईबरोबरही युद्ध केलें; त्यावेळीं त्याच्या चोंचीनें तुटून गाईचे कान व शेंपूट व रक्त भूमीवर पडलें ॥३६॥ त्या तिहींपासून तीन वस्तु झाल्या; कानापासून तमाखू, शेंपटापासून गोमी ॥३७॥ व रक्तापासून मेंदी झाली; मोक्ष इच्छिणारानें या तिन्ही वस्तु दूर कराव्या सेवन करुं नयेत ॥३८॥ गाईनीं रागानें गरुडास शिंगांनीं प्रहार केला तेव्हां गरुडाची तीन पिसे पृथ्वीवर पडली. एकपासून नीलकंठ भारद्वाज, दुसऱ्यापासून मोर व तिसऱ्यापासून चक्रवाक उत्पन्न झाले ॥३९॥४०॥ या तिहींच्या दर्शनानें शुभ फळ मिळतें; याकरितां ही गोष्ट तुला सांगितली ॥४१॥ गरुडाच्या दर्शनाचें जें फळ तें यांच्या दर्शनानें मनुष्यास मिळतें व वैकुंठ प्राप्त होतो ॥४२॥ हे प्रिये, जें देतां येत नाहीं, करितां येत नाहीं किंवा सांगतां येत नाहीं तें सर्व तुजकरितां मी करितों; तर तुझा प्रश्न कसा सांगणार नाहीं ? ॥४३॥ तुझ्या मनांत असेल तें विचार. सत्य भामा म्हणाली ॥ मीं पूर्वी दान, व्रत किंवा तप काय केलें होतें ॥४४॥ कीं ज्याच्या योगानें मी मनुष्य असून मनुष्यापेक्षां श्रेष्ठ झालें व तुमची अधोगी पत्नी होऊन गरुडावर बसून ॥४५॥ तुमच्या बरोबर इंद्रादिक देवतांच्या स्थानाला जातें ॥ म्हणून विचारतें कीं, पूर्वीं मीं काय पुण्य केलें ? ॥४६॥पूर्वजन्मीं मी कोण होतें, कोणाची कन्या होतें तें सांगा ॥ कृष्ण म्हणतात, चित्त देऊन ऐक. पूर्वजन्मीं तूं काय व्रत केलेंस तें सांगतों. कृतयुगाचे शेवटीं मायापुरीमध्यें ॥४७॥४८॥ अत्रिगोत्री देवशर्मा या नांवाचा ब्राह्मण रहात होता. तो वेदवेदांगें पढलेला असून सूर्याचें व्रत करणारा, अग्नि व अतिथि यांची सेवा करणारा असा होता ॥४९॥ तो नित्य सूर्याची आराधना करणारा असल्याकारणानें प्रत्यक्ष सूर्यासारखा तेजस्वी होता; त्याला वृद्धपणीं गुणवती नावाची मुलगी झाली ॥५०॥ त्याला पुत्र नसल्यामुळें आपले चंद्र नामक शिष्याला ती मुलगी देऊन त्याला मुलाप्रमाणें मानीत होता व तो शिष्यही त्याला बापाप्रमाणें मानी ॥५१॥ ते दोघे कोणे एके दिवशी दर्भ समिधा आणण्याकरितां अरण्यांत गेले व हिमालयाचे पायथ्याचे वनांत इकडे तिकडे फिरुं लागले ॥५२॥ इतक्यांत त्यांनीं भयंकर राक्षस येत आहे असें पाहिलें व भयानें घाबरुन पळण्यास असमर्थ झाले असतां ॥५३॥ त्या दुष्ट यमासारख्या भयंकर राक्षसानें त्या दोघांस ठार मारलें त्या क्षेत्राच्या पुण्यानें व त्यांच्या धर्मशीलपणानें त्यांना माझ्या पार्षदगणांनीं वैकुंठास नेले. त्यांनी आमरण सूर्याची पूजा वगैरे करुन जें पुण्य केलें ॥५४॥५५॥ तेणेंकरुन मी प्रसन्न झालों शंकर, सूर्य, गणपती, विष्णु व देवी यांचे उपासक ॥५६॥ जसें मेघांचें पाणी अखेर समुद्रासच मिळतें त्याप्रमाणें मलाच येऊन मिळतात. मी एकच असून नांवांनीं व कृतीनें पांच प्रकारचा झालों आहें. ॥५७॥ जसें एकाद्या व्यक्तीला [ देवदत्ताला ] त्याचे पुतण्ये, भाचे, नातू, मुलगे वगैरे निरनिराळ्या काका, मामा इत्यादि नांवांनी हाक

मारतात तद्वत् ॥५८॥ पुढें ते दोघे वैकुंठात राहाणारे, विमानांत बसून फिरणारे, माझ्याप्रमाणें रुप धारण करणारे, माझ्याजवळ रहाणारे, दिव्य स्त्रिया व चंदनादि भोग भोगणारे असे झाले ॥५९॥ ॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकम० प्रथमोध्यायः ॥१॥

## अध्याय २

श्रीकृष्ण म्हणतात - त्यानंतर गुणवतीला हे दोघे राक्षसानें मारल्याचें वर्तमान समजलें तेव्हं बाप व पति ह्यांजबद्दल तिला फार दुःख झालें. ती दीनस्वरानें रडूं लागली ॥१॥ गुणवती म्हणाली, अहो पति, अहो बाबा, तुम्हीं मला टाकून कोठें गेला ? तुमच्यावांचून म्यां अनाथ मुलीनें काय करावें ॥२॥ मला घरांत बसणारीला आतां अन्नवस्त्र देऊन प्रेमानें माझें पालन कोण करील ॥३॥ माझें भाग्य, सुख, आशा व जीवित हीं सर्व नष्ट झालीं तरी मी आतां कोणाला शरण जाऊं कीं, जो माझें दुःख निवारण करील ॥४॥ मी कोठें जाऊं, कोठें उभी राहूं व काय करुं ब्रह्मदेवानें निष्ठुरपणानें माझा नाश केला, आतां म्यां गरिबानें कसें जगावें ? ॥५॥ कृष्ण म्हणतात - याप्रमाणें तिनें दुःखित झालेल्या हरिणीप्रमाणें पुष्कळ शोक केला व वाऱ्यानें केळ पडावी तशी ती भूमीवर पडली ॥६॥ पुष्कळ वेळानें पुन्हां उठून तिनें फार शोक केला, याप्रमाणें ती शोकसागरांत बुडून गेली ॥७॥ तिनें घरांतील सर्व जिनसा विकून यथाशक्ति त्या दोघांचें पारलौकिक क्रिया कर्म केलें. ॥८॥ त्या नगरांतच ती जिवंत असून मेल्याप्रमाणे राहूं लागली. इंद्रियें जिंकून खरें व शुद्ध आचरण ठेवून शांतपणानें विष्णूची भक्ति करुं लागली ॥९॥ एकादशीव्रत व कार्तिकमास व्रत हीं दोन व्रतें मरणकालपर्यंत तिनें केलीं ॥१०॥ हे सत्य भामे, हीं दोन व्रतें मला फार प्रिय आहेत. भोग, मुक्ति, पुण्य, पुत्र व संपत्ति देणारीं हीं व्रतें आहेत ॥११॥ कार्तिकमासीं तूळराशीस सूर्य असतां जे प्रातः स्नान करितात ते महापातकी असले तरी मुक्त होतात ॥१२॥ प्रातःस्नान, जागरण, दिवे लावणें व तुलसीची बाग राखणें हीं कृत्यें कार्तिकमासीं जे करितात ते विष्णुमूर्तीच समजावे ॥१३॥ विष्णुदेवालयांत सडा सावरण करुन स्वस्तिकें घालणारे व विष्णूची पूजा करणारे मनुष्य जीवन्मुक्तच आहेत ॥१४॥ याप्रमाणें तीनच दिवस जरी कार्तिक महिन्यांत हें व्रत केलें तरी ते देवांना सुद्धां वंद्य होतात, भग जन्मभर करणारे तर किती पुण्यवान् म्हणून सांगूं ! ॥१५॥ याप्रमाणें ती गुणवती दस्वर्पीं उत्तम रीतीनें व्रत करीत होती. विष्णूचे पूजेमध्यें तिचें भक्तियुक्त अंतः करण नेहमीं निमग्न झालें होतें ॥१६॥ हे प्रिये, एकदां ती ज्वरानें पीडित होऊन कृश झाली असतांही हळूहळू गंगेच्या स्नानास गेली ॥१७॥ गंगेच्या जलांत शिरली तों थंडीमुळें कांपूं लागून विह्वळ झाली असतां आकाशांतून खाली येणारे विमान तिनें पाहिलें ॥१८॥ तें विमान शंखचक्र, गदापद्म, धारण करणाऱ्या विष्णुरुपी दूतांनीं युक्त होते व त्या विमानाचा ध्वज गरुडांकित होता ॥१९॥ त्या विष्णुदूतांनीं तिला विमानांत चढविलें व तिजवर चवऱ्या वारीत अप्सरागणांनीं सेव्यमान अशा तिजला वैकुंठास नेलें ॥२०॥ कार्तिकव्रताच्या पुण्यानें त्या विमानांत अग्नीच्या ज्वाळेप्रमाणें तेजस्वी दिसणारी ती गुणवती मत्सान्निध्य पावली ॥२१॥ नंतर

जेव्हां ब्रह्मादिकदेवांच्या प्रार्थनेमुळें मी पृथ्वीवर आलों तेव्हां माझे सर्व गणही माझ्याबरोबर आले ॥२२॥ हे सत्यभामे, सारे यादव हे माझेच गण आहेत. देवशर्मा नामक तो तुझा पिता हा सत्राजित झाला ॥२३॥ तो चंद्र नामक शिष्य अक्रूर झाला; ती शुभकारक गुणवती तूं आहेस. त्या कार्तिकव्रताच्या पुण्यानें तूं मला आवडती झालीस ॥२४॥ हे प्रिये, विष्णूचे देवळांत तूं पूर्वी तुळसीची बाग केलीस त्या पुण्यानें तुझ्या अंगणांत कल्पवृक्ष आहे ॥२५॥ कार्तिकमासी तूं दीपदान दिलेंस त्या पुण्यानें तुझ्या घरांत मंगलदायक लक्ष्मी स्थिर राहिली आहे ॥२६॥ तूं आपण केलेलें व्रतादिक सर्व पतिस्वरुपी विष्णूला अर्पण केलेंस म्हणून तूं माझी स्त्री झालीस ॥२७॥ तूं पूर्वी मरणकालपर्यंत कार्तिकव्रत केलेंस त्या पुण्यानें तुझा व माझा कधींही वियोग होणार नाहीं ॥२८॥ याप्रमाणें कार्तिकमासीं जे व्रत करतात ते माझे सन्निध येऊन मला तूं जशी प्रिय आहेस तसे तेहि मला संतोषजनक होतात ॥२९॥ मनुष्य हे जरी यज्ञ, दान, तप, व्रत इत्यादिक करितात तथापि त्यांना कार्तिकव्रताच्या पुण्याचा सोळावा हिस्सा देखील फल मिळत नाहीं ॥३०॥ याप्रमाणें कृष्णाच्या मुखांतून पूर्वजन्माची पुण्यकथा ऐकून आनंदित झालेली सत्यभामा त्रिभुवनांला आदिकारण अशा श्रेष्ठ कृष्णाला नमस्कार करुन म्हणाली ॥३१॥ ॥ इति श्रीपद्म० कार्ति० द्वितीयोऽध्यायः ॥२॥

## अध्याय ३

सत्यभामा म्हणते - कलास्वरुपी जो तूं त्या कालाचे सर्व मासादि अवयव तुझेच अंश आहेत, मग सर्व महिन्यांमध्यें कार्तिक मासच कां श्रेष्ठ आहे ॥१॥ तिथींमध्ये एकादशी व मासांमध्यें कार्तिकमास तुम्हांला प्रिय असण्याचें कारण मला सांगा ॥२॥ श्रीकृष्ण म्हणतात - तूंख फार उत्तम विचारलेंस; तुला याविषयीं पृथूचा व नारदाचा संवाद सांगतों. चित्त देऊन ऐक ॥३॥ पूर्वी पृथुराजानें नारदास हेंच विचारिलें; व सर्वज्ञ नारदांनीं कार्तिक श्रेष्ठ असण्याचें कारण सांगितलें ॥४॥ नारद म्हणतात - पूर्वी त्रैलोक्य जिंकण्यास समर्थ असा महापराक्रमी सागराचा पुत्र शंखनांवाचा राक्षस होता ॥५॥ त्यानें देवांस जिंकून स्वर्गातून घालवून दिले व इंद्रादिकांचे सर्व अधिकार हरण केले ॥६॥ नंतर ते सर्व देव त्याच्या भयानें मेरुपर्वताच्या गुहेंत गेले व पुष्कळ वर्षेपर्यंत स्त्रिया व बांधवांसह तेथें दडून राहिले ॥७॥ते देव गुहेंत असतां तो दैत्य विचार करुं लागला ॥८॥ देवांचा पराभव करुन त्यांचे अधिकार मीं जरी हरण केले तरी ते बलवान् दिसतात तेव्हां काय करावें ॥९॥ हं, मी समजलों; देव वेदमंत्रांनीं बलिष्ठ झाले आहेत. तेव्हां वेदमंत्र हरण करावे म्हणजे ते सहज बलहीन होतील ॥१०॥ असा विचार करुन विष्णूला झोंप लागली आहे असें पाहून त्यानें त्वरेनें सत्यलोकाहून ब्रह्मदेवाचे वेद हरण केले ॥११॥ त्यानें नेलेले ते वेद त्याच्या भीतीनें यज्ञमंत्रबीजासह पाण्यांत शिरले ॥१२॥ त्याच्या शोधाकरितां शंखासुर समुद्रांत फिरुं लागला; परंतु एके ठिकाणीं गुप्त असलेले ते वेदमंत्र त्यास दिसले नाहींत ॥१३॥ नंतर ब्रह्मदेव देवांसह पूजादिक साहित्य घेऊन वैकुंठात विष्णूला शरण गेला ॥१४॥ तेथें विष्णूला जागृत करण्याकरितां वाद्यें

वाजविलीं; गायन केलें; सुगंधिक धूप व दीप पुनः पुनः लाविले ॥१५॥ नंतर देवांचे भक्तीनें संतुष्ट झालेले भगवान् जागृत झाले व हजारों सूर्याप्रमाणें तेजस्वी अशा भगवंतांचे त्या सर्वांनीं दर्शन घेतलें ॥१६॥ षोडशोपचारांनी भगवंताची पूजा करुन सर्वांनीं साष्टांग नमस्कार घातले. नंतर देवांना विष्णु बोलले ॥१७॥ विष्णु म्हणाले - हे देवहो, तुमच्या गीतवाद्यादि मंगलांनीं मी संतुष्ट झालों, तुमची इच्छा असेल तें सर्व तुम्हांस देईन ॥१८॥ कार्तिक शुद्ध एकादशीला सूर्योदय होईल तोंपर्यंत कार्तिकमासीं नित्य पहांटे प्रहर रात्र राहिली असतां मंगलवाद्यगीत मजपुढें तुम्हीं केलें, करितां त्याप्रमाणें जे करितील ते मला प्रिय होतील आणि माझेजवळ येतील ॥१९॥२०॥ तुम्ही यथाक्रमानें पाद्य, अर्घ्य, आचमनीय व उदक मला अर्पण केलें. त्याचा गुण अद्भुत आहे. तें तुमच्या सुखास कारण झालें ॥२१॥ शंखासुरानें हरण केलेले वेद उदकांत आहेत. हे देवहो, मी त्या सागरपुत्र शंखासुरास मारुन ते वेद आणतों ॥२२॥ आजपासून प्रत्येक वर्षी कार्तिकमासीं मंत्रबीजासहित वेद उदकामध्यें विश्रांति घेतील ॥२३॥ आजपासून कार्तिकांत मीही जलामध्यें राहीन व तुम्हीही सर्व ऋषींसह माझ्याबरोबर वास करा ॥२४॥ या कार्तिकमासीं जे मनुष्य प्रातः स्नान करितील त्या सर्वांना अवभृथ स्नान केल्याचें फळ मिळेल ॥२५॥ हे इंद्रा, जे मनुष्य नित्य उत्तम कार्तिकव्रत करितील त्यांना अंतकालानंतर तूं वैकुंठाला आणून पोहोंचीव ॥२६॥ तसेंच विघ्नांपासून त्यांचें उत्तम संरक्षण कर. हे वरुणा, तूं त्यांना पुत्रपौत्रादि संतति दे ॥२७॥ कुबेरा, तूं माझे आज्ञेनें त्यांची ऐश्वर्य संपत्ति वाढीव; कारण तो मनुष्य माझें रुप धारण करणारा जीवन्मुक्त आहे ॥२८॥ ज्यानें जन्मापासून मरणकालपर्यंत यथाविधि हें उत्तम व्रत केलें तो तुमच्याही बरोबरीचा आहे ॥२९॥ आज एकादशीला तुम्हीं मला जागृत केलें म्हणून ही तिथि मला फार मान्य व प्रिय आहे ॥३०॥ दानें, तीर्थे, व्रतें व यज्ञ ह्यांनीं स्वर्ग प्राप्त होतो; माझें सान्निध्य मिळत नाहीं. परंतु हे देवहो, ह्या दोन व्रतांनीं माझें सान्निध्य मनुष्याला प्राप्त होतें ॥३१॥ ॥ इति तृतीयोऽध्यायः ॥३॥

## अध्याय ४

नारद म्हणतात - ह्याप्रमाणें भाषण करुन भगवंतांनी मत्स्यरुप धारण केलें व विंध्याचलावर वास करणाऱ्या कश्यप ऋषींच्या अंजुलीत प्रवेश केला ॥१॥ त्या ऋषीनें कृपेनें त्या मत्स्याला आपल्या कमंडलूंत ठेविलें. परंतु कमंडलूंत तो मावेना म्हणून कूपामध्यें ठेविलें ॥२॥ त्या ठिकाणीही मावत नाहीं असें पाहून सरोवरांत ठेविलें. त्या ठिकाणीही तो मावेना म्हणून त्याला समुद्रांत सोडून दिलें. तेथेंही तो मत्स्य अतिशय वाढला ॥३॥ नंतर मत्स्यरुप धारण करणाऱ्या भगवंतांनीं शंखासुराचा वध केला व त्या शंखासुराला हातांत घेऊन बदरीवनामध्यें गमन केलें ॥४॥ त्या ठिकाणीं सर्व ऋषींना बोलावून विष्णु म्हणाले, उदकामध्यें पसरलेले वेद तुम्हीं शोधा ॥५॥ व तुम्ही सागरांतून जोंपर्यंत वेद आणतां तोंपर्यंत मीं सर्व देवगणांसह प्रयागीं रहातों ॥६॥ नारद म्हणतात - नंतर सर्व ऋषींनीं आपल्या तपोबलानें यज्ञ बीजांसहित ते सर्व वेद उदकांतून बाहेर काढिले ॥७॥ तेव्हांपासून ज्या

ज्या ऋषीला जे जे मंत्र मिळाले तो तो त्या त्या मंत्रांचा ऋषि झाला ॥८॥ नंतर सर्व ऋषि मिळून प्रयागीं आले व आणलेले सर्व वेद ब्रह्मदेवासहवर्तमान असलेल्या विष्णूला देते झाले ॥९॥ संपूर्ण वेद मिळालेले पाहून मोठ्या हर्षानें ब्रह्मदेवानें देव ऋषिगणासहवर्तमान अश्वमेध नांवाचा यज्ञ केला ॥१०॥ यज्ञ झाल्यावर देव, गंधर्व, यक्ष, पन्नग, गुह्यक इत्यादिकांनीं भगवंताला साष्टांग नमस्कार करुन प्रार्थना केली कीं ॥११॥ हे जगन्नाथा विष्णो, आमची विज्ञापना ऐका. आम्हीं सांप्रतकाळीं अत्यंत आनंदित झालों आहों ॥१२॥ तरी ह्या ठिकाणीं नष्ट झालेले वेद ब्रह्मदेवाला पुन्हां मिळाले व हे रमापते, तुझ्या कृपेनें आम्हांला यज्ञभाग मिळाले ॥१३॥ म्हणून हें स्थान सर्व पृथ्वीमध्यें श्रेष्ठ, पुण्यवर्धक व तुझ्या कृपेनें भुक्ति व मुक्ति देणारें असें असावें असा आम्हांला वर दे ॥१४॥ त्याचप्रमाणें हा कालही ( कार्तिक मास ) अत्यंत पुण्यकारक, ब्रह्मघ्नादिकांची शुद्धि करणारा व दिलेलें दान अक्षय फल करणारा असावा असा आम्हांला वर दे ॥१५॥ विष्णु म्हणतातः - हे देव हो, हें माझें कार्तिकमासव्रत व तुम्हीं मागितलेले वर हे तुम्हीं म्हणतां त्याप्रमाणें असोत आणि हे ब्रह्मक्षेत्र अतिविख्यात होईल ॥१६॥ सूर्यवंशामध्यें उत्पन्न होणारा भगीरथ राजा ह्या ठिकाणीं गंगा आणील व त्या गंगेचा सूर्यकन्या जी कालिंदी यमुना तिच्याशीं संगम होईल ॥१७॥ आणि ब्रह्मादिक देव माझ्यासहवर्तमान येथें वास करोत व हें स्थळ तीर्थराज नांवाने प्रसिद्ध होईल ॥१८॥ या ठिकाणीं केलेली, दान, तप, व्रत, होम, जप व पूजा वगैरे कर्मे अनंत फल देणारीं होऊन माझें सान्निध्य करणारीं होवोत ॥१९॥ ब्रह्महत्यादिक पापें सप्तजन्मार्जित असलीं तरी सुद्धां या तीर्थाच्या दर्शनानें एका क्षणांत लयाला जावोत ॥२०॥ या ठिकाणीं देहत्याग करणारे लोक माझ्यासन्निध येऊन माझ्या शरिरांत प्रविष्ट होतील व ते पुनः जन्म घेणार नाहींत ॥२१॥ या ठिकाणीं माझ्या समोर पित्याच्या उद्देशानें जे श्राद्ध करतील त्यांचे सर्व पितृगण मत्स्वरुप पावतील ॥२२॥ तसेंच हा काल कार्तिकमास मकरथ सूर्य असतांना स्नान करणाऱ्याचें पाप नाश करणारा पुण्यकारक असा असो ॥२३॥ रवि मकरस्थ असतां माघमासी प्रातः स्नान करणाऱ्यांच्या दर्शनानेंच, सूर्याच्या तेजानें जसा अंधकार नाहींसा होतो त्याप्रमाणें लोकांची पातकें नष्ट होतात ॥२४॥ रवि मकरस्थ असतांना माघमासीं स्नान करणाऱ्यांना मी सलोकत्व, समीपत्व व सारुप्य देतों ॥२५॥ हे ऋषिहो माझें वाक्य श्रवण करा. मी बदरीवनामध्यें सर्वकाल वास करीन ॥२६॥ अन्यक्षेत्रांत दहा वर्षे तपश्चर्या करुन जें फल प्राप्त होतें तें फल बदरिकाश्रमीं एक दिवस तपश्चर्या केल्यानें मिळतें ॥२७॥ जे नर श्रेष्ठ ह्या स्थानाचें दर्शन करितात ते जीवनमुक्त होत. त्यांचेठायीं पाप वसत नाहीं ॥२८॥ नारद म्हणतात - ह्याप्रमाणें देवाधिदेव विष्णु देवांशीं भाषण करुन ब्रह्मदेवासह अंतर्धान पावते झाले व सर्व इंद्रादि देवही त्या ठिकाणी अंशरुपानें राहून आपआपल्या लोकीं गमन करिते झाले ॥२९॥ जो नरश्रेष्ठ ही कथा श्रवण करील किंवा शुद्धांतः करणानें श्रवण करवील त्याला तीर्थराज प्रयागाला व बदरीवनाला जाऊन जें पुण्य प्राप्त होतें तें प्राप्त होईल ॥३०॥ इति चतुर्थोध्यायः ॥४॥

## अध्याय ५

पृथु म्हणतो - हे नारदा, तूं कार्तिक व माघ या मासांच्या व्रतांचें महत्फल सांगितलेंस त्याचप्रमाणें या दोन महिन्यांचा स्नानविधि व नियम ॥१॥ आणि उद्यापनविधि हीं यथाशास्त्र कथन करा नारद म्हणतात - राजा, तूं विष्णूच्या अंशापासून झालेला आहेस ! तुला ठाऊक नाहीं असें कांहीं नाहीं ॥२॥ तथापि या व्रतांचे नियम मजपासून श्रवण कर आश्विन मासाच्या शुक्लैकादशीच्या दिवशीं ॥३॥ कार्तिकमास व्रतास आरंभ करावा आलस्य टाकून प्रहर रात्रीं निरंतर जागृत व्हावें ॥४॥ उदकानें भरलेलें पात्र घेऊन दिवसा किंवा सायंकाळींही कर्णावर यज्ञोपवीत ठेवून आग्नेयी दिशेकडे गांवाच्या बहिः प्रदेशीं गमन करावें ॥५॥ तृणांनीं भूमि आच्छादित करावी; वस्त्रानें मस्तक वेष्टन करावें व नेसावयाचें वस्त्र वर खोंचून उत्तरेकडे तोंड करुन थुंका न टाकतां ॥६॥ मूत्र व पुरीष विधि करावा हा विधि रात्रौ कर्तव्य असेल तर दक्षिणेकडे तोंड करुन करावा नंतर शिश्न धरुन उठावें व मृत्तिका आणि उदक ॥७॥ यांनीं दुर्गंधीचा नाश करणारें शौच करावें मूत्रोत्सर्ग केल्यानंतर शिश्नाचें एकदां मृत्तिकेनें, डाव्या हाताचें तीनदां मृत्तिकांनीं व दोन्ही हातांचें दोनदां मृतिकांनीं शौच करावें ॥८॥ पुरीषोत्सर्ग केल्यानंतर गुदस्थानी पांच मृत्तिकांनीं, डाव्या हाताचें दहा मृत्तिकांनीं व दोन हातांचे सप्तमृत्तिकांनीं शौच करावें. हा शौचनियम गृहस्थांचा सांगितला आहे ह्याच्या दुप्पट ब्रह्मचाऱ्यानें ॥९॥ व तिप्पट वानप्रस्थानें आणि चौपट संन्याशांनीं करावें जें मृत्तिका शौच दिवा करावें म्हणून सांगितलें त्याच्या निम्मे हिश्शानें रात्रीं शौच करावें ॥!०॥रोग्यानें याच्या निमपट व मार्गस्थ असेल तर त्याच्याही निमपट करावें याप्रमाणें शौचविधि न केल्यास त्याच्या सर्व धर्मक्रिया निष्फळ होतात ॥११॥ मुखशुद्धि केल्यावांचून म्हटलेले मंत्र फलदायक होत नाहींत, म्हणून दंत व जिव्हा यांची प्रयत्नेंकरुन शुद्धि करावी ॥१२॥ हे वनस्पती ! आयुष्य, बल, यश, कांति, प्रजा, द्रव्य, ब्रह्मज्ञान, सारासार ज्ञान व धारणाशक्ति हीं आम्हांला दे ॥१३॥ हा मंत्र म्हणून गृहस्थानें बारा अंगुल प्रमाणाचें क्षीरवृक्षाचें काष्ठ घेऊन श्राद्धतिथी व उपोषण यांखेरीज अन्य दिवशीं दंतधावन करावें ॥१४॥ प्रतिपदा, अमावास्या, नवमी, षष्ठी, रविवार, चंद्रग्रहण व सूर्यग्रहण या दिवशीं दंतधावन करुं नये ॥१५॥ कंटकीवृक्ष, कापूस, निर्गुडी, पळस, वड, एरंड व दुर्गन्धी वृक्षाच्या काष्ठांनीं दंतधावन करुं नये ॥१६॥ शौचविधि व स्नानविधि झाल्यानंतर विष्णूच्या किंवा शिवाच्या मंदिरांत जावें व गंध, पुष्प, तांबूलादिक पूजा उपचार घेऊन भक्तियुक्त होत्साता ॥१७॥ विष्णूची पाद्यादिक उपचारांनीं पूजा करुन स्तुति करावी. नमस्कार करावा व गीत वाद्यादि मंगल करावें ॥१८॥ टाळ, वेणू, मृदंग इत्यादिक वाजवून नृत्य करावें; गायकादिकांचाही गंध, पुष्प, तांबूल इत्यादिकांनीं सत्कार करावा ॥१९॥ कृतत्रेतादि युगांमध्यें तप, यज्ञ, दान हीं भगवंताला तोषदायक होतात ॥२०॥ व कलीमध्यें भक्तियुक्त गायनानें भगवान् संतुष्ट होतो म्हणून देवापुढें गायन करणारे विष्णुरुप समजून त्यांची पूजा करावी ॥२१॥ नारद म्हणतातः-- हे पृथो, तूं कोठें राहतोस असें मी भगवंताला विचारिलें असतां माझ्या भक्तीनें तुष्ट झालेले विष्णु मला म्हणाले कीं, मीं वैकुंठामध्यें तसा रहात नाहीं किंवा योग्यांच्या हदयांत वास करीन नाहीं अथवा सूर्यामध्येंही रहात नाहीं पण माझे भक्त ज्या ठिकाणीं गायन करतात तेथें मी राहतों ॥२२॥ त्यांची गंधपुष्पादिकांनीं पूजा केली असतां मला जो आनंद होतो तो माझ्या स्वतःच्या पूजनानें मला

होत नाहीं ॥२३॥ माझ्या पुराण कथा व माझ्या भक्तांचे गायन श्रवण करुन जे मूर्ख निंदा करितात त्यांचा मी द्वेष करितों ॥२४॥ लक्ष्मीची इच्छा करणारांनीं शिरीष, धोत्रा, गोकर्ण, मल्लिका, शाल्मली, रुई व कणेर या पुष्पांनीं व अक्षतांनीं विष्णूची पूजा करुं नये ॥२५॥ जास्वंद, कुंद, शिरीष, जुई, मालती व केतकी हीं फुलें शंकरास वाहूं नयेत ॥२६॥ गणेशाला तुलसीपत्रें वाहूं नयेत व दुर्गेला दूर्वा वाहूं नयेत. तसेंच अगस्त्याचीं फुलें सूर्याला वाहूं नयेत ॥२७॥ याहून व्यतिरिक्त फुलें देवांना वाहण्याला पूजेमध्ये प्रशस्त आहेत. याप्रमाणें पूजाविधि करुन पुढील " मंत्रहीनं " या मंत्रांनीं देवाची क्षमा मागावी ॥२८॥ हे देवा, मंत्राशिवाय, क्रियेशिवाय व भक्तीखेरीज जी मीं पूजा केली ती तुझ्या कृपेनें परिपूर्ण असो ॥२९॥अशी प्रार्थना करुन देवाला प्रदक्षिणा घालाव्या, व साष्टांग नमस्कार करुन पुन्हा देवाची क्षमा मागावी व गायनादि उपचार समाप्त करावेत ॥३०॥ याप्रमाणे कार्तिकमासीं पहांटे विष्णूचें अथवा शिवाचें पूजन जे मनुष्य उत्तम प्रकारें करितात ते निष्पाप होत्साते आपल्या पूर्वजांसहवर्तमान वैकुंठलोकाला गमन करितात ॥३१॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये कृष्णसत्यभामासंवादे कार्तिकव्रतकथनं नाम पंचमोऽध्यायः ॥५॥

## अध्याय ६

नारद म्हणतातः-- दोन घटकाभर रात्र शिल्लक असतांना पहांटेस शुचि असा तिल, दर्भ, अक्षता इत्यादिकांनीं युक्त होऊन जलाशयाचे ठायीं स्नानाकरितां गमन करावें ॥१॥ देवखात, नदी व संगम ह्या ठिकाणीं स्नान केलें असतां अनुक्रमेंकरुन, उत्तरोत्तर दसपट पुण्य प्राप्त होतें व तीर्थामध्यें स्नान केलें असतां वीसपट फल प्राप्त होतें ॥२॥ नंतर विष्णूचें स्मरण करुन स्नानाचा संकल्प करावा आणि तीर्थादि देवतांना अर्घ्यदान करावें ॥३॥ ' नमः कमलनाभाय ' या मंत्रानें विष्णूला अर्घ्य द्यावें ॥४॥ हे विष्णो, तूं वैकुंठ, प्रयाग व बदरिकाश्रम या तीन ठिकाणीं आपलें पदस्थान केलें आहेस; तेथील संपूर्ण देव, मुनि, वेद व यज्ञ यांसह तुझ्या प्रीतीकरितां मी कार्तिकमासीं प्रातः स्नान करितों हे दामोदरा, लक्ष्मीसहवर्तमान तूं प्रसन्न हो ॥७॥ हे देवा, तुझें ध्यान व तुला नमस्कार करुन या जलामध्यें मी स्नान करण्याला तयार झालों आहें; तरी तुझ्या प्रसादानें माझें पाप नष्ट होवो ॥८॥ विधियुक्त कार्तिकस्नान करणारा असा व्रती मी अर्घ्य देतों. तो राधा दामोदरा ग्रहण कर ॥९॥ कार्तिकांत नित्यनैमित्तिक कर्में केलीं असतां सर्व पातकें जातात तर दैत्यनाशका विष्णो माझा अर्घ्य ग्रहण कर ॥१०॥ असे दोन अर्घ्य देऊन भागीरथी, विष्णु, शिव व सूर्य यांचें स्मरण करुन नाभीइतक्या पाण्यांत प्रवेश करुन यथाविधि स्नान करावें ॥११॥ गृहस्थाश्रम्यांनीं तीळ व आंवळकाठीचा कल्क आंगाला लावून स्नान करावें. विधवा व यती यांनीं तुलसीमूलाची माती अंगाला लावून स्नान करावें ॥१२॥सप्तमी, अमावास्या, नवमी, द्वितीया, दशमी, एकादशी, द्वादशी व त्रयोदशी या दिवशीं तीळ व आंवळे आंगाला लावूं नयेत ॥१३॥ प्रथम तीन बुड्यांनीं मलस्नान करावें. नंतर मंत्रस्नान करावें. स्त्रिया व शूद्र यांनीं वेदोक्त मंत्र म्हणूं नयेत व त्यांनीं पुराणोक्त मंत्रांनीं स्नान करावें ॥१४॥

स्नानमंत्रः-- जो भक्तभावन परमेश्वर देवकार्याकरितां तीन रुपांनीं झाला तो सर्व पाप नाश करणारा विष्णु कृपेनें मला पवित्र करो ॥१५॥ सर्व देव विष्णूच्या आज्ञेनें कार्तिकव्रत करणारांचें रक्षण करितात; ते सर्व इंद्रादि देव मला पवित्र करोत ॥१६॥ समख सबीज सरहस्य वेदमंत्र, देव, काश्यपादि ऋषि मला पवित्र करोत ॥१७॥ गंगादि सर्व नद्या, पुष्करादि सर्व तीर्थे, सिंधु आदि नद, सप्तसागरांसह सर्व जलाशय मला पवित्र करोत ॥१८॥अदिति इत्यादि पतिव्रता, यक्ष, सिद्ध, पन्नग, ओषधी व पर्वत हे तीन लोकांतले सर्व मला पवित्र करोत ॥१९॥ व्रती यानें या मंत्रांनीं स्नान करुन हातांत पवित्रक धारण करुन देव, ऋषि, मानव आणि पितर यांचें यथाविधि तर्पण करावें ॥२०॥ कार्तिकमासीं जितके तीळ पितृतर्पणकाळीं असतात तितकीं वर्षेपर्यंत स्वर्गामध्यें पितर वास करितात ॥२१॥ नंतर उदकाशयामधून बाहेर येऊन शुद्ध वस्त्र परिधान करुन प्रातःकालीं करावयास सांगितलेलीं सर्व संध्यादि कृत्यें करुन श्रीहरीची पूजा करावी ॥२२॥ नंतर तीर्थादि देवतांचें स्मरण करुन पुनः भक्तियुक्त अंतः करणानें गंध पुष्प अक्षतांनीं युक्त असें अर्घ्य ॥२३॥ 'व्रतिनः' या मंत्रानें विष्णूला समर्पण करावें ॥२४॥ नंतर वेदामध्यें पारंगत अशा ब्राह्मणांची भक्तीनें गंध, पुष्प, तांबूल इत्यादिकांनीं पूजा करुन वारंवार नमस्कार करावा ॥२५॥ ब्राह्मणांच्या उजव्या पायाचे ठिकाणीं सर्व तीर्थे वास करितात, सर्व वेद मुखाच्या ठायीं वास करितात आणि सर्वांगांत देव वास करितात म्हणून ब्राह्मणांची पूजा केली असतां या सर्वांचें पूजन केल्याप्रमाणें होतें ॥२६॥ कल्याण इच्छिणाऱ्या मनुष्यानें ब्राह्मणांचा अवमान करुं नये आणि त्यांशीं विरोध करुं नये; कारण ते अव्यक्तरुप भगवान् विष्णूचींच स्वरुपें होत ॥२७॥ नंतर भगवंताला प्रिय जी तुलसी तिची पूजा करावी. एकाग्र अंतः करणानें प्रदक्षिणा व नमस्कार करावेत ॥२८॥ हे तुलसी, तुला सर्व देवांनीं निर्माण केलें, सर्व मुनींनीं तूं पूजित आहेस. हे विष्णुप्रिये तुलसी ! तुला नमस्कार असो; तूं माझें पातक हरण कर ॥२९॥ नंतर पुराणांतील विष्णुकथा स्वस्थ अंतः करणानें श्रवण कराव्यात पुनः त्या ब्राह्मणांची भक्तीनें पूजा करावी ॥३०॥ याप्रमाणे सर्व व्रतविधि जो भक्तिमान् मनुष्य करतो तो नारायणाच्या लोकाला पावतो ॥३१॥ या लोकीं विष्णूला प्रिय अशा कार्तिक व्रताशिवाय रोग व पातकांचें नाशक, सदबुद्धि देणारें, मुक्तीला कारण असें कोणतेंही व्रत नाहीं ॥३२॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमा० षष्ठोऽध्यायः ॥६॥

## अध्याय ७

नारद म्हणतात-- हे महाराजा, कार्तिकव्रत करणारांचे जे नियम सांगितले ते तुला थोडक्यांत सांगतों श्रवण कर ॥१॥ सर्व आमिषें, मांस, मध, कांजी, मोहऱ्या, भांग इत्यादि मादक पदार्थकार्तिकव्रत करणारांनीं सेवन करुं नयेत ॥२॥ परान्न घेऊं नये, दुसऱ्याचा द्रोह करुं नये, तीर्थयात्रेशिवाय इतरत्र जाऊं नये ॥३॥ देव, वेद, ब्राह्मण, गुरु, गाय, व्रती, स्त्रिया, राजे, मोठे लोक यांची निंदा कार्तिकव्रत करणारांनीं करुं नये ॥४॥ द्विदल डाळी, तिळ तेल, विकत घेतलेलें शिजलेलें अन्न, ज्याची उत्पत्ती वाईट तें, ज्याचें नांव वाईट तें अन्न, हीं कार्तिकांत वर्ज्य

करावीं ॥५॥ प्राण्याचे नखकेस इत्यादि अंग, चुना, फळांत इडलिंबू, धान्यांत मसुरा व शिळें अन्न हीं आमिष म्हणजे मांसतुल्य आहेत ॥६॥ शेळी, गाय, म्हैस यांशिवाय इतरांचें दूध आमिष आहे व ब्राह्मणांनीं विकलेलें तूप, तेल, मीठ इत्यादि सर्व रस, जमिनीपासून झालेलें मीठ, तांब्याचे भांड्यांतील पंचगव्य व डबक्यांतील पाणी व आपणाकरितांच केलेलें अन्न हीं सर्व आमिषें आहेत; तीं वर्ज्य करावींत ॥७॥८॥ ब्रह्मचर्य, जमिनीवर शय्या, पत्रावळीवर जेवणें व चवथ्या प्रहरीं अन्नभक्षण याप्रमाणे व्रत करावें ॥९॥ नरकचतुर्दशीला अंगास तेल लावून स्नान करावें. कार्तिकांत अन्य दिवशीं अंगास तेल लावूं नये ॥१०॥ कांदा, वांगें, मोडाचें धान्य, छत्रीचें झाड, तांबडा कांदा, नालिका, मुळा हीं कार्तिकांत वर्ज्य करावीं ॥११॥ दुध्या भोपळा, वांगें, कोहळा, रिंगणी, डोरलीं, भोंकर, कवठ हीं विष्णुव्रत करणारांनें सोडावीं ॥१२॥ व्रत करणारानें विटाळशी, अतिशूद्र, यवन, जातींतून बाहेर टाकलेला, अव्रती, ब्राह्मणद्वेष्टा व वेद न मानणारा यांशीं भाषण करूं नये ॥१३॥ यांनीं पाहिलेलें अन्न, कावळ्यानें पाहिलेलें व सोईराघरचें अन्न, दोनदां शिजवलेलें मोदक वगैरे व करपलेलें अन्न व्रत करणारानें खाऊं नये ॥१४॥ अंगास तेल लावणें, गादीवर निजणें, बहुतांचें अन्न, काशाचे भांड्यांत भोजन, हीं कार्तिकांत वर्ज्य केलीं असतां व्रत पूर्ण होतें ॥१५॥ इतर व्रत करणारांनीं सर्व व्रतांत हीं वर्ज्य करावीं; विष्णूच्या प्रीतीकरितां कृच्छ्रादिक यथाशक्ति प्रायश्चित्तें करावीं ॥१६॥ प्रतिपदेपासून क्रमानें कोहळा, डोरलें, मीठ, तीळ, आंबट, बेलफळ, कलिंगड, आंवळा, नारळ, भोंपळा, पडवळ, वाल, मसुरा, चवळी, या भाज्या व स्त्रीगमन सोडावें ॥१७॥१८॥ रविवारी नेहमी आंवळा सोडावा ॥१९॥ याशिवाय दुसरें कांहीं सोडलें तर तो पदार्थ ब्राह्मणास दान देऊन नंतर भक्षावा ॥२०॥ याप्रमाणें माघ महिन्यांतही नियम करावे व प्रबोधसमयीं सांगितल्याप्रमाणें हरिजागर करावा ॥२१॥ यथाविधी कार्तिकव्रत करणाऱ्या मनुष्यास पाहून यमदूत, जसे हत्ती सिंहाला भिऊन पळतात तसे पळतात ॥२२॥ यज्ञ करणारापेक्षां कार्तिकव्रत करणारा श्रेष्ठ आहे; यज्ञापासून स्वर्ग मिळतो व कार्तिकव्रत करणारा वैकुंठास जातो ॥२३॥ भोग व मुक्ति देणारी व्रतें व पृथ्वीवरील सर्व क्षेत्रें कार्तिकव्रत करणाराचे शरीरांत रहातात ॥२४॥ दुःस्वप्न किंवा मन, वाचा, शरीर यांजकडून झालेलें कोणतेही पाप हीं कार्तिकव्रत करणाराचे दर्शनानें तत्काल नाहींशीं होतात ॥२५॥ जसे सेवक राजाचें रक्षण करितात तसें कार्तिकव्रत करणाराचें रक्षण इंद्रादिक देव विष्णूचे आज्ञेनें प्रेरित होत्साते करितात ॥२६॥ विष्णुव्रत करणारा जेथें जातो व जेथें त्याचें पूजन होतें तेथें भूत, ग्रह, पिशाच्च रहाणारच नाहींत ॥२७॥ यथोक्त कार्तिकव्रत करणाराचें पुण्य वर्णन करण्यास चार मुखांचा ब्रह्मदेवही समर्थ होत नाहीं ॥२८॥ विष्णूचें हें कार्तिकव्रत सर्व पापें नाहीसें करणारें; सुपुत्र, नातू, धन व धान्य यांची वृद्धि करणारें असें आहे हें नियमयुक्त कार्तिकव्रत करणाराला तीर्थें हिंडत जाण्याचें व तीर्थसेवा करण्याचें कारण नाहीं ॥२९॥ इति श्रीपद्मपु० उ० कार्तिकमाहात्म्ये सप्तमोऽध्यायः ॥७॥

## अध्याय ८

नारद म्हणाले -- हे राजा, मीं आतां कार्तिकव्रताचा उद्यापनविधी सविधान संक्षेपानें सांगतों तो श्रवण कर ॥१॥ व्रत करणारानें कार्तिकशुद्धचतुर्दशीला व्रताची संपूर्णता होण्याकरितां व विष्णूच्या प्रीतीकरितां उद्यापन करावें ॥२॥ तुलसी वृंदानवनावर मंडप घालावा; त्याला चार द्वारें ठेवावीं व तो तोरणें, फुलें चवऱ्या यांनीं सुशोभित करावा ॥३॥ चार द्वारांत मातीचे द्वारपाळ पुण्यशील, सुशील, जय व विजय असे करावे व त्यांची पूजा करावी ॥४॥तुळसीच्या खालीं चार रंगांनीं सुशोभित असें सर्वतोभद्र काढावें ॥५॥ त्यावर पंचरत्नांनीं युक्त व नारळासहित असा शुभ कलश ठेवावा ॥६॥ त्यावर शंख, चक्र, गदा व पद्म यांतें धारण करणारा पीतांवरधारी विष्णु याची लक्ष्मीसह पूजा करावी ॥७॥ व्रत करणारानें इंद्रादिक लोकपालांची त्या मंडलावर पूजा करावी भगवान् द्वादशीला जागे झाले, त्रयोदशीचे दिवशीं सर्व देवांनीं भगवंताचें दर्शन घेतलें व चतुर्दशीचे दिवशी पूजन केलें ॥८॥ म्हणून या कार्तिक शुद्ध चतुर्दशीचे दिवशीं उपोषण करुन शांत व एकाग्र अंतः करणानें राधादामोदराचें पूजन करावें ॥९॥ सोन्याची विष्णुप्रतिमा करुन गुरुच्या आज्ञेनें व नाना प्रकारच्या भक्ष्यादि पदार्थांनी युक्त षोडशोपचारांनीं पूजा करावी ॥१०॥ रात्रीं गायन करुन व वाद्यें वाजवून जागरण करावें व सकाळीं उठून नित्यकर्मे करावी ॥११॥ नंतर होम करुन ब्राह्मणभोजन घालावें व त्यांना यथाशक्ति दक्षिणा द्यावी, कृपणपणा करुं नये ॥१२॥ याप्रमाणें वैकुंठचतुर्दशी करणाराला व या दिवशीं नुसतें उपोषण करणारालाही वैकुंठ प्राप्त होतें ॥१३॥ या वैकुंठचतुर्दशीपर्वणीचें माहात्म्य देव व शेष शंभर वर्षे देखील वर्णन करुं शकणार नाहींत ॥१४॥ वैकुंठचतुर्दशीला हरिजागरामध्यें जे भक्तीनें गायन करितात ते मागील शंभर जन्मांचे पातकापासून मुक्त होतात ॥१५॥ विष्णुजागरामध्यें जे गातात, नाचतात त्यांचें पुण्य हजार गाई दान करणारांचे पुण्यासारखें सांगितलें आहे ॥१६॥ जो वासुदेवापुढें गाऊन नाचून मौज दाखवील व असें रात्रीं जागरण करील ॥१७॥ व विष्णूच्या कथा सांगून विष्णुभक्तांचें मनरंजन करील त्याला त्याचें पुण्यफळ विष्णु आपले लोकास नेऊन सालोक्यताही देईल ॥१८॥ इतर भाषणें सोडून तोंडानें वाद्य वाजवितो, याप्रमाणें नित्य जो हरिजागर करील त्याला दररोज कोटितीर्थांचें पुण्य मिळे ल ॥१९॥ पौर्णिमेला तीस दंपत्यें अगर शक्तीप्रमाणें निदान एका तरी सपत्नीक ब्राह्मणास भोजन घालावें ॥२०॥ या दिवशीं विष्णूंनीं मत्स्यरुप धरुन वर दिले म्हणून या दिवशीं जप, होम, दान इत्यादि केलेलें कर्म अक्षय्य फल देणारें होतें ॥२१॥ म्हणून ब्राह्मणाला खीर आदि अन्न घालून भोजन द्यावें व ' अतोदेवा ' या मंत्रानें तीळ व क्षीर यांचा होम करावा ॥२२॥ विष्णूच्या प्रीतीकरितां व इतर देवांप्रीत्यर्थ ब्राह्मणांना यथाशक्ति दक्षिणा द्यावी व नमस्कार करावा ॥२३॥ पुन्हां विष्णूची, देवांची व तुळशीची पूजा करुन कपिला गाईची यथाविधि पूजा करावी ॥२४॥ व्रताचा उपदेश करणाऱ्या गुरुची त्याचे पत्नीसह वस्त्रालंकारांनीं पूजा करावी व त्या सर्व ब्राह्मणांची प्रार्थना करावी ॥२५॥ प्रार्थना मंत्र - हे द्विजहो, आपल्या कृपेनें विष्णु मला सदा प्रसन्न असोत व या व्रतापासून माझ्या सात जन्मांचें पाप नाहींसें व्हावें व माझी संतती स्थिर व्हावी व माझे मनोरथ सफळ व्हावे व देहाचा अंत झाल्यावर दुर्लभ जें विष्णूचें स्थान तें प्राप्त व्हावें ॥२६॥२७॥२८॥ याप्रमाणें गुरुची व ब्राह्मणांची प्रार्थना करुन त्यांना संतुष्ट करुन पाठवावे. ती पूजा व गोप्रदान

गुरुला द्यावें ॥२९॥ नंतर आपले मित्रांसह भोजन करावें. कार्तिक व माघ यांच्या व्रताचा व उद्यापनाचा असाच विधि आहे ॥३०॥ याप्रमाणें जो कार्तिकव्रत करील त्याची सर्व पापें जाऊन मनोरथ पूर्ण होऊन तो विष्णूच्या सन्निध जाईल ॥३१॥ सर्व व्रतें, सर्व दानें व सर्व तीर्थे यांचें जें फल आहे त्याचे कोटिपट फल या कार्तिकव्रतानें मिळतें ॥३२॥ जे विष्णूचे भक्तींत निमग्न होऊन कार्तिकव्रत करितात ते धन्य, ते पूज्य व त्यांचेंच जन्म सफळ झालें ॥३३॥ जो कार्तिकव्रत करण्याचा संकल्प करितो त्याचीं देहांतील सर्व पातकें भीतीनें कांपूं लागतात; यानें कार्तिकव्रत केलें तर आम्ही कोठें जावें असें त्यांना भय होतें ॥३४॥ याप्रमाणे हे कार्तिकव्रताचे नियम जो ऐकतो व विष्णु भक्तांपुढें भक्तीनें सांगतो त्या दोघांना सर्व पापांचा नाश करणारे व्रत नियम केल्याचें फळ मिळतें ॥३५॥ इति श्रीपद्मपु० कार्तिकमा० अष्टमोऽध्यायः ॥८॥

## अध्याय ९

पृथु म्हणतात - हे नारदा, आपण कार्तिकाचें व्रत विस्तारानें सांगितलें. त्यांत श्रीविष्णूची पूजा तुळशीचे खालीं करावी म्हणून सांगितलें ॥१॥ याकरितां तुलसीचें माहात्म्य इतकें काय व ती देवांचा देव जो विष्णू त्याला इतकी अति प्रिय कशी झाली हें आपण मला सांगा ॥२॥ हे नारदा, तुळशी कशी उत्पन्न झाली व कोठें झाली तेंही सांगा. ॥३॥ नारद म्हणाले - राजा, सावधान चित्तानें ऐक. तुलशीचें माहात्म्य व त्यासंबंधाची पूर्वीची हकीकत तुला सर्व सांगतो ऐक ॥४॥ पूर्वी एकदां इंद्र देव व अप्सरा यांसहवर्तमान शंकराच्या दर्शनाकरितां कैलासास गेला ॥५॥ जों शंकराच्या घराजवळ जातो तों तेथें ज्याचें तोंड भयंकर व दाढा अक्राळविक्राळ असा एक महापराक्रमी पुरुष त्यानें पाहिला ॥६॥ इंद्रानें त्याला विचारिलें कीं, अहो आपण कोण ? शंकर कोठें गेले ? याप्रमाणें पुनः पुनः विचारिलें तरी तो कांहीं बोलला नाहीं ॥७॥ तेव्हां इंद्र रागावून त्याची निर्भर्त्सना करुन म्हणाला, अरे मूर्खा, मी किती विचारतों तरी तूं उत्तर देत नाहींस ॥८॥ तर मी तुला वज्रानें मारितों. तुझा त्राता कोण आहे पाहूं ! असें म्हणून इंद्रानें त्याला वज्र मारिले ॥९॥ तेणेंकरुन त्याचा कठ निळा झाला व वज्राचें भस्म झालें. नंतर शंकर आपल्या तेजानें सर्वांस जाळतात कीं काय असे लाल झाले ॥१०॥ तें पाहून बृहस्पति हात जोडून त्वरेनें पुढें आला व इंद्रालाही साष्टांग नमस्कार करण्यास लाविलें व स्तवन करुं लागला ॥११॥ बृहस्पति म्हणतात - हे शंकरा, तूं देवाधिदेव, त्र्यंबक, कपर्दी, त्रिपुरासुराला मारणारा, शर्व, अंधकाला मारणारा, विरुप, सुरुप, बहुरुप, शंभु दक्षयज्ञाचा नाश करणारा, सर्व यज्ञाचें फल देणारा, कालांचा नाश करणारा, कालरुप, सर्प धारण करणारा, ब्रह्मदेवाचें शिर हरण करणारा, ब्राह्मणाचा दयाळू असा आहे; अशा तुला नमस्कार असो ॥१२॥१३॥१४॥ नारद म्हणतात - याप्रमाणें बृहस्पतीनें स्तवन केलेले शंकर त्रैलोक्याला जाळणारी नेत्रांतील अग्निज्वाळा आवरुन म्हणाले ॥१५॥ हे गुरो, तुझ्या स्तुतीनें मी प्रसन्न झालों, वर माग. तूं इंद्राला जीवदान दिलेंस म्हणून तूं जीव या नांवानें प्रसिद्ध हो ॥१६॥ गुरु म्हणाले - देवा, आपण प्रसन्न असाल तर इंद्र शरण

आला आहे याचें रक्षण करा व तुमचे तृतीय डोळ्यांतील अग्नि शांत होवो ॥१७॥ शंकर म्हणाले - हा अग्नि पुन्हा कपाळावरील डोळ्यांत कसा शिरेल ? आतां इंद्राला पीडा होऊं नये म्हणून याला मी दूर टाकितों ॥१८॥ नारद म्हणाले - राजा, शंकरांनीं याप्रमाणें बोलून तो अग्नि हातीं घेऊन समुद्रांत टाकला, तो गंगा व समुद्र यांचा संगस आहे तेथें पडला ॥१९॥ इतक्यांत त्याला बाळरुप प्राप्त होऊन तो रडूं लागला. तेव्हां त्या रडण्याच्या शब्दानें पृथ्वी थरथर कांपूं लागली ॥२०॥ त्या रुदनाच्या शब्दानें स्वर्गादिक सत्यलोकांपर्यंत सर्व लोक बहिरे झाले. तें रुदन ऐकून ब्रह्मदेव तेथें आला व हें काय आहे म्हणून आश्चर्य पावला ॥२१॥ इतक्यांत समुद्राच्या मांडीवर तें मूल पाहून ब्रह्मदेव समुद्रास म्हणाला - हें अद्भुत बाळक कोणाचें ? ॥२२॥ ब्रह्मदेवाचें भाषण ऐकून समुद्रानें ब्रह्मदेव आलेला पाहून हात जोडले ॥२३॥ तें मूल ब्रह्मदेवाच्या मांडीवर ठेवून नमस्कार करुन म्हणाला - हे ब्रह्मदेवा, हा सिंधुगंगेच्या संगमांत झालेला माझा मुलगा आहे ॥२४॥ तर हे जगद्गुरो याचे जन्मसंस्कार तूं कर. नारद म्हणाले - याप्रमाणें समुद्र बोलत आहे ॥२५॥ इतक्यांत त्या बालकानें ब्रह्मदेवाची मिशी धरुन ओढली. ब्रह्मदेव हिसके मारुन मिशी सोडवूं लागला. तेव्हां ब्रह्मदेवाच्या दोन्ही नेत्रांतून पाणी आलें ॥२६॥ कष्टानें मिशी सोडविल्यावर ब्रह्मदेव समुद्रास म्हणाले - यानें माझ्या नेत्राचें पाणी धारण केलें ॥२७॥ म्हणून हा जलंधर या नावानें प्रसिद्ध होईल व या योगानें तरुण होऊन सर्व शास्त्रपारंगत होईल ॥२८॥ शंकरावांचून याचा कोणाचेही हातून वध होणार नाहीं. जेथून हा उत्पन्न झाला तेथूनच त्याचा नाश होईल ॥२९॥ नारद म्हणाले - याप्रमाणें ब्रह्मदेवांनीं बोलून शुक्राला बोलावून आणलें व जलंधरास राज्यावर बसविलें व समुद्राचा निरोप घेऊन ब्रह्मदेव अंतर्धान पावले ॥३०॥ ब्रह्मदेवाच्या दर्शनानें समुद्रास आनंद झाला व त्यानें कालनेमीची मुलगी वृंदा जलंधरास नवरी करण्यास मागितली ॥३१॥ कालनेमी आदिकरुन दैत्यांनीं मोठ्या आनंदानें ती मुलगी जलंधरास दिली; ती उत्तम वश्य स्त्री मिळाल्यावर व उत्तम आप्त मिळाल्यावर शुक्राच्या सहाय्यानें तो बलवान् होऊन राज्य करुं लागला ॥३२॥ इति पद्म० का० मा० जलन्धरवर्णनंनाम नवमोऽध्यायः ॥९॥

## अध्याय १०

नारद म्हणतातः-- राजा, पूर्वी देवांनीं जिंकल्यामुळें जे दैत्य पाताळांत राहात होते ते पृथ्वीवर येऊन जलंधराच्या आश्रयानें निर्भय रहाते झाले ॥१॥ एके वेळी त्या जलंधरानें राहूचें शिर तुटलेलें पाहून त्याचें कारण त्यानें शुक्राला विचारिलें ॥२॥ तेव्हां शुक्राचार्यांनीं देवांनीं समुद्रमंथन केलें व रत्नें हरण केलीं व दैत्यांचा पराभव केला ही गोष्ट सांगितली ॥३॥ आपला पिता जो समुद्र त्याचें देवांनीं मंथन केलेलें ऐकून रागानें त्याचे डोळे लाल झाले व घस्मर नांवाचा दूत इंद्राकडे पाठविला ॥४॥ तो खर्वमौली घस्मर स्वर्गलोकीं जाऊन इंद्रसभेंत शिरुन इंद्राशीं चमत्कारिक भाषणें बोलला ॥५॥ घस्मर म्हणालाः -- समुद्राचा मुलगा जलंधर हा सर्व दैत्यांचा राजा आहे; त्यानें मला दूत पाठविलें आहे. त्याचा निरोप श्रवण कर ॥६॥ तूं मंदरपर्वताच्या योगानें माझा पिता

समुद्र याचें मंथन कां केलेंस ? समुद्रांतील नेलेलीं सर्व रत्नें लवकर आम्हांला दे ॥७॥ याप्रमाणें त्या दूताचें भाषण ऐकून इंद्रास चमत्कार वाटला व त्या भयंकर घस्मराला भय उत्पन्न करणाऱ्या शब्दानें भाषण करिता झाला ॥८॥ इंद्र म्हणालाः-- हे दूता, मी पूर्वी समुद्रमंथन केलें त्याचें कारण ऐक. पर्वत माझ्या भयानें समुद्रांत दडले. त्यांना त्यानें पोटांत आश्रय दिला ॥९॥ शिवाय माझे पुष्कळ रिपू जे दैत्य त्यांचें त्यानें रक्षण केलें म्हणून त्यापासून मंथन करुन जें मिळालें तें मीं घेतलें ॥१०॥ पूर्वीं सागराचा पुत्र शंखासुर देवांचा द्वेष करीत होता, त्यालाही माझे धाकटे बंधू विष्णूनें मारिलें ॥११॥ तर जा व हीं समुद्र मंथनाचीं कारणें आहेत असें त्या जलंधराला सांग. नारद म्हणाले - इंद्रानें याप्रमाणें परत पाठविलेला दूत पृथ्वीवर आला ॥१२॥ त्यानें इंद्रानें सांगितलेलें सर्व वर्तमान दैत्यास सांगितलें. तें ऐकून जलंधर संतप्त झाला. रागानें त्याचे ओठ थरथर कांपूं लागले ॥१३॥ तो देवांना जिंकण्याच्या उद्योगास लागला व त्याकरितां चोहोंकडील व पातालांतील कोटयवधि दैत्य तेथें मिळाले ॥१४॥नंतर तो दैत्येंद्र जलंधर शुंभनिशुंभादि सेनापतींच्या कितीएक कोटी घेऊन स्वर्गास जाऊन नंदनवनांत राहिला. तेव्हां देवही अमरावतीहून युद्धास सज्ज होऊन आले ॥१५॥१६॥ पुढें दैत्याचें मोठें सैन्य अमरावतीला वेष्टून राहिलें आहे असे पाहतांच देव दैत्यांचें युद्ध सुरु झालें ॥१७॥ मुसळ, परिघ, बाणा, गदा, शक्ति, परशु इत्यादि शस्त्रांनी ते एकमेकांवर धांवत जाऊन मारुं लागले ॥१८॥ दोन्ही सैन्यें क्षीण होऊन रक्ताच्या ओघानें भरलीं; हत्ती, घोडे, रथ व पायदळ यांनीं कित्येक पाडले, दुसऱ्यांनीं त्यांना पाडिले ॥१९॥ त्यावेळेस रणभूमि संध्याकाळच्या मेघाप्रमाणें लाल झाली. त्या युद्धांत जे दैत्य पडत त्यांना शुक्र अमृतसंजीवनी विद्येच्या मंत्राचें पाणी शिंपून उठवीत होता व देव पडतील त्यांना गुरु द्रोणागिरीहून दिव्य औषधी वारंवार आणून उठवीत होता. युद्धांत पडलेले देव पुनः उठलेले पाहून जलंधर रागानें शुक्रास म्हणाला - मीं मारलेले देव पुन्हां कसे उठतात ? ॥२०॥२१॥२२॥२३॥ तुझी संजीविनी विद्या दुसऱ्याला माहीत नाहीं, असे प्रसिद्ध आहे. शुक्र म्हणतात - हे दैत्या, द्रोणागिरीहून गुरु दिव्य औषधि आणून देवांस पुन्हां जिवंत करितो; याकरितां तूं लौकर द्रोणागिरी हरण कर. नारद म्हणतात - राजा, याप्रमाणें सांगताच लागलीच त्या दैत्यानें द्रोणगिरी नेऊन समुद्रांत टाकून दिला व पुन्हा युद्धास आला. नंतर देव पडलेले पाहून गुरु द्रोणाद्रीकडे गेला ॥२४॥२५॥२६॥ तों तेथें द्रोणाद्रि गुरुला दिसला नाहीं; तो दैत्यांनीं नेला असें जाणून गुरु भयभीत झाला ॥२७॥ व दुरुन धापा टाकीत येऊन म्हणाला, देवहो ! पळा, हा बलवान आहे; याला जिंकण्यास तुम्ही असमर्थ आहांत ॥२८॥ हा शंकराचा अंश आहे, पूर्वीची इंद्राची हकीकत आठवा. तें गुरुचें भाषण ऐकून देव भयानें घाबरले ॥२९॥ दैत्यांनी नाश केल्यामुळे देव दाही दिशांनी पळूं लागले. दैत्यांनी देव पळवून लावले असें पाहतांच ॥३०॥ शंख नगारे वाजवून जयघोष करीत तो जलंधर दैत्यांसह अमरावती नगरींत शिरला. दैत्य नगरांत शिरतांच इंद्रादिक सर्व देव दैत्यांच्या त्रासामुळें मेरु पर्वताच्या गुहेंत जाऊन राहिले. याप्रमाणें देवांस जिंकून जलंधर तेथें स्वर्गाचें राज्य करुं लागला ॥३१॥३२॥ नंतर इंद्रादि देवांच्या सर्व अधिकारांवर शुंभ आदिकरुन मोठमोठे दैत्य त्यानें नेमिले व आपण पुन्हां सुवर्णगिरी पर्वताचे गुहेला देवांचा शोध करीत गेला ॥३३॥ इति दशमोऽध्यायः ॥१०॥

# अध्याय ११

नारद म्हणतातः-- राजा, पुन्हां दैत्य आलेला पाहून इंद्रादिक सर्व देव भयानें थरथरां कांपूं लागले व त्यांनीं विष्णूची स्तुति करण्यास आरंभ केला ॥१॥ देव म्हणतातः-- हे विष्णु, तुम्हीं भक्तांच्या कार्याकरितां मत्स्य कूर्म इत्यादि रुपें धारण करुन त्यांचीं दुःखें नाहींशी करणारे, ब्रह्मदेवादिक जगाची उत्पत्ति, स्थिति व नाश करणारे, शंख, चक्र, गदा व पद्म धारण करणारे असे आहां; तुम्हांला नमस्कार असो ॥२॥ लक्ष्मीचे पति, दैत्यांचा नाश करणारे, गरुडावर बसणारे, पीतांबर नेसणारे, यज्ञादि कर्मे पूर्ण करणारे, बलियज्ञविध्वंसक, भक्तवत्सल, शरणागतरक्षक अशा तुम्हांला आम्हीं नमस्कार करितों ॥३॥ दैत्यांनीं पीडिलेल्या देवांच्या दुःखरुपे पर्वताला वज्राप्रमाणे भेद करणारे हे विष्णो, जलांत शयन करणारे, शेषराजशय्येवर निजणारे, चंद्र सूर्य ज्याचे दोन नेत्र, अशा हे भगंवता, तुम्हांला वारंवार नमस्कार करितों ॥४॥ नारद म्हणतात - राजा, हें संकटनाश करणारें स्तोत्र जे म्हणतील त्यांना श्रीहरीच्या कृपेनें कधींही संकटाची बाधा होणार नाही. ॥५॥ याप्रमाणे देव दैत्यशत्रु भगवतांची स्तुति करीत आहेत, इतक्यांत विष्णूंनीं देवाचें संकट जाणिलें ॥६॥ दैत्यारि विष्णु देवांचे दुःखानें खिन्नचित होऊन रागानें उठले व वेगानें गरुडावर बसून लक्ष्मीला भाषण करिते झाले ॥७॥विष्णु म्हणतातः-- तुझा भाऊ जलंधर यानें देवांचा नाश केला म्हणून त्यांनीं साह्यार्थ मला बोलाविलें; करितां त्वरेनें युद्धाला जातों ॥८॥ लक्ष्मी म्हणते - देवा, मी तुमची प्रियपत्नी भक्तीनें जर तुम्हांला प्रिय आहें तर युद्धांत माझे भावाला मारणें कसें योग्य होईल ? ॥९॥ विष्णु म्हणतातः-- हे लक्ष्मी, तो रुद्रांशापासून झालेला आहे व ब्रह्मदेवाचा त्याला वर आहे; करितां तुझ्या प्रीतीस्तव मी त्याला युद्धांत मारणार नाहीं ॥१०॥ नारद म्हणतातः -- विष्णु याप्रमाणें बोलून हातांत शंख, चक्र गदा, खड्ग घेऊन गरुडावर बसून जेथें देव स्तुति करीत होते तेथें त्वरेनें साहाय्यास आले ॥११॥ तेव्हां गरुडाच्या भयंकर पंखाच्या वाऱ्यानें पीडित किती एक दैत्य आकाशांत मेघाप्रमाणें भ्रमण पावूं लागले ॥१२॥ गरुड पक्षाच्या वाऱ्याचे योगानें दैत्यांची अशी दशा झालेली पाहून जलंधर रागानें डोळे वटारुन विष्णूजवळ आला ॥१३॥ तेव्हां त्याचें व विष्णूचें मोठें युद्ध झालें. सर्व आकाश त्या दोघांच्या बाणांनीं भरुन गेलें ॥१४॥ विष्णूंनीं बाण मारुन त्या दैत्याचे ध्वज, छत्र, धनुष्य व घोडे छेदून टाकले व त्याचे छातीवर एक बाण मारिला ॥१५॥ तेव्हां दैत्यानें त्वरेनें उडी मारुन हातांत गदा घेऊन ती गरुडाच्या डोक्यावर मारिली व त्याला खालीं पाडिलें ॥१६॥ विष्णूंनीं हसत हसत सहज लीलेनें आपल्या खड्गानें त्याची गदा तोडिली. इतक्यांत त्यानें विष्णूच्या हदयावर बुक्की मारिली ॥१७॥ नंतर ते महाबली बाहुयुद्ध करिते झाले. दंड, बुक्या गुडघे यांच्या प्रहारांच्या नादानें पृथ्वी दणाणली ॥१८॥याप्रमाणें उत्कृष्ट प्रकारचें युद्ध केल्यावर प्रतापी विष्णु मेघासारख्या गंभीर वाणीनें त्या दैत्याला बोलले ॥१९॥विष्णु म्हणाले - दैत्येंद्रा ! तुझा पराक्रम पाहून मी संतुष्ट झालों. वर माग, न देण्यासारखें असेल तें सुद्धां देईन तुझ्या मनांत असेल तें माग ॥२०॥जलंधर म्हणतोः-- हे भाऊजी ! तूं संतुष्ट आहेस तर एक वर मला दे. माझी बहिण जी लक्ष्मी तिला घेऊन सर्व सेवकांसह आजपासून

तूं माझे घरीं वास्तव्य कर ॥२१॥ नारद म्हणतात - राजा, ते विष्णु, जलंधरास वर देऊन देवगण व लक्ष्मी यांसह जलंधराच्या नगरांत जाऊन राहिले ॥२२॥ तो महा पराक्रमी जलंधर देवांच्या अधिकारांवर दैत्यांस नेमून पुन्हा पृथ्वीवर येता झाला ॥२३॥ तो सागरपुत्र जलंधर, देव, गंधर्व, सिद्ध यांजपाशीं जेवढीं म्हणून रत्नें होतीं, तीं सर्व आपले स्वाधीन करुन घेऊन राहिला ॥२४॥ पातलामध्यें निशुंभ नांवाच्या पराक्रमी दैत्यास अधिकारी नेमून शेषादिकांना पृथ्वीवर आणिलें ॥२५॥ देव, गंधर्व, सिद्ध, सर्प, राक्षस, मनुष्यें यांना आपल्या नगरच्या रहिवासी प्रजा करुन तिन्ही लोकांचें राज्य करुं लागला ॥२६॥ याप्रमाणें जलंधरानें सर्व देवादिकांना आपले ताब्यांत ठेवून तो प्रजेचें रक्षण पोटच्या मुलांप्रमाणें मोठ्या धर्मानें करुं लागला ॥२७॥ यामुळे त्याचे राज्यांत रोगी, दरिद्री, कृश, दुःखी, अनाथ असा कोणीही दिसत नव्हता ॥२८॥ याप्रमाणें तो जलंधर धर्मानें राज्य करीत असतां, त्याचें ऐश्वर्य पहावें व लक्ष्मीपति भगवान याचें दर्शन घ्यावें अशा हेतूनें एकदां मी त्याचे नगरास गेलों ॥२९॥ इति श्रीप० का० मा० जलं० एकादशोऽध्यायः ॥११॥

## अध्याय १२

नारद म्हणतात - राजा, जलंधरानें मोठ्या भक्तीनें माझी पूजा केली व हंसून मला म्हणाला ॥१॥हे ब्रह्मन् आपण कोठून आलांत ? विशेष काय काय पाहिलें ? येथें कोणत्या कार्याकरितां आलां, त्याची मला आज्ञा करा ॥२॥नारद म्हणतात - हे दैत्येंद्रा, मी सहज कैलासाला गेलों असतां तेथें पार्वतीसह शंकर बसलेले पाहिले ॥३॥तेथें दहा हजार योजनें कल्पवृक्षांचें वन आहे. शेंकडों कामधेनू आहेत व चिंतामणीचा सर्वत्र चकचकाट आहे ॥४॥तें पाहून मला मोठें आश्चर्य वाटलें, व अशी संपत्ति त्रैलोक्यांत सुद्धां असेल कीं नाहीं असे वाटलें ॥५॥तेव्हां तुझ्या ऐश्वर्याची मला आठवण झाली व तें पहावें म्हणून तुजकडे आलों ॥६॥ही तुझी समृद्धि पाहिली पण ती स्त्रीरत्नाखेरीज आहे. तेव्हां मी विचार केला कीं, या त्रैलोक्यांत शंकरासारखा संपत्तिवान् दुसरा कोणी नाहीं ॥७॥तुझ्याजवळ अप्सरा - नागकन्या वगैरे पुष्कळ आहेत, तरी त्या पार्वतीच्या रुपाची बरोबरी खात्रीनें करणार नाहींत ॥८॥जिच्या लावण्यसमुद्रांत ब्रह्मदेव निमग्न होऊन धैर्यच्युत झाला अशा त्या पार्वतीची बरोबरी कोण करणार आहे ? ॥९॥मदनाचा नाश करणारा विरक्त असा शंकर असून तिच्या रुपाला भुलून तिच्या लावण्यरुपसमुद्रांत मासोळीप्रमाणें फिरत होता ॥१०॥

पार्वतीचें रुप पाहून तशी स्त्री उत्पन्न करावी म्हणून ब्रह्मदेवानें पुनः पुनः स्त्रिया उत्पन्न केल्या. त्या अप्सरा झाल्या परंतु तशी एकही स्त्री झाली नाहीं ॥११॥अशा स्त्रीचा जो उपभोग घेणारा त्याचीच संपत्ति श्रेष्ठ आहे. तूं सर्व रत्नांच्या धनी आहेस, तरी तसें तुझें ऐश्वर्य नाहीं ॥१२॥याप्रमाणें बोलून त्याचा निरोप घेऊन मी गेल्यानंतर पार्वतीच्या रुपाचें वर्णन त्यानें ऐकल्यामुळें तो कामज्वरानें पीडित झाला ॥१३॥नंतर विष्णूच्या मायेनें मोहित झाल्यामुळें त्यानें आपला दूत राहू याजला शंकराकडे पाठविलें ॥१४॥तो शुक्लपक्षींच्या चंद्राप्रमाणें तेजस्वी

अशा कैलासाला गेला, तेव्हां त्याच्या काळ्या शरीरामुळें तो कैलास कृष्णपक्षींच्या चंद्राप्रमाणें भासूं लागला ॥१५॥नंदीनें शंकराला तो आल्याची खबर दिल्यावर तो आंत प्रवेश करिता झाला. शंकरांनीं त्यास भ्रूलतेनें बोलण्याची खूण करतांच तो बोलूं लागला ॥१६॥राहू म्हणतो - देव नाग ज्याची सेवा करितात, जो त्रैलोक्याचा व सर्व रत्नांचा स्वामी जलंधर त्याची तुम्हांला आज्ञा आहे; ती वृषध्वज शंकरा ऐका ॥१७॥तूं स्मशानांत राहणारा, अंगावर हाडकें बाळगणारा, दिगंबर ( नग्न ) असणारा, अशा तुला अशी सुंदर स्त्रीरत्न पार्वती कशी शोभेल ?॥१८॥मी सर्व रत्नांचा मालक आहें आणि पार्वती स्त्रियांत रत्न आहे; तेव्हां ती मलाच योग्य आहे, तुला भिक्षा मागून खाणाराला ती योग्य नाहीं ॥१९॥नारद म्हणतातः-- याप्रमाणें राहू बोलत आहे इतक्यांत शंकराच्या भुवयांमधून विजेसारखा शब्द करणारा भयंकर पुरुष निघाला ॥२०॥त्याचें तोंड सिंहासारखें, जीभ बाहेर आलेली व लळलळ करणारी, अग्नीच्या ज्वाळेप्रमाणें ज्याचे डोळे, मोठा उंच, केस उभे, शरीर कृश, भयंकर जसा दुसरा नारसिंहच ॥२१॥असा तो पुरुष राहूला खाण्याकरितां धावला. तें पाहून राहू घाबरुन भयानें अति वेगानें बाहेर पळाला; तरी त्याला त्यानें धरिलें ॥२२॥हे राजा, तो राहू मोठ्यानें ओरडून शंकराला म्हणाला - देवा, मी शरण आलों; माझें रक्षण कर ॥२३॥मला ब्राह्मणाला खाण्यास हा आला आहे; त्या ब्राह्मण राहूचें हें भाषण ऐकून शंकर म्हणाले ॥२४॥तो राहूला धरुन खाणार इतक्यांत शंकरांनीं त्याचें निवारण केलें व म्हणाले - हा दूत दुसऱ्याचा चाकर आहे म्हणून हा वध करण्यास योग्य नाहीं ॥२५॥याला सोड. असें ऐकतांच त्यानें राहूला आकाशांत फेकले. नंतर तो पुरुष शंकराची विनंति करुं लागला ॥२६॥पुरुष म्हणालाः-- मला फार भूक लागली आहे. मी भुकेनें व्याकुळ झालों आहें; मी काय खाऊं त्याची आज्ञा करा ॥२७॥
शंकर म्हणालेः-- तूं आपल्या हातापायांचें मांस खा. नारद म्हणतात - शंकरांनीं अशी आज्ञा करितांच तो आपल्यालाच खाऊं लागला ॥२८॥हात पाय वगैरे सर्व मांस खाल्लें. फक्त मस्तक शेष राहिलें. तें पाहून शंकर प्रसन्न झाले ॥२९॥असें घोर कर्म करणारा पुरुष पाहून विस्मय वाटून बोलले. शंकर म्हणतात - तूं कीर्तिमुख या नावांचा होऊन नेहमीं माझे दारांत रहा ॥३०॥तुझी प्रथम पूजा जे करणार नाहींत ते मला प्रिय होणार नाहींत. नारद म्हणतातः-- तेव्हांपासून देवाच्या दारांत कीर्तिमुख राहिला ॥३१॥जे अगोदर त्याची पूजा करणार नाहींत त्यांची पूजा निष्फळ होईल. त्यानें फेकलेला राहू त्याचे हातून सुटला तो बर्बर देशांत पडला ॥३२॥म्हणून राहू बर्बरदेशांत झालेला असें त्याचें नांव प्रसिद्ध झालें. नंतर राहूनें आपला पुन्हां जन्मच झाला असें मानलें व जलंधराजवळ येऊन सर्व हकीकत सांगितली ॥३३॥इति श्रीप. का. मा. द्वादशोऽध्यायः ॥१२॥

## अध्याय १३

नारद म्हणतात - राजा, जलंधरानें मोठ्या भक्तीनें माझी पूजा केली व हंसून मला म्हणाला ॥१॥ हे ब्रह्मन् आपण कोठून आलांत ? विशेष काय काय पाहिलें ? येथें कोणत्या कार्याकरितां आलां, त्याची मला आज्ञा करा ॥२॥

नारद म्हणतात - हे दैत्येंद्रा, मी सहज कैलासाला गेलों असतां तेथें पार्वतीसह शंकर बसलेले पाहिले ॥३॥ तेथें दहा हजार योजनें कल्पवृक्षांचें वन आहे. शेंकडों कामधेनू आहेत व चिंतामणीचा सर्वत्र चकचकाट आहे ॥४॥ तें पाहून मला मोठें आश्चर्य वाटलें, व अशी संपत्ति त्रैलोक्यांत सुद्धां असेल कीं नाहीं असे वाटलें ॥५॥ तेव्हां तुझ्या ऐश्वर्याची मला आठवण झाली व तें पहावें म्हणून तुजकडे आलों ॥६॥ही तुझी समृद्धि पाहिली पण ती स्त्रीरत्नाखेरीज आहे. तेव्हां मी विचार केला कीं, या त्रैलोक्यांत शंकरासारखा संपत्तिवान् दुसरा कोणी नाहीं ॥७॥ तुझ्याजवळ अप्सरा - नागकन्या वगैरे पुष्कळ आहेत, तरी त्या पार्वतीच्या रुपाची बरोबरी खात्रीनें करणार नाहींत ॥८॥ जिच्या लावण्यसमुद्रांत ब्रह्मदेव निमग्न होऊन धैर्यच्युत झाला अशा त्या पार्वतीची बरोबरी कोण करणार आहे ? ॥९॥ मदनाचा नाश करणारा विरक्त असा शंकर असून तिच्या रुपाला भुलून तिच्या लावण्यरुपसमुद्रांत मासोळीप्रमाणें फिरत होता ॥१०॥ पार्वतीचें रुप पाहून तशी स्त्री उत्पन्न करावी म्हणून ब्रह्मदेवानें पुनः पुनः स्त्रिया उत्पन्न केल्या. त्या अप्सरा झाल्या परंतु तशी एकही स्त्री झाली नाहीं ॥११॥ अशा स्त्रीचा जो उपभोग घेणारा त्याचीच संपत्ति श्रेष्ठ आहे. तूं सर्व रत्नांच्या धनी आहेस, तरी तसें तुझें ऐश्वर्य नाहीं ॥१२॥ याप्रमाणें बोलून त्याचा निरोप घेऊन मी गेल्यानंतर पार्वतीच्या रुपाचें वर्णन त्यानें ऐकल्यामुळें तो कामज्वरानें पीडित झाला ॥१३॥ नंतर विष्णूच्या मायेनें मोहित झाल्यामुळें त्यानें आपला दूत राहू याजला शंकराकडे पाठविलें ॥१४॥ तो शुक्लपक्षींच्या चंद्राप्रमाणें तेजस्वी अशा कैलासाला गेला, तेव्हां त्याच्या काळया शरीरामुळें तो कैलास कृष्णपक्षींच्या चंद्राप्रमाणें भासूं लागला ॥१५॥ नंदीनें शंकराला तो आल्याची खबर दिल्यावर तो आंत प्रवेश करिता झाला. शंकरांनीं त्यास भ्रूलतेनें बोलण्याची खूण करतांच तो बोलूं लागला ॥१६॥ राहू म्हणतो - देव नाग ज्याची सेवा करितात, जो त्रैलोक्याचा व सर्व रत्नांचा स्वामी जलंधर त्याची तुम्हांला आज्ञा आहे; ती वृषध्वज शंकरा ऐका ॥१७॥ तूं स्मशानांत राहणारा, अंगावर हाडकें बाळगणारा, दिगंबर ( नग्न ) असणारा, अशा तुला अशी सुंदर स्त्रीरत्न पार्वती कशी शोभेल ? ॥१८॥ मी सर्व रत्नांचा मालक आहें आणि पार्वती स्त्रियांत रत्न आहे; तेव्हां ती मलाच योग्य आहे, तुला भिक्षा मागून खाणाराला ती योग्य नाहीं ॥१९॥ नारद म्हणतातः-- याप्रमाणें राहू बोलत आहे इतक्यांत शंकराच्या भुवयांमधून विजेसारखा शब्द करणारा भयंकर पुरुष निघाला ॥२०॥ त्याचें तोंड सिंहासारखें, जीभ बाहेर आलेली व लळलळ करणारी, अग्नीच्या ज्वाळेप्रमाणें ज्याचे डोळे, मोठा उंच, केस उभे, शरीर कृश, भयंकर जसा दुसरा नारसिंहच ॥२१॥ असा तो पुरुष राहूला खाण्याकरितां धावला. तें पाहून राहू घाबरुन भयानें अति वेगानें बाहेर पळाला; तरी त्याला त्यानें धरिलें ॥२२॥ हे राजा, तो राहू मोठ्यानें ओरडून शंकराला म्हणाला - देवा, मी शरण आलों; माझें रक्षण कर ॥२३॥ मला ब्राह्मणाला खाण्यास हा आला आहे; त्या ब्राह्मण राहूचें हें भाषण ऐकून शंकर म्हणाले ॥२४॥ तो राहूला धरुन खाणार इतक्यांत शंकरांनीं त्याचें निवारण केलें व म्हणाले - हा दूत दुसऱ्याचा चाकर आहे म्हणून हा वध करण्यास योग्य नाहीं ॥२५॥ याला सोड. असें ऐकतांच त्यानें राहूला आकाशांत फेकले. नंतर तो पुरुष शंकराची विनंति करुं लागला ॥२६॥ पुरुष म्हणालाः-- मला फार भूक लागली आहे. मी भुकेनें व्याकुळ झालों आहें;

मी काय खाऊं त्याची आज्ञा करा ॥२७॥ शंकर म्हणालेः-- तूं आपल्या हातापायांचें मांस खा. नारद म्हणतात - शंकरांनीं अशी आज्ञा करितांच तो आपल्यालाच खाऊं लागला ॥२८॥ हात पाय वगैरे सर्व मांस खाल्लें. फक्त मस्तक शेष राहिलें. तें पाहून शंकर प्रसन्न झाले ॥२९॥ असें घोर कर्म करणारा पुरुष पाहून विस्मय वाटून बोलले. शंकर म्हणतात - तूं कीर्तिमुख या नावांचा होऊन नेहमीं माझे दारांत रहा ॥३०॥ तुझी प्रथम पूजा जे करणार नाहींत ते मला प्रिय होणार नाहींत. नारद म्हणतातः-- तेव्हांपासून देवाच्या दारांत कीर्तिमुख राहिला ॥३१॥ जे अगोदर त्याची पूजा करणार नाहींत त्यांची पूजा निष्फळ होईल. त्यानें फेकलेला राहू त्याचे हातून सुटला तो बर्बर देशांत पडला ॥३२॥ म्हणून राहू बर्बरदेशांत झालेला असें त्याचें नांव प्रसिद्ध झालें. नंतर राहूनें आपला पुन्हां जन्मच झाला असें मानलें व जलंधराजवळ येऊन सर्व हकीकत सांगितली ॥३३॥ इति श्रीप. का. मा. द्वादशोऽध्यायः ॥१२॥ नारद म्हणतातः-- राजा जलंधरानें ती हकीकत ऐकिली तेव्हां त्याला मोठा राग आला व कोट्यावधि दैत्य बरोबर घेऊन कैलासास निघाला ॥१॥जातांना शुक्राचार्य पुढें होते. वाटेंत मार्गदर्शक राहू होता. वेगानें जाऊं लागल्यामुळें तो मार्गांत अडखळून पडला व त्याचा मुकुट डोक्यावरुन खालीं पडला ॥२॥ दैत्यांच्या सैन्यांनीं भरलेलीं शेंकडों विमानें आकाशांत चाललीं; तेव्हां पावसाळ्यांत ढगांनीं व्यापलेल्या आकाशाप्रमाणें नभ शोभत होतें ॥३॥ जलंधराचा असा उद्योग पाहून, इंद्रप्रमुख देव गुप्तरुपानें जाऊन शंकराची प्रार्थना करुं लागले ॥४॥ देव म्हणतातः-- हे प्रभो, शंकरा, आमचें दुःख आपण कसें जाणत नाहीं ? आमच्या रक्षणाकरितां जलंधराचा नाश करा ॥५॥ नारद म्हणतातः-- याप्रमाणें देवांचें भाषण ऐकून वृषभध्वज शंकर हांसले आणि महाविष्णूला बोलावून भाषण केलें ॥६॥ शंकर म्हणतातः-- हे विष्णो ! तुम्ही युद्धांत जलंधराला कां मारिलें नाहीं ? आणि आपलें वैकुंठ सोडून त्याचेच घरीं येऊन कां राहिला ? ॥७॥ विष्णु म्हणालेः-- तो तुमच्या अंशापासून उत्पन्न झालेला व लक्ष्मीचा भाऊ म्हणून मी त्याला युद्धांत मारलें नाहीं, तुम्हीच याला जिंका ॥८॥ शंकर म्हणतातः -- हे विष्णो ! हा मोठा तेजस्वी बलवान् आहे; आतां या शस्त्रांनी व अस्त्रांनीं माझ्यानें त्याला मारवणार नाहीं म्हणून सर्व देवांनी व तुम्ही आपआपला अंश शस्त्राकरितां मला द्यावा ॥९॥ नारद म्हणतातः-- राजा, नंतर विष्णुप्रमुख सर्व देवांनीं आपआपले तेजांश दिले, ते एकत्र झालेले पाहून शंकरांनीं आपला मोठा तेजांश त्यांत घातला ॥१०॥ त्या तेजाचें एक मोठें सुदर्शन नांवाचे चक्र, ज्वाळेच्य लोळांनीं भयंकर असें शंकरांनीं केले ॥११॥ नंतर शेषतेजानें इंद्रानें वज्र केलें. इतक्यांत कैलास पर्वताच्या पायथ्यापाशीं जलंधर दृष्टीस पडला ॥१२॥कोट्यावधि हत्ती, घोडे, रथ, पायदळ, अशा सैन्यानें युक्त जलंधराला पाहून सर्व देव आले होते तसे गुप्तपणानें निघून गेले ॥१३॥ शंकराच्या आज्ञेनें नंदी, गणपति, कार्तिकस्वामी आदिकरुन व सर्व गण युद्धाला तयार झाले ॥१४॥ व युद्धांत अजिंक्य असे शंकराचे गण कैलास पर्वतावरुन खालीं उतरले व कैलासाच्या तळाशीं त्यांचे युद्ध सुरु झालें ॥१५॥ शिवाचे गण व दैत्य शस्त्रास्त्रांच्या योगानें व्याप्त झाले व नगारे, मृदंग, शंख यांचा शब्द ऐकून सर्वास वीरश्री आली ॥१६॥ हत्ती, घोडे, रथ, यांच्या शब्दांनीं पृथ्वी नादित होऊन कांपूं लागली. शक्ति, तोमर, बाणांचा समुदाय, मुसल, प्रास, पट्टिश वगैरे शस्त्रांनी आकाश भरुन गेलें. तें उल्कांनीं

व्यापल्यासारखें शोभूं लागलें व पृथ्वीवर प्रमथादि गणांनी दैत्य व दैत्यांनी मारुन पाडलेले गण व हत्ती, घोडे, पायदळ रथ या योगानें, वज्रानें झालेले पर्वताचे तुकडे पृथ्वीवर पडले आहेत की काय असें भासले ॥१७॥१८॥१९॥ वसा, मांस, रक्त यांचा चिखल झाल्यामुळें उंच सखल वगैरे कांहींच समजेनासें झालें ! शिवगणांनीं मारलेले दैत्य शुक्र जिवंत करीत होता ॥२०॥ अमृतसंजीवनी विद्येनें दैत्य पुन्हां पुन्हां उठतात हें पाहून गण व्याकुळ होऊन भ्याले ॥२१॥ शंकराला ते शुक्राचें सर्व कृत्य सांगते झाले. तेव्हां शंकराच्या मुखापासून अतिभयंकर अशी एक कृत्या निघाली. जिचे पाय ताडवृक्षाप्रमाणें, तोंड दरीप्रमाणें व डोंगराप्रमाणें स्तन अशी होती. ती युद्धभूमीवर बसून दैत्यांना खाऊं लागली ॥२२॥२३॥ तिनें शुक्राला धरुन आपले योनींत ठेविलें व आकाशांत अंतर्धान पावली. शुक्राला धरिलेलें पाहून शिवगणांला हर्ष झाला व त्यांनीं दैत्यांच्या सैन्याचा नाश केला. तेव्हां दैत्यांच्या सैन्याची भयानें पळापळ झाली ॥२४॥२५॥ वायूच्या वेगानें जसा गवताचा ढीग विसकटून जातो तसें दैत्यांचें सैन्य गणांच्या भयानें भग्न झालें. असें पाहून दुसरे निशुंभादि दैत्य आले ॥२६॥निशुंभ, शुंभ हे सेनापती व मोठा पराक्रमी कालनेमि असे तिघे गणांचे सेनेचें निवारण करुं लागले ॥२७॥ त्यांनीं पावसाळ्यांतील मेघांप्रमाणें बाणांचा वर्षाव केला; त्यांच्या बाणांनीं टोळांच्या समुदायाप्रमाणें सर्व दिशा व आकाश व्यापिलें; तेव्हां गणसेना थरथर कांपूं लागली व शेंकडों बाण लागून त्यांचे शरिरांतून रक्ताचे प्रवाह वाहूं लागले ॥२८॥२९॥ गण वसंत ऋतूंतील पळसाचे वृक्षाप्रमाणें रक्तानें लाल झाले होते. त्या योगानें पडलेले व दुसऱ्यांना पाडणारे सर्व गण छिन्नभिन्न झाले. तेव्हां कांहीं समजेनासें झालें होतें ॥३०॥ ते सर्व गण युद्धभूमि सोडून माघारे फिरले ॥३१॥ आपलें सैन्य नाश पावलें असें पाहून पराक्रमी शैल गणपति व कार्तिकस्वामी त्वरेनें पुढें आले व त्यांनीं त्या दैत्यांचें मोठ्या शौर्यानें निवारण केलें ॥३२॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये त्रयोदशोध्यायः ॥१३॥

## अध्याय १४

नारद म्हणतात - ते दैत्य, नंदी, गणपति, षडानन, यांस पाहून मोठ्या अमर्षानें द्वंद्वयुद्ध करण्याकरितां धांवत आले ॥१॥ नंदीबरोबर कालनेमी, गणपतीबरोबर शुंभ व षडाननाबरोबर निशुंभ असे सज्ज होऊन युद्धास धांवले ॥२॥ निशुंभानें कार्तिकस्वामीच्या मोराला उरांत पांच बाण मारले. त्या योगानें तो मूर्च्छित पडला ॥३॥ कार्तिकस्वामीनें क्रोधानें आपले हातांत शक्ति घेतली. इतक्यांत ती निशुंभानें वेग करुन आपल्या शक्तीनें पाडली ॥४॥ नंदीनें अनेक बाण कालनेमीला मारिले. सात बाणांनीं त्याचे घोडे, ध्वज, सारथी व जूं पाडिलें ॥५॥ कालनेमीनें रागानें नंदीचें धनुष्य तोडलें; तें नंदीनें टाकून त्याचे उरावर शूल मारिला ॥६॥ त्या शूलानें त्याचें हृदय फुटलें व घोडे मेले, सारथि मेला असा झाला. तेव्हां त्यानें पर्वताचें शिखर उचलून नंदीश्वरावर टाकिलें ॥७॥ इकडे रथांत बसणारा शुंभ व उंदरावर बसणारा गणपति यांनीं एकमेकांस बाणांनीं वेधून टाकिलें ॥८॥

तेव्हां गणपतीनें पत्री बाणानें शुंभाचें हदय वेधून तीन बाणांनीं त्याचा सारथी पृथ्वीवर पाडला ॥९॥ तेव्हां शुंभ अति क्रोधाविष्ट होऊन गणपतीवर बाणांची वृष्टि करुं लागला व तीन बाणांनीं त्यानें उंदरास वेधून मेघासारखी गर्जना केली ॥१०॥ त्या बाणांनीं अंग मित्र होऊन अति वेदना झाल्यामुळें उंदीर चळला, तेव्हां गणपती खालीं पडला; त्यामुळे पदाती झाला ॥११॥ हे राजा ! मग गणपतीनें शुंभाच्या हदयावर परशु मारुन त्याला पाडिलें व पुनः उंदरावर बसता झाला. ॥१२॥कालनेमी व निशुंभ या दोघांनीं रागानें एकदम गणपतीवर बाणवर्षाव केला. मस्तहत्तीला चाबुकांनीं मारितात तसें गणपतीला झालें ॥१३॥ गणपतीला असें पीडिलेलें पाहून बली वीरभद्र कोटिगणांसहवर्तमान वेगानें धांवत आला ॥१४॥ त्याचेबरोबर कूष्मांड, भैरव, वेताळ, योगिनींचा समुदाय, पिशाचें वगैरेंचा समुदाय व गणही आले ॥१५॥ तेव्हां त्यांच्या किलकिलाटानें, सिंहनादानें व नगारे मृदंग वगैरेंच्या नादानें पृथ्वी कांपूं लागली ॥१६॥ भूतें धांवून दैत्यांस खाऊं लागली. वर खालीं उड्या मारुं लागली, रणांगणांत नाचूं लागली ॥१७॥ नंदी व कार्तिकस्वामी यांना धीर आला व ते बाणांनी त्वरेनें दैत्यांना मारुं लागले ॥१८॥ दैत्यांची सेना, पुष्कळ छिन्नभिन्न व हत झाली. भूतांनीं खाल्ली व पुष्कळशी मरुन पडली व त्यामुळें घाबरुन खिन्न व म्लानमुख झाली ॥१९॥ तेव्हां आपली उध्वस्त झालेली अशी सेना पाहून जलंधर रथांत बसून मोठ्या वेगानें गणांवर चालून आला ॥२०॥ दोन्ही सैन्यांत हत्ती, रथ, घोडे यांचा घडघडाट, शंख, नगारे यांचा ध्वनि झाला व मोठा सिंहनाद झाला ॥२१॥ जलंधराच्या बाणांनीं पृथ्वी व आकाशाचें मध्य धुक्याप्रमाणें व्यापून गेलें ॥२२॥ जलंधरानें गणपतीला पांच बाणांनीं, शैल कार्तिकस्वामी यांस नऊ बाणांनी व वीरभद्राला वीस बाणांनी वेधून मेघाप्रमाणें गर्जना केली ॥२३॥कार्तिकस्वामीनें शक्ति टाकून जलंधराला वेध केला. त्यानें शक्तीचे आघातानें थोडा व्याकुल होऊन युद्ध केलें ॥२४॥ नंतर जलंधरानें रागानें संतप्त होऊन कार्तिकस्वामीला गदा मारली. तेव्हां कार्तिकस्वामी खालीं पृथ्वीवर पडला ॥२५॥ त्याचप्रमाणें नंदीलाही वेगानें पृथ्वीवर पाडिलें, तेव्हां गणपतीनें रागावून परशूनें त्याची गदा तोडिली ॥२६॥ वीरभद्रानें तीन बाणांनीं त्या दैत्याच्या छातीवर वेध केला व सात बाणांनीं त्याचे घोडे, ध्वज, धनुष्य, छत्र हीं तोडिलीं ॥२७॥ तेव्हां त्या दैत्यानें संतापून शक्ति उगारुन त्या भयंकर शक्तीनें प्रहार करुन गणपतीला पाडिलें व दुसऱ्या रथावर आपण चढला ॥२८॥ नंतर वीरभद्रावर संतापून चालून आला. ते सूर्याप्रमाणें तेजस्वी जलंधर व वीरभद्र दोघे परस्पर लढूं लागले ॥२९॥ वीरभद्रानें पुन्हा त्याचे घोडे व धनुष्य तोडून पाडिलें तेव्हां तो दैत्य परिघ नांवाचें शस्त्र घेऊन वीरभद्रावर उडी मारुन धांवला ॥३०॥ नारद म्हणतात - राजा, जलंधरानें वेगानें जाऊन वीरभद्राच्या मस्तकावर परिघ मारला, तेव्हां त्याचें मस्तक फुटून तो जमिनीवर रक्त ओकत पडला ॥३१॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये चतुर्दशोऽध्यायः ॥१४॥

## अध्याय १५

नारद म्हणतात - राजा, वीरभद्र पडला असें पाहतांच सर्व रुद्रगण भयानें रणांगण सोडून ओरडत शंकराकडे धांवत गेले ॥१॥ त्यांची आरडाओरड ऐकून चंद्रशेखर शंकर हंसतच नंदीवर बसून रणभूमीवर आले ॥२॥ शंकर आले असें पाहून रुद्रगण सिंहनाद करुन पुनः युद्धास निघाले व त्यांनीं बाणांची वृष्टि करुन पुष्कळ दैत्य मारिले ॥३॥ तेव्हां दैत्य भयंकर शंकररुप पाहून घाबरुन पळूं लागले. जसें कार्तिकव्रत करणाराला पाहून मीतीनें पापें पळतात तसे ॥४॥ दैत्य रणांतून पळूं लागले असें पाहून जलंधर संतापानें शंकरावर हजारों बाण सोडीत धावून आला ॥५॥ शुंभ, निशुंभ, श्वमुखी, बलाहक, खड्गरोमा, प्रचंड, घस्मर आदिकरुन दैत्य शंकरावर चालून आले ॥६॥ बाणवृष्टीच्या अंधकारानें आपले गण व सैन्य व्यापलें आहे असें पाहून शंकरानीं आपल्या बाणांनीं तें बाणांचें जाळें तोडून आकाश व्यापून टाकिलें ॥७॥ दैत्यांनाही प्रचंड बाण सोडून त्यांच्या वावटळीनेंच घाबरवून त्या बाणजालांनीं त्यांना पृथ्वीवर पाडिलें ॥८॥ नंतर क्रुद्ध होऊन खड्गरोम्याचें मस्तक परशूनें तोडलें व खट्वांगानें बलाहकाचें शिर दुभंग केलें ॥९॥ पाशानें घस्मर दैत्याला बांधून जमिनीवर पाडिले. तसेंच नंदीनें, किती एक दैत्य मारिले व बाणानें किती एक पाडिले ॥१०॥ तेव्हां दैत्य जसे सिंहानें पीडित हत्ती पळतात तसे ते उभे राहूं शकले नाहींत. तेव्हां जलंधर अतिशय संतापून विजेच्या कडकडाटाप्रमाणें आवाज करुन शंकरास युद्धास हाक मारुन म्हणाला. जलंधर म्हणतो - हे शंकरा, तूं माझ्याशीं युद्ध कर. या गरीबांना मारल्यानें काय फल होणार ? ॥११॥१२॥ हे जटाधरा, तुझें काय सामर्थ्य असेल तें मला दाखीव. याप्रमाणें बोलून सत्तर बाणांनीं शंकरावर प्रहार केला ॥१३॥ शंकरांनीं हसून आपल्या तीक्ष्ण बाणांनीं ते सर्व बाण तोडले व सात बाणांनीं त्याचे घोडे, ध्वज, छत्र, धनुष्य तोडिलीं ॥१४॥ ज्याचें धनुष्य तुटलें आहे व जो विरथ झाला आहे असा तो जलंधर हातांतील गदा उगारुन वेगानें शंकरावर धावला. इतक्यांत शंकरांनीं बाणांनीं त्याची गदा तोडून दोन तुकडे केले ॥१५॥ तरी तो मूठ वळवून बुक्कीनें मारण्याकरितां शंकराकडे आला. तेव्हां शंकरांनीं वाणौघानें त्याला एक कोस मागें हटविलें ॥१६॥ तेव्हां आपणापेक्षां शंकर अधिक बलवान् आहे, असें पाहून जलंधरानें शंकरास मोह पाडणारी अशी अद्भुत गंधर्वमाया उत्पन्न केली ॥१७॥ तेव्हा गंधर्व गाऊं लागले, अप्सरा नाचूं लागल्या, दुसरे ताल, वेणु, मृदंग इत्यादि वाद्यें वाजवूं लागले ॥१८॥ तेव्हां तो मोठा चमत्कार पाहून शंकर त्या नादानें मोहित झाले, हातांतील शस्त्रें गळलीं तरी तीं त्यांना समजलीं नाहींत ॥१९॥ शंकरांचे चित्त असें एकाग्र झालें आहे असें पाहून, जलंधर कामातुर होऊन जेथें पार्वती बसली होती तेथें त्वरेनें गेला ॥२०॥ बलवान् शुंभ व निशुंभ यांना युद्धाचे जागीं ठेवून आपण, दहा हात, पांच मुखें, तीन नेत्र, जटा असें शंकराचें रुप धारण करुन मोठ्या वृषभावर बसून गेला, तेव्हां हा शंकरच आला असें पार्वतीला वाटलें ॥२१॥२२॥ व सख्यांमधून उठून त्याच्या समोर पुढें आली. ती सुंदर पार्वती दृग्गोचर होत आहे ॥२३॥ इतक्यांतच त्याचें वीर्य गळून पडलें व अंग जड स्तब्ध झालें; तेव्हां हा दैत्य आहे हें पार्वतीला समजलें व ती भ्याली ॥२४॥ ती त्वरेनें उत्तर मानस सरोवरांत जाऊन दडली; क्षणांत विजेप्रमाणें ती दिसेनाशी झाली, तेव्हां तो दैत्य जेथें शंकर होते तेथें युद्धास आला. इकडे पार्वतीनें भीतीनें मनांत विष्णूचें स्मरण केलें ॥२५॥२६॥ स्मरण करते इतक्यांत विष्णु जवळ बसले आहेत असें

तिनें पाहिलें. पार्वती म्हणतेः-- हे विष्णो ! दुष्ट जलंधरानें अद्भुत चमत्कार केला. त्या दुष्टाचें चरित्र आपण जाणत आहां विष्णु म्हणतातः-- पार्वती, त्यानें जो मार्ग दाखवून दिला त्याचेंच मी आचरण करणार आहें ॥२७॥२८॥ तो स्त्रीचे पाविव्रत्यानें सुरक्षित आहे तोंपर्यंत कशानेंही मरणार नाहीं नारद म्हणतातः-- विष्णु याप्रमाणें बोलून जलंधराच्या नगरास गेले ॥२९॥ नंतर शंकर गंधर्वाच्या नादांत समरांगणांत होते ती गंधर्वमाया नाहींशी होतांच ते सावध झाले ॥३०॥ शंकराच्या मनाला मोठा चमत्कार वाटला व रागानें पुन्हां जलंधराशीं युद्धास निघाले. दैत्यानें पुनः शंकर आलेले पाहून त्यांच्यावर बाणांचा वर्षाव केला ॥३१॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये पंचदशोऽध्यायः ॥१५॥

## अध्याय १६

नारद म्हणतात - राजा, इकडे विष्णु जलंधर दैत्याचे नगरांत गेले व त्याची स्त्री वृंदा इचें पातिव्रत्य भंग करावें असा त्यांनीं विचार केला ॥१॥ इकडे वृंदा स्वप्नांत आपला पति रेड्यावर बसला आहे, अंगास तेल लाविलें आहे, नग्न आहे ॥२॥ काळ्या फुलांच्या भूषणांनीं युक्त आहे व मांसभक्षक पिशाच्चादि सभोंवार आहेत, हजामत केली आहे, काळोखानें व्याप्त अशा दक्षिण दिशेकडे जात आहे ॥३॥ आपलें नगर समुद्रांत आपल्यासुद्धां बुडालें असें पाहती झाली व ती जागृत होऊन भयंकर स्वप्नाचा विचार करुं लागली ॥४॥ सूर्य उगवल्यावर त्याकडे पाहिलें, तों तिला तो निस्तेज व ज्याला छिद्रें पडलीं आहेत असा दिसला. हें सर्व अनिष्ट आहे असें समजून भयानें घाबरी होऊन ती रडूं लागली ॥५॥ समाधान व्हावें म्हणून गोपुर, बंगला इत्यादिक जागीं गेली परंतु तिला सुख वाटेना. मग दोघी मैत्रिणी घेऊन बागेंत गेली ॥६॥ तेथें इकडे तिकडे पुष्कळ फिरली तरी चैन पडेना. या वनांतून त्या वनांत अशी फिरुं लागली व भ्रमिष्टासारखी होऊन देहभान विसरली ॥७॥ याप्रमाणें ती फिरत असतां ज्यांचीं तोंडे सिंहाप्रमाणें व ज्यांच्या दाढा भयंकर आहेत, असे दोन अक्राळविक्राळ राक्षस पाहिले ॥८॥ त्या राक्षसांना पाहतांच फार घाबरुन पळूं लागली. पळतां पळतां तिनें शिष्यांसहवर्तमान मौन धरुन बसलेला एक तपस्वी पाहिला ॥९॥ वृंदेनें राक्षसांच्या भयानें जाऊन आपल्या हातांनीं त्या तपस्व्याच्या गळयाला मिठी घातली, आणि हे मुने ! मी शरण आलें; माझें रक्षण कर, असें म्हणाली ॥१०॥ राक्षस मागें लागल्यामुळें ती वृंदा घाबरली आहे असें त्या ऋषीनें पाहून रागाने आपल्या हुंकारानें ते घोर राक्षस मागें परतविले ॥११॥ हुंकाराच्या भयानें राक्षस भिऊन परत गेले असें पाहून वृंदा ऋषीस साष्टांग नमस्कार घालून म्हणाली ॥१२॥ वृंदा म्हणते - हे ऋषे, आपण कृपा करुन माझें या भयंकर संकटापासून रक्षण केलें. आतां माझी एक विनंती आहे, तरी कृपा करुन माझें समाधान करा ॥१३॥ हे प्रभो ! माझा पति जलंधर शंकराशीं युद्ध करण्यास गेला आहे, तर हे सुव्रता, तो तेथें युद्धांत कसा आहे तें मला सांगा ॥१४॥ नारद म्हणतात - ऋषींनी तिचें भाषण ऐकून दयेनें वर पाहिलें इतक्यांत दोन वानर आले व ऋषीस नमस्कार करुन पुढें उभे राहिले

॥१५॥ नंतर ऋषींनीं डोळ्यांनीं खूण करतांच आकाशांत गेले व क्षणार्धांत जाऊन परत येऊन नमस्कार करुन उभे राहिले ॥१६॥वानरांनीं आणलेलें आपल्या पतीचें मस्तक, धड व हात पाहून पतीच्या दुःखानें व्याकुळ होऊन वृंदा मूर्च्छित होऊन पडली ॥१७॥ ऋषींनी तिच्यावर कमंडलूंतील उदक शिंपडून तिला सावध केली, तेव्हां ती पतीच्या कपाळाला कपाळ लावून रडूं लागली ॥१८॥ वृंदा म्हणाली - जो पूर्वी सुखाच्या भाषणांनीं माझा विनोद करीत होतात, मग आज तुमची परम प्रिया मी निरपराधी असून माझ्याशीं कां बोलत नाहीं ? ॥१९॥ ज्यानें देव गंधर्व व विष्णु यांना देखील जिंकिलें अशा त्रैलोक्य जिंकणाऱ्याला केवळ तपस्वी शंकरानें कसें मारिलें ॥२०॥ नारद म्हणतात - राजा, वृंदा याप्रमाणें रडून ऋषीला म्हणाली. वृंदा म्हणतेः-- हे कृपानिधे मुनिश्रेष्ठा ! या माझ्या प्रिय पतीला जिवंत करा ॥२१॥ आपण माझे पतीला जीवंत करण्यास समर्थ आहां असें मला वाटतें. नारद म्हणतातः-- हें तिचें भाषण ऐकून ऋषि हसून भाषण करितात ॥२२॥ ऋषि म्हणतात - हे वृंदे, याला शंकरांनीं युद्धांत मारिलें आहे म्हणून हा जिवंत होण्याला समर्थ नाहीं; तरी तुझी फार दया येते म्हणून याला उठवितों ॥२३॥ नारद म्हणालेः-- ऋषि याप्रमाणें बोलून गुप्त झाले व जलंधर जिवंत होऊन उठून प्रीतीनें वृंदेस आलिंगून तिचें चुंबन घेऊं लागला ॥२४॥ वृंदाही आपल्या पतीला पाहून आनंदित झाली व त्याचेबरोबर पुष्कळ दिवस त्याच वनांत राहून उपभोग घेतला ॥२५॥ एके दिवशीं संभोगाचे शेवटीं तो आपला पती नसून विष्णु आहे असें तिनें पाहिले. तेव्हां रागानें ती विष्णूची निर्भर्त्सना करुन बोलली ॥२६॥ वृंदा म्हणालीः-- दुसऱ्याचे स्त्रियांशी गमन करणाऱ्या तुझ्या शीलाला धिक्कार असो; तूंच मायेनें कपटी तपस्वी झाला होतास, हें मला चांगलें समजलें ॥२७॥ जे दोघे आपले द्वारपाळ सेवक मला मायेनें वानर दाखविलेस तेच पुढें राक्षस होऊन तुझी स्त्री हरण करितील ॥२८॥ व तूं स्त्रीच्या दुःखानें रानोरान फिरशील. तेव्हां वानर तुझें सहाय करतील. दुसरा शिष्य शेष लक्ष्मण हा तुजबरोबर फिरेल व तुझी सेवा करील ॥२९॥ याप्रमाणें बोलून त्या वृंदेनें अग्निप्रवेश केला. विष्णूंनीं तिचें पुष्कळ निवारण केलें तरी तिनें त्याचें ऐकिलें नाहीं ॥३०॥नंतर विष्णु वृंदेवर मन ठेवून विरहदुःखानें वारंवार तिचें चिंतन करीत तिच्या राखेंत लोळत राहिले; देवादिकांनीं पुष्कळ समजूत केली, तरी त्यांच्या मनाला शांति आली नाहीं ॥३१॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये वृंदाग्निप्रवेशो नाम षोडशोध्यायः ॥१६॥

## अध्याय १७

नारद म्हणतातः-- राजा ! इकडे जलंधरानें शंकर अद्भुत पराक्रमी असें पाहून त्यांना मोह पाडण्याकरितां मायेची पार्वती निर्माण केली ॥१॥ त्या पार्वतीला रथावर बांधिलें आहे, ती रडत आहे व तिला निशुंभ वगैरे दैत्य मारीत आहेत असें शंकरांनीं पाहिलें ॥२॥ अशा प्रकारची पार्वती पाहून शंकरांस वाईट वाटलें आणि क्षणभर आपले सामर्थ्य विसरुन खालीं मान घातली ॥३॥ नंतर जलंधरानें शंकराचें मस्तक, छाती व पोट यांवर तीन बाण मारिले;

ते पिसापर्यंत आंत शिरले ॥४॥ ही माया आहे असें विष्णूंनीं सुचविले. तेव्हां शंकरांनीं आपलें ज्वालामालांनीं अति भयंकर असे उग्र रुप प्रगट केलें ॥५॥ तें शंकराचें भयंकर रुप पाहून दैत्य भ्याले. शंकरापुढें उभे राहीनात. दशदिशांनीं पळूं लागले ॥६॥ तेव्हां शंकरांनीं शुंभनिशुंभाला शाप दिला कीं, तुम्हीं माझे युद्धांत पळालां, तर पुढें पार्वतीचे हातून मराल ॥७॥ पुनः जलंधरानें शंकरावर बाणांचा वर्षाव करुन बाणांचे अंधारानें आकाश व पृथ्वी व्यापून टाकिली ॥८॥ शंकर वेगानें तो बाणांचा समुदाय तोडीत आहेत इतक्यांत जलंधरानें जलदीनें वृषभास परिघानें मारिलें ॥९॥ त्या मारानें वृषभ रणांतून परत फिरला. शंकरांनीं ओढून परत फिरविलें तरी तो रणभूमीवर उभा राहीना ॥१०॥ तेव्हां उग्ररुपी शंकर फार रागावले आणि त्यांनीं सूर्यासारखें तेजस्वी सुदर्शन चक्र वेगानें जलंधरावर फेकलें ॥११॥ तें तेजानें पृथ्वी व आकाश व्यापणारें चक्र जलंधराचें शिर हरण करुन जमिनीवर पडलें ॥१२॥ शरीर रथांतून खालीं पडलें, तेव्हां पृथ्वी दणाणली. त्याच्या देहांतून तेज निघालें तें शंकराच्या शरीरांत लय पावलें ॥१३॥ वृंदेच्या देहांतून तेज निघालें, तें पार्वतीच्या शरीरांत लय पावलें; तेव्हां ब्रह्मदेवादिक सर्व देवांचे नेत्र आनंदानें प्रफुल्लित झाले ॥१४॥ अशा देवांनीं शंकराला नमस्कार केला व विष्णूच्या चरित्राची प्रशंसा केली. देव म्हणतातः-- महादेवा तुह्मीं शत्रूच्या भयापासून देवांचें रक्षण केलें ॥१५॥ परंतु दुसरी एक भीति उत्पन्न झाली आहे. वृंदेच्या लावण्याला भुलून विष्णु मोहित होऊन राहिले आहेत त्याला काय करावें ॥१६॥ शंकर म्हणतातः-- देवहो ! तुम्हीं विष्णूचा मोह नाहींसा होण्याकरीतां मोहिनी मायेला शरण जा; ती दयाळू आहे, तुमचें कार्य करील ॥१७॥ नारद म्हणतातः-- राजा, याप्रमाणें बोलून भूतगणांसह शंकर अंतर्धान पावले. देवांनीं भक्त वत्सल जी मूल प्रकृति माया तिची स्तुति केली ॥१८॥ देव म्हणतात, उत्पत्ति, स्थिति व नाश याला कारण जे सत्व, रज, तम हे गुण जिच्यापासून झाले व जिच्या इच्छेनें हें सर्व जग उत्पत्ति व लयाला पावतें अशा त्या मूलप्रकृतीला आमचा नमस्कार असो ॥१९॥ जी तेवीस प्रकारच्या भेदांनीं बोधिली जाते व जी सर्व जग व्यापून राहते, जिचीं रुपें व कर्मे आम्हां अज्ञ देवांना व ब्रह्मा विष्णु शंकर या तिघांनाही समजत नाहीत त्या मूलप्रकृतीला आम्ही नमस्कार करितों ॥२०॥ जिची नित्य भक्ति केली असतां, त्या पुरुषाला दारिद्र्याचे भय, मोह व पराभव, हीं प्राप्त होत नाहींत अशी भक्तवत्सल मूल प्रकृति, तिला नमस्कार करितों ॥२१॥ नारद म्हणतातः-- हें स्तोत्र जे त्रिकाल पठण करितील, त्यांना दरिद्र, मोह व दुःख हीं स्पर्श करणार नाहींत ॥२२॥ याप्रमाणें देवांनीं स्तुति केली तेव्हां त्यांना गगनांत आपल्या ज्वालांनीं सर्व दिशा व्यापल्या आहेत असें तेजोमंडळ दिसलें ॥२३॥ व त्या तेजाच्या मध्यांतून त्यांनीं आकाशवाणी ऐकिली, शक्ति म्हणतोः-- देवहो ! तीन गुणांनी मीच तीन प्रकारची होऊन रहातें ॥२४॥ सत्व, रज, तम तीन गुणांनीं गौरी, लक्ष्मी व सरस्वती या नांवांनी मीच आहे. तर देवहो ! त्यांजकडे जा म्हणजे त्या तुमचे कार्य करितील ॥२५॥ नारद म्हणालेः-- हें भाषण देवांनीं ऐकल्यावर तें तेज गुप्त झालें व देवांना आनंद होऊन चमत्कार वाटला ॥२६॥ त्या शक्तीच्या वाक्यानें प्रेरित झालेले देव, गौरी, लक्ष्मी व सरस्वती यांजकडे जाऊन त्यांना भक्तिपूर्वक नमस्कार करिते झाले ॥२७॥ तेव्हां त्या देवी, प्रणत देवांना पाहून कृपाळूपणानें तिघींनीं देवांना पृथक् पृथक् बीजें देऊन भाषण केलें ॥२८॥ देवी म्हणतातः-- हे बीजें जेथें विष्णु

बसले आहेत तेथें पेरा; म्हणजे तुमचें कार्य सिद्धीस पावेल ॥२९॥ नारद म्हणालेः-- तेव्हां सर्व देवांना मोठा आनंद झाला. तीं बीजें घेऊन जेथें विष्णु वृंदेकरितां जमिनीवर उदास होऊन बसले होते तेथें तीं पेरुन टाकलीं ॥३०॥ नारद म्हणतातः-- राजा ! याप्रमाणें सत्य वाक्याचें माहात्म्य सांगितले. ही कथा जो पठण करील किंवा ऐकेल, तो स्वर्गलोकास जाईल ॥३१॥ जिला पुत्र नाहीं अशी स्त्री किंवा पुरुष यांनी एकचित्तानें ही श्रवण केली तर त्यांचीं संकटें दूर होतील; विघ्नें येणार नाहींत ॥३२॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये सप्तदशोऽध्यायः ॥१७॥

## अध्याय १८

नारद म्हणालेः-- राजा ! त्या पेरलेल्या बीजांपासून तीन वनस्पति आवळी, मालती व तुळसी अशा उत्पन्न झाल्या ॥१॥सावित्रीपासून आवळी, लक्ष्मीपासून मालती व पार्वतीपासून तुलसी. तम, सत्व व रज या गुणांनीं युक्त अशा उत्पन्न झाल्या ॥२॥ वृंदेच्या लावण्यतिशयानें विभ्रम झालेले विष्णु या स्त्रीरुपी तीन वनस्पति पाहून उठून बसले ॥३॥ व कामासक्त अंतः करणानें त्यांची याचना केली तेव्हां विष्णूकडे तुलसी व आवळी प्रीतीनें पाहूं लागल्या ॥४॥ पूर्वी लक्ष्मीनें जें बीज दिलें तें ईष्येनें अर्पण केलें होतें. त्यापासून उत्पन्न झालेली स्त्री मालती ईर्षायुक्त झाली ॥५॥ म्हणून ती निंदित वर्वरी असें नांव पावली. आवळी व तुळशीवर विष्णुची प्रीति असल्यानें त्या सदा भगवंताला आनंद देणाऱ्या प्रिय झाल्या ॥६॥ तेव्हांपासून विष्णु वृंदेचे दुःख विसरले व त्या दोघींसह आनंदानें वैकुंठास गेले. तेव्हां सर्व देवांनीं त्यांना नमस्कार केला ॥७॥ याचकरितां कार्तिकोद्यापनाचे वेळीं तुळशीच्या खालीं विष्णूची पूजा सांगितली; तुळशीच्या मूळाजवळ केलेली पूजा विष्णूला प्रियकर आहे ॥८॥ हे राजा ! ज्याच्या घरीं तुळशीची बाग आहे, त्याचें घर तीर्थाप्रमाणें पवित्र आहे. तेथें यमदूत येत नाहींत ॥९॥ तुळशीची बाग सर्व पाप नाहीसें करणारी आहे, सर्व इच्छा पूर्ण करणारी आहे. जे नरश्रेष्ठ तुळशी लावितात, त्यांना यमाचें दर्शन होणार नाहीं ॥१०॥ नर्मदेचें दर्शन, गंगेचें स्नान, तुळशीचा स्पर्श हीं तीन्ही सारखीं पुण्यकारक आहेत ॥११॥ तुळशीचें रोप लावणें, त्याचें रक्षण करणें, त्याला पाणी घालणें, तिचें दर्शन घेणें व तिला स्पर्श करणें यांपासून वाणी, मन व शरीर यांजकडून घडलेलीं सर्व पापें तुळशी नाहींशी करते ॥१२॥ तुलसीमंजिरींने जो विष्णु व शंकर यांची पूजा करितो तो कधींही पुन्हा जन्मास न येतां मोक्षास जातो; यांत संशय नाहीं ॥१३॥ पुष्कर आदिकरुन सर्व तीर्थे, गंगादिक सर्व नद्या व वासुदेवादिक सर्व देव हे तुलसीवनामध्यें राहतात ॥१४॥ तुळशीची मंजिरी घेऊन जर कोणी प्राण सोडील तर तो शेंकडो पापांनीं युक्त असला तरी यम त्याजकडे पाहाण्यास देखील समर्थ होत नाहीं ॥१५॥ तो विष्णूच्या जवळ सायुज्यतेला जाईल. राजा ! हें अगदीं खरें आहे. जो तुलसीकाष्ठाचें चंदन धारण करितो ॥१६॥ त्यानें पाप केलें तरी त्याच्या देहाला शिवणार नाहीं तुळशीच्या झाडांची सावली जेथें जेथें असेल ॥१७॥ तेथें श्राद्ध करावें; म्हणजे पितरांना दिलेलें अक्षय्य होतें,

आवळीच्या झाडाखालीं जो पिंडदान करील ॥१८॥ त्याचे जे पितर नरकांत असतील ते मुक्तीला जातील. राजा ! जो मस्तकावर हातांत, मुखांत व शरीरावर ॥१९॥ आवळे धारण करील, तो विष्णूसारखा जाणावा ॥२०॥ आवळा, तुळशी व द्वारकेंतील माती गोपीचंदन हीं ज्याच्या देहावर आहेत, तो नेहमीं जीवन्मुक्त समजावा ॥२१॥ आवळे व तुळशीपत्र यांनीं मिश्रित पाण्यानें जो स्नान करील, त्याला गंगास्नानाचे फळ सांगितलें आहे. जो मनुष्य आवळीचीं पानें व फळें यांनीं देवाची पूजा करील ॥२२॥ त्याला सोनें, रत्ने, मोती यांनी पूजा केल्याचें फळ मिळतें. सर्व तीर्थे, ऋषि, देव, यज्ञ हे सर्व कार्तिकमासी ॥२३॥ तुळा राशीस सूर्य असतां आवळीमध्यें सर्वकाळ असतात ॥२४॥ कार्तिक महिन्यांत द्वादशीला तुळशीचें किंवा आवळीचें पान जो तोडील तो निंद्य अशा नरकास जाईल ॥२५॥ कार्तिक महिन्यांत जो आवळीचे छायेखालीं भोजन करील, त्याचें एक वर्षपर्यंतचें अन्नसंसर्गाचें पातक जाईल ॥२६॥ जो कार्तिकमासी आवळीचे मुळापाशी विष्णूची पूजा करील त्याला सर्व क्षेत्रांत विष्णूची पूजा केल्याचें पुण्य मिळेल. जसें विष्णूचें माहात्म्य वर्णन करण्यास ब्रह्मदेव समर्थ नाहीं, तसें आवळी व तुळशीं यांचें माहात्म्यही वर्णन करण्यास तो समर्थ नाहीं ॥२७॥ जो मनुष्य आवळी व तुळशी यांच्या उत्पत्तीचें कारण ऐकेल व दुसऱ्याला ऐकवील, त्याचीं सर्व पापें नाहींशीं होऊन उत्तम विमानांत पूर्वजांसह बसून स्वर्गास जातो ॥२८॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये धात्रीतुलसीमहिमाव० अष्टादशोऽध्यायः ॥१८॥

## अध्याय १९

पृथु प्रश्न करतात - नारदा ! तुम्ही इतिहासासह अतिआश्चर्यकारक तुळशीचें माहात्म्य मला सांगितलें, तें मीं ऐकिलें ॥१॥ कार्तिकव्रत करणाराचें मोठें पुण्यफल सांगितलें; तें शुभकारक व्रत कोणीं आचरण केलें तें सांगा ॥२॥ नारद म्हणतात - पूर्वी सह्याद्रीचे प्रदेशांत करवीर नगरांत धर्म जाणणारा कोणी धर्मदत्त नांवाचा एक ब्राह्मण राहात होता ॥३॥ तो नेहमी विष्णूव्रत करणारा, विष्णूचे पूजेंत निमग्न असणारा, द्वादशाक्षरी वासुदेव मंत्राचा जप करणारा व अतिथीचा आदर करणारा असा होता ॥४॥ एकदां कार्तिकमासीं पहाटे प्रहररात्रीं हरिजागराकरितां विष्णुमंदिरास निघाला ॥५॥ हरीच्या पूजेचें साहित्य घेऊन जात असतां वाटेंत एक भयंकर राक्षसी येत आहे अशी पाहिली ॥६॥ तिच्या दाढा वांकड्या होत्या, जीभ लळलळ करीत होती, डोळे खोल गेलेले लाल होते, नग्न असून रोडकी, लांब ओठाची व घर्घर शब्द करणारी अशी ती होती ॥७॥ त्या राक्षसीला पाहून धर्मदत्त भ्याला. त्याचे हातपाय लटलट कांपूं लागले व भीतीनें हरीचें नांव घेऊन पूजेचें साहित्य पाण्याचे भांडें वगैरे सर्व त्यानें तिला मारलें ॥८॥ तें हरीचें नामस्मरण करुन तुळसीसह उदक तिचे अंगावर फेकलें; त्यामुळें तिचें सर्व पाप नाश पावलें ॥९॥ तेव्हां तिला पूर्वजन्मींच्या पापकर्माचें स्मरण झालें व त्या ब्राह्मणास साष्टांग नमस्कार घालून आपली पूर्वदशा सांगूं लागली ॥१०॥ कलहा म्हणत्ये - पूर्वीच्या कर्माच्या परिणामानें मला ही दशा प्राप्त झाली आहे. तर हे ब्राह्मणा ! मी पुनः उत्तम गतीला कशी जाईन ? ॥११॥ नारद म्हणालेः--

तिनें आपणाला नमस्कार केला व आपलें कर्म सांगितलें. तेव्हां त्या ब्राह्मणाला मोठा चमत्कार वाटून तो ब्राह्मण त्या राक्षसीला प्रश्न करितो ॥१२॥ धर्मदत्त म्हणतोः-- कोणत्या कर्मानें ही दशा तुला प्राप्त झाली ? तूं कोठली व कोण ? तुझें शील काय तें सर्व मला सांग ॥१३॥ कलहा म्हणाली - हे ब्राह्मणा ! सौराष्ट्र नगरामध्यें भिक्षु नांवाचा एक ब्राह्मण होता, त्याची मी बायको. माझे नांव कलहा. मी मोठी निष्ठुर होतें ॥१४॥मी कधींही पतीला गोड बोलून देखील समाधान दिलें नाही, व त्यानें सांगितलें तरी त्याला मिष्टान्न करुन घातलें नाहीं ॥१५॥ मी मोठी भांडखोर असल्यामुळे तो मला भिऊन नेहमीं उदास होता. तेव्हां मला कंटाळून दुसरी बायको करावी असा त्यानें बेत केला ॥१६॥ तेव्हां मीं विष खाऊन प्राणत्याग केला. मग यमाचे दूतांनीं मला बांधून मारीत मारीत यमापुढें नेलें ॥१७॥ यमानें मला पाहतांच चित्रगुप्ताला विचारिले. यम म्हणालाः-- चित्रगुप्ता ! हिनें काय काय कर्मे केलीं आहेत तीं पहा. त्या कर्मांप्रमाणें शुभ किंवा अशुभ फळ तिला मिळेल ॥१८॥ कलहा म्हणते - तेव्हां चित्रगुप्त माझी निर्भर्त्सना करुन म्हणाला ॥१९॥ चित्रगुप्त म्हणालाः-- हिनें शुभ कर्म तर कांहींच केलें नाही. नवऱ्याला न देतां आपणच गोड गोड अन्न खात होती ॥२०॥ म्हणून वडवागुलीच्या नीच योनीमध्यें आपली विष्ठा खाणारी ही व्हावी ही नवऱ्याचा द्वेष करुन नित्य त्याशीं भांडत होती ॥२१॥ म्हणून विष्ठा खाणारी डुकरयोनी तिला प्राप्त व्हावी स्वयंपाकाच्या भांड्यांत जेवीत होती व नवऱ्याला टाकून एकटीच भोजन करीत होती ॥२२॥ म्हणून आपलींच पिलें खाणारी अशी मांजरीची योनी हिला प्राप्त व्हावी पतीच्या उद्देशानें तिनें आत्मघात केला ॥२३॥ म्हणून अति निंद्य अशा पिशाचयोनींत तिनें राहावें, म्हणून तिला यमदूतांनीं निर्जल मारवाड देशांत सोडावी ॥२४॥ तेथें तिनें बहुत काळ पिशाच योनींत राहून नंतर तीन प्रकारचे अशुभ वडवागुळ, मांजर व डुकर असे जन्म घ्यावे ॥२५॥ कलहा म्हणालीः-- ती मी पांचशें वर्षे या प्रेतदेहामध्यें आहें; आपल्या कर्मानें भूक व तहान यांचे पीडेनें फार दुःखित अशी आहें ॥२६॥ भूक व तहान यांचे पीडेमुळें मी एका वाण्याच्या शरिरांत प्रवेश केला व दक्षिण देशांत कृष्णावेण्यांच्या संगमाला आलें ॥२७॥ कृष्णावेणीच्या तीराला येतें इतक्यांत शिव व विष्णु यांच्या दूतांनी मला त्या वाण्याच्या शरिरांतून जबरदस्तीनें ओढून लांब टाकिलें ॥२८॥ तेव्हां मी क्षुधेनें पीडित असतां ब्राह्मणा मला तुझें दर्शन झालें. तुझ्या हातांतील तुळशीच्या उदकानें माझें सर्व पाप गेलें ॥२९॥ हे विप्रेंद्रा ! आतां काय करणें तें कर. म्हणजे पुढें भोगाव्या लागणाऱ्या तीन योनि व हा प्रेतदेह यांपासून माझी मुक्तता होईल ॥३०॥ तो श्रेष्ठ ब्राह्मण असें तें कलहेचें भाषण ऐकून तिच्या कर्मपाकाच्या फलानें तिला प्राप्त झालेलें दुःख पाहून विस्मित व दुःखित झाला. तिची दीन स्थिति पाहून कृपेनें दया आली. त्यामुळें चित्तवृत्ति चंचळ झाल्याकारणानें बराच वेळ विचार करुन तो ब्राह्मण दुःखित अंतः करणानें बोलूं लागला ॥३१॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये एकोनविंशोऽध्यायः ॥१९॥

## अध्याय २०

धर्मदत्त म्हणाला - हे कलहे ! तीर्थ, दान, व्रत यांनीं पापें नाहींशी होतात; परंतु तूं प्रेतदेहांत आहेस म्हणून तो अधिकार तुला नाहीं ॥१॥ तुझी अशी खिन्न स्थिति पाहून माझे मनाला फार दुःख होतें, तुझा उद्धार केल्याशिवाय माझे मनाला समाधान होणार नाही ॥२॥ तुझे पातक फार मोठें आहे. तीन योनि भोगावें लागणारें पातक, व ही अति निंदित पिशाच योनि थोड्याशा पुण्यानें नाहींशी होणार नाहीं ॥३॥ याकरितां मी जन्मापासून आजपर्यंत जें कार्तिकव्रत केलें त्याचें अर्धे पुण्य तुला देतों; त्या योगानें तुला सद्गति प्राप्त होवो ॥४॥ यज्ञ, दान, तीर्थे, व्रतें हीं कोणतीही कार्तिक व्रताच्या पुण्याची बरोबरी केव्हांही करणार नाहीत ॥५॥ नारद म्हणालेः-- याप्रमाणें धर्मदत्तानें बोलून तिच्या अंगावर तुलसी युक्त पाणी शिंपडलें व तिला द्वादशाक्षर मंत्र ऐकविला ॥६॥ इतक्यांत ती प्रेतदेहांतून मुक्त होऊन लक्ष्मीप्रमाणें दिव्य स्वरुपवान् व अग्निज्वालेप्रमाणें तेजस्वी झाली ॥७॥ तेव्हां तिनें हर्षानें त्या ब्राह्मणास दंडवत् नमस्कार घातला व सद्गदितवाणीनें बोलूं लागली ॥८॥ कलहा म्हणालीः-- हे ब्राह्मणश्रेष्ठा ! मी तुझ्या कृपेनें या नरकापासून मुक्त झालें. पापसमुद्रात मी बुडालें होतें, त्यांतून तारण्याला तूंच नौका झालास ॥९॥ नारद म्हणतातः-- असें ती कलहा त्या ब्राह्मणाशी बोलत आहे इतक्यांत आकाशांतून विष्णुरुप धारण करणाऱ्या दूतगणांनीं युक्त एक तेजस्वी, विमान आलें आहे असें तिनें पाहिलें ॥१०॥ नंतर त्यांतील पुण्यशील सुशील द्वारपालांनी तिला श्रेष्ठ विमानांत बसविलें व अप्सरा तिची सेवा करुं लागल्या ॥११॥ तें विमान पाहून धर्मदत्ताला विस्मय वाटला व ते विष्णुस्वरुपी दोन दूत पाहून धर्मदत्तानें त्यांना साष्टांग नमस्कार घातला ॥१२॥ ते पुण्यशील व सुशील नांवाचे दूत त्याला उठवून त्याचें अभिनंदन करुन धर्मयुक्त भाषण करुं लागले ॥१३॥ पुण्यशीलसुशील म्हणतातः-- हे द्विजश्रेष्ठा ! तूं विष्णुभक्त, दीनांवर दया करणारा, सर्वज्ञ व विष्णुव्रत करणारा असा उत्तम आहेस ॥१४॥ तूं लहानपणापासून जें कार्तिकव्रत केलेंस त्याचें अर्धे पुण्य दान केल्यानें त्याचे दुप्पट पुण्य तुला प्राप्त झालें ॥१५॥ इचेंही मागील शंभर जन्मांचें पातक नाहीसें झालें व स्नानाचे पुण्यानेंच जें हिचें पूर्वजन्माचें पातक तें गेलें ॥१६॥ हरिजागराच्या पुण्यानें ह्या विमानांत बसली. उत्तम प्रकारची सर्व सुखे व भोगांनीं युक्त हिला वैकुंठास नेतों ॥१७॥ दीपदानाच्या पुण्यानें हिला विष्णूप्रमाणें रुप प्राप्त झालें. तुलसीपूजादिक कार्तिकव्रतें यांचे शुभपुण्यांनी ही विष्णूच्या सन्निध गमन करणारी झाली ॥१८॥ हे कृपानिधे ! तूं हें पुण्य तिला दिलेंस त्याचें हें सर्व फळ हिला मिळालें व तूंही या जन्माच्या शेवटीं आपल्या दोन्ही स्त्रियांसह वैकुंठास येशील ॥१९॥ वैकुंठांत विष्णुस्वरुप प्राप्त होऊन विष्णू जवळ राहशील. हे धर्मदत्ता ! ज्यांनी तुझ्याप्रमाणे विष्णूची भक्तीनें आराधना केली तेच धन्य, कृतकृत्य व त्यांच्याच जन्माचे सार्थक झालें ॥२०॥ विष्णूची चांगली आराधना केली तर तो मनुष्यास काय देणार नाहीं ? सर्व कांहीं देईल ॥२१॥ ज्यानें ध्रुवाला अढळपद दिलें, ज्याच्या नामस्मरणानें मनुष्याला उत्तम गति मिळते ॥२२॥ पूर्वी नामस्मरणानें गजेंद्र नक्रापासून मुक्त होउन विष्णुसन्निध वैकुंठाला गेला व जय नांवाचा द्वारपाळ झाला ॥२३॥ तूं विष्णूची आराधना केली आहेस म्हणून विष्णूचे सन्निध येशील व हजारों वर्षे दोन्ही स्त्रियांसह तेथें राहशील ॥२४॥ तें पुण्य संपल्यावर जेव्हां पृथ्वीवर येशील तेव्हां सूर्यवंशांतील प्रख्यात असा दशरथ नांवाचा राजा

होशील ॥२५॥ तेथेंही दोन स्त्रियांनीं युक्त होशील व हिला अर्धे पुण्य दिलेंस, म्हणून ही तिसरी स्त्री होईल ॥२६॥ व तेथेंही श्रीविष्णु देवकार्याकरितां तुझे पुत्र होऊन तुझ्याजवळ राहतील ॥२७॥ तूं जन्मापासून हें विष्णूला संतोषकारक व्रत केलेंस, त्यापेक्षा यज्ञ दानें तीर्थे हीं अधिक नाहींत ॥२८॥ हे ब्राह्मणश्रेष्ठा, तूं हें विष्णूला संतोष करणारे असें व्रत केलेंस म्हणून धन्य आहेस. त्या व्रताच्या अर्ध भागानें ही सफळ होऊन हिला आम्ही मुरारीच्या वैकुंठास घेऊन जातों ॥२९॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये विंशतितमोऽध्यायः ॥२०॥

## अध्याय २१

नारद म्हणालेः-- याप्रमाणें त्या विष्णुदूतांचे भाषाण ऐकून धर्मदत्ताला कौतुक वाटलें व त्यांना साष्टांग नमस्कार करुन भाषण करिता झाला ॥१॥ धर्मदत्त म्हणालाः-- भक्तांचें संकट नाश करणारा विष्णु याची यज्ञ, दान, व्रत, तीर्थ तप यांहींकरुन लोक यथाविधि आराधना करितात ॥२॥ यांमध्यें विष्णुप्रिय व विष्णुसान्निध्य करणारें असें कोणतें व्रत कीं, जें केलें असतां यज्ञदानादि सर्व केल्याचें फळ मिळतें ॥३॥ गण म्हणतातः-- हे ब्राह्मणा ! तूं चांगलें विचारलेंस. तुला पूर्वी घडलेली एक पुण्यकारक कथा सांगतों. चित्त देऊन श्रवण कर ॥४॥ पूर्वी कांतिपुर नगरामध्यें चोल नांवाचा चक्रवर्ति राजा राज्य करीत होता. त्याच्याच कीर्तिमुळे त्या देशाला चोलदेश हें नांव प्राप्त झालें ॥५॥ तो चोलराजा राज्य करीत असतां त्याच्या राज्यांत कोणीहि दरिद्री, रोगी, दुःखी, पापकर्मी असे नव्हते ॥६॥ त्या राजानें बहुत यज्ञ केल्यामुळें ताम्रपर्णीं नदीच्या दोन्ही तीराला यज्ञसंबंधीं सोन्याचे केलेले यूप शोभत होते. त्यामुळें नदीतीर कुबेराच्या चैत्ररथ बागेप्रमाणें भासत होतें ॥७॥ हे ब्राह्मणा ! तो राजा एकदां अनंत शयन क्षेत्राला गेला. जेथें जगत्स्वामी भगवंतानें योगनिद्रेमध्यें शयन केलें आहे ॥८॥ तेथें राजानें दिव्य रत्नें, मोतीं, सुंदर सोन्याची फुलें, यांनी श्रीविष्णूची यथाविधि पूजा केली ॥९॥ देवाला सांष्टांग नमस्कार करुन तेथें बसला. इतक्यांत तेथें देवाजवळ एक ब्राह्मण आलेला त्यानें पाहिला ॥१०॥ तो विष्णुदास ब्राह्मण त्या राजाचे नगरचाच होता. ज्यानें देवाचे पूजेकरितां हातांत उदक व तुलसी धारण केली होती ॥११॥ त्या ब्राह्मणानें तेथें येऊन विष्णुसूक्तानें देवदेवाला स्नान घालून तुळशीच्या मंजिरींनीं पूजा केली ॥१२॥ त्याच्या तुळशीच्या पूजेनें पूर्वी आपण केलेली रत्नपूजा झांकून गेली असें राजानें पाहिलें; तेव्हां राजाला राग येऊन बोलला ॥१३॥ चोलराजा म्हणतो - हे विष्णुदासा ! माणकें सुवर्ण इत्यादिकांनी मी मोठी सुंदर पूजा केली होती. ती तूं तुलसीनीं अशी कां झांकून टाकिलीस ? ॥१४॥ तूं विष्णुभक्ति जाणत नाहींस; ज्या अर्थी तूं अशी अतिसुंदर सुशोभित पूजा झांकून टाकतोस यावरुन तूं नीच आहेस असें मला वाटतें ॥१५॥ असें राजाचें भाषण ऐकून ब्राह्मण संतापला व राजाच्या मोठेपणाचा मान न राखतां बोलूं लागला ॥१६॥ विष्णुदास म्हणतोः-- राजा ! तुला भक्ति ठाऊक नाहीं. तूं राजलक्ष्मीनें गर्विष्ठ झाला आहेस. तूं पूर्वी कोणतें विष्णुव्रत केलेंस तें सांग बरें ॥१७॥ गण म्हणतातः-- असें ब्राह्मणाचें वाक्य ऐकून राजा हंसला व गर्वानें विष्णुदासाला म्हणाला ॥१८॥ राजा म्हणतोः-

- ब्राह्मणा ! तूं असें जरी बोललास तरी तुला विष्णुभक्तीचा नुसता गर्व आहे. दरिद्री जो तूं त्या तुला विष्णूची भक्ति कितीशी असणार ? ॥१९॥ तूं विष्णूला तुष्ट करणारें असें यज्ञदानादि केलें नाहींस किंवा हे ब्राह्मणा ! कधीं कोठें देवालयही बांधलें नाहींस ॥२०॥ असा तूं असूनही तुला भक्तीचा मोठा गर्व मात्र आहे. हे सर्व ब्राह्मणहो ! माझें भाषण ऐका ॥२१॥ हा वाद विष्णूच्या साक्षात्कारानेंच संपेल; तेव्हां तुम्ही आम्हां दोघांमध्यें कोण भक्त आहे तें जाणाल ॥२२॥ गण म्हणालेः-- राजा याप्रमाणें बोलून आपल्या राजवाड्यांत गेला व त्यानें मुद्गलऋषीस आचार्यत्व देऊन विष्णुसत्र आरंभिले ॥२३॥ त्या सत्रांत ऋषींचा मोठा समुदाय जमला होता; राजानें त्यांना अन्नदान बहुत केलें व दक्षिणाही बहुत दिली; जसें पूर्वी ब्रह्मदेवानें गयाक्षेत्री विष्णुसत्र केलें त्याप्रमाणें त्या राजानें चालविलें ॥२४॥ इकडे विष्णुदासही त्या देवालयांतच राहिला व तो विष्णूला प्रिय असे नियम चालवीत होता ॥२५॥ माघ व कार्तिक महिन्याचें व्रत, तुलसीवनाचें रक्षण, एकादशीला " ॐ नमो भगवते वासुदेवाय " या द्वादशाक्षरी मंत्राचा जप, नित्य षोडशोपचारांनीं व गायन नृत्य इत्यादि मंगलांनीं विष्णूची पूजा अशीं व्रतें तो ब्राह्मण करिता झाला ॥२६॥२७॥ नित्य चालतां बसतां निजतां, विष्णूचें स्मरण करीत होता. सर्व प्राणिमात्रांचे अंतर्यामीं विष्णु आहे असें समजून त्यांकडे यथायोग्य समदृष्टीनं पहात होता ॥२८॥ माघ व कार्तिक मासाचे विशेष नियम सर्व करुन विष्णुप्रीतीकरीतां त्यांचें त्यानें उद्यापन केलें ॥२९॥ याप्रमाणें चोलराजा व विष्णुदास ब्राह्मण हे विष्णूची आराधना करणारे असे मोठे व्रतस्थ राहून सर्व इंद्रियांचीं कर्मे केवळ भगवंतावर निष्ठा ठेवून करीत असतां बहुत काळ गेला ॥३०॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये एकविंशोऽध्यायः ॥२१॥

## अध्याय २२

नारद म्हणतात - राजा ! एकदां विष्णुदास नित्यस्नानसंध्याविधि आटोपून त्यानें स्वयंपाक केला, इतक्यांत तो पाक गुप्तपणानें कोणीं हरण केला ॥१॥तो स्वयंपाक नाहींसा झाला असें पाहूनही सायंकाळची पूजा वगैरे व्रताचा भंग होईल म्हणून पुन्हा त्यानें पाक केला नाहीं ॥२॥ दुसरे दिवशीं स्वयंपाक करुन श्रीहरीला नैवेद्य अर्पण करण्यास डोळे मिटले तों इतक्यांत पाक पुन्हा कोणी नेला ॥३॥ याप्रमाणें सात दिवस त्याचा पाक कोणी हरण करीत होतें, तेव्हां त्याला चमत्कार वाटून तो विचार करुं लागला ॥४॥ अहो ! रोज येथें येऊन माझा पाक कोण नेतो ? हें क्षेत्र संन्याशास राहाण्यास योग्य आहे म्हणून मला ही जागा सोडणें बरें नाहीं ॥५॥ जर मी पुन्हा पाक करुन जेवावें तर संध्याकाळचे पूजानियमाचा भंग होईल तो कसा करावा ॥६॥ पाक करुन तत्काल भोजन करावें तर हरीला अर्पण केल्याशिवाय वैष्णवांनीं भोजन करुं नये ॥७॥ आज सात दिवस मी उपोषण करुन व्रतस्थ येथें राहिलों. आतां मात्र आज पाक करुन त्याचें चांगलें रक्षण करितों ॥८॥ असें चिंतन करुन त्यानें पाक केला व आपण दडून बसला; इतक्यांत एक चांडाल पाक चोरुन नेण्यास टपून बसलेला पाहिला ॥९॥ तो अतिशय क्षुधेनें व्याकुळ, दीनवदन, हाडें व कातडें उरलें आहे इतका कृश असा पाहतांच त्या ब्राह्मणाला त्याची

दया आली ॥१०॥ तो अन्न घेऊन जाऊं लागला तेव्हां ब्राह्मण त्याला म्हणाला, अरे ! थांब उभा रहा; असें हें कोरडे रुक्ष अन्न कसें खाशील ? हें तूप घे ॥११॥ याप्रमाणें भाषण करीत तो ब्राह्मण आपल्याजवळ आला असें पाहून तो चांडाळ भिऊन वेगानें पळत असतां पडला व मूर्च्छित झाला ॥१२॥ तो चांडाळ भीतीनें मूर्च्छित पडला आहे असें पाहून तो ब्राह्मण श्रेष्ठ विष्णुदास त्वरेनें त्याजवळ जाऊन दयेनें त्यावर आपल्या धोत्राचे पदरानें वारा घालूं लागला ॥१३॥ नंतर तो उठल्यावर त्याकडे विष्णुदासानें पाहिलें, तों शंख, चक्र, गदा धारण करणारे साक्षात् नारायण त्याला दिसले ॥१४॥ पीतांबरधारी, चतुर्भुज, श्रीवत्सांकित, किरीट, कुंडलें, कौस्तुभमणि धारण करणारे, जवसाचे फुलाप्रमाणें श्यामवर्ण, हृदयावर कौस्तुभ झळकत आहे असे प्रभु त्यानें पाहिले ॥१५॥ विष्णुदर्शन झाल्याबरोबर अंगावर रोमांच, आनंदाश्रु इत्यादि सात्विक भावामुळें त्या ब्राह्मणाला स्तुति व नमस्कार करण्याचें सुचेना ॥१६॥ नंतर इंद्रादिक देव तेथें आले. गंधर्व अप्सरा नाचूं व गाऊं लागल्या ॥१७॥ शेंकडो विमानांनीं, देव, ऋषि यांच्या समुदायांनीं व गीत, वाद्यें यांच्या घोषांनीं तें स्थान व्यापून गेलें ॥१८॥ तेव्हां विष्णूंनी आपल्या सात्विक व्रती भक्ताला आलिंगन देऊन आपलेप्रमाणें त्याला रुप दिलें व विमानांत बसवून वैकुंठाला नेलें ॥१९॥ विष्णुदास विमानांत बसून विष्णुलोकास जाऊं लागला; तेव्हां दीक्षित चोलराजानें त्याला पाहिलें ॥२०॥ राजा वैकुंठास जाणाऱ्या विष्णुदासाला पाहून मुद्गलास मोठ्यानें हांक मारुन म्हणाला ॥२१॥ चोल म्हणाला - ज्याच्याशीं स्पर्धा करुन मी यज्ञ दानादिक केलें तो विष्णुदास, विष्णुरुप धारण करुन वैकुंठास चालला ॥२२॥ मी यज्ञकर्ता होऊन या विष्णुक्षेत्रांत तुजकडून अग्नींत हवन केलें व उत्तम दानें देऊन ब्राह्मण संतुष्ट केले ॥२३॥ तथापि अजूनही मला हरि प्रसन्न होत नाहींत विष्णुदासाच्या भक्तीला हरींनीं साक्षात्कार दिला ॥२४॥ याकरितां, दानांनीं व यज्ञांनीं विष्णु प्रसन्न होत नाहीं तर त्याचें दर्शन होण्याला भक्ति हेंच मुख्य कारण आहे ॥२५॥ गण म्हणतातः-- राजा याप्रमाणें बोलून, लहानपणापासून दीक्षित असल्यामुळें त्याला पुत्र झाला नाहीं, म्हणून त्यानें बहिणीच्या मुलाला राज्यावर बसविलें ॥२६॥ अद्यापि त्या देशांत चोल राजानें नियम केल्याप्रमाणे तेव्हांपासून राजाच्या बहिणीच्या मुलालाच राज्य मिळतें ॥२७॥ नंतर राजा यज्ञमंडपांत येऊन यज्ञकुंडापुढें उभा राहिला व विष्णूला बोलावून तीन वेळ मोठ्यानें म्हणाला कीं ॥२८॥ हे विष्णो ! मला काया वाचा मनें करुन तुझी स्थिर भक्ति दे. याप्रमाणें बोलून सर्व लोक पाहात असतां त्यांच्या समक्ष त्यानें अग्निकुंडांत उडी टाकिली ॥२९॥ तेव्हां मुद्गलाला राग आला व रागाचे भरांत त्यानें आपली शेंडी उपटली. म्हणून अद्यापि त्याचे गोत्रज मुंजींत शेंडी काढितात ॥३०॥ चोल राजा कुंडांत उडी टाकीत आहे इतक्यांत विष्णु कुंडांत प्रगट झाले व त्यांनी राजाला आलिंगन देऊन विमानांत बसविलें ॥३१॥ त्याला आलिंगन देऊन व सारुप्य देऊन त्याला विमानांत घेऊन इंद्रादिकदेवांसह विष्णु वैकुंठास गेले ॥३२॥ नारद म्हणालेः-- जो विष्णुदास तो पुण्यशील नांवाचा व जो चोलराजा तो सुशील नांवाचा असे हे दोघे विष्णूसारखें रुप धारण करणारे असे झाले. त्यांना रमापति विष्णूंनी आपले द्वारीं राहणारे द्वारपालगण केलें ॥३३॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये द्वाविशोऽध्यायः ॥२२॥

# अध्याय २३

धर्मदत्त विचारतोः-- जय आणि विजय या नांवाचे दोघे विष्णूचे द्वारपाळ आहेत असे मीं ऐकिलें तर त्यांना विष्णुसारुप्य मिळण्याला त्यांनीं कोणतें पुण्य केलें होतें ॥१॥गण म्हणतातः-- तृणबिंदूची कन्या देवहूती तिला कर्दम ऋषीच्या कृपेनें जय थोरला व विजय धाकटा असे दोन मुलगे झाले ॥२॥ देवहूतीचे ठिकाणीं मागाहून योग व धर्म जाणणारा असा कपिल झाला ॥३॥ जय व विजय विष्णुभक्तीमध्यें अगदीं निमग्न होते. ते इंद्रियांचीं कर्मे भगवंताकडे लावून धर्मानें वागणारे असे होते ॥४॥ नित्य अष्टाक्षरी नारायण मंत्राचा जप करुन विष्णूचीं व्रतें करीत होते, म्हणून त्यांना विष्णु पूजासमयीं साक्षात् दर्शन देत असत ॥५॥ ते यज्ञकर्मांत कुशल म्हणून मरुतराजानें त्यांना यज्ञाकरितां बोलाविलें. देव ऋषिगणांनीं पूजित असे ते जय विजय मरुताकडे गेले ॥६॥ तेथें जय ब्रह्मा झाला व विजय याजक झाला. नंतर त्यांनीं संपूर्ण यज्ञविधि परिपूर्ण केला ॥७॥ मरुत राजानें अवभृतस्नान करुन त्यांना पुष्कळ द्रव्य दिलें, तें द्रव्य घेऊन ते आपल्या आश्रमाला आले ॥८॥ विष्णूची पूजा व यज्ञ वगैरे करण्याकरितां ते द्रव्याचा विभाग करुं लागले. विभाग करितांना दोघांत स्पर्धा उत्पन्न झाली ॥९॥ जय म्हणाला दोन भाग बरोबर करावे. विजय म्हणाला - तसें नाहीं. ज्याला जेवढें मिळालें, तेवढें त्यानें घ्यावें ॥१०॥ तेव्हां जयानें संतापून लोभी विजयाला शाप दिला कीं, तूं घेऊन देत नाहींस म्हणून ग्राह म्हणजे नक्र हो ॥११॥ विजयानें त्याचा तो शाप ऐकून जयाला शाप दिला कीं, मदानें भ्रांत होऊन मला शाप दिलास, तर तूं मातंग म्हणजे हत्ती हो ॥१२॥ नंतर रोजच्याप्रमाणें ते विष्णूची पूजा करीत असतां त्यांनीं ती शापाची हकीकत प्रगट झालेल्या देवाला सांगितली व शापापासून मुक्तता व्हावी म्हणून रमापति भगवंताची प्रार्थना करुं लागले ॥१३॥ जय विजय म्हणतातः-- देवा ! आम्ही तुझ्या भक्तांनीं नक्र व हत्ती यांच्या जन्माला कसें जावें ? याकरितां दयासागरा, देवा ! आमचा शाप नाहींसा करा ॥१४॥ भगवान् म्हणालेः-- माझ्या भक्तांचे वचन कधींही खोटें होणार नाहीं तें भक्तवचन मला कधीं विरुद्ध करितां येत नाहीं ॥१५॥ मागें मी प्रह्लादाच्या वचनाकरितां खांबांत प्रगट झालों. अंबरीषाच्या वचनाकरितां गर्भवास सोसले ॥१६॥ म्हणून तुम्हींच परस्पर दिलेले शाप भोगून नंतर माझे अक्षयस्थानाला प्राप्त व्हा. असें म्हणून हरि अंतर्धान पावले ॥१७॥ गण म्हणतातः-- नंतर ते गंडकीनदीच्या तीरीं नक्र व हत्ती झाले. पूर्वपुण्यानें त्यांना पूर्वीच्या जन्माचें स्मरण राहून ते विष्णूची व्रतें व भक्ती करीत होते ॥१८॥ एकदां तो हत्ती कार्तिकमासीं गंडकींत स्नानाला गेला असतां, नक्राला शापाची आठवण होऊन त्यानें त्या हत्तीला धरिलें ॥१९॥नक्रानें धरिलें तेव्हां त्या हत्तीनें विष्णूचें स्मरण केलें; तेव्हां शंख चक्र गदा धारण केलेले असे विष्णु तेथें प्रगट झाले ॥२०॥ त्यांनीं चक्र मारुन नक्र व हत्ती यांना बाहेर काढिलेंख व त्यांना भगवंतांनीं आपले रुप देऊन वैकुंठास नेलें ॥२१॥ तेव्हांपासून तें स्थान हरिक्षेत्र या नांवानें प्रसिद्ध झालें. चक्राच्या आघातामुळें तेथील धोंडे देखील चक्रचिह्नांकित झाले आहेत ॥२२॥ ते हे तूं विचारलेले प्रसिद्ध जय विजय नेहमीं विष्णूला प्रिय असणारे, देवाच्या द्वारांत आहेत ॥२३॥याकरितां तूंही धर्म जाणून निरंतर विष्णुव्रत

करुन मत्सर व गर्व सोडून सर्वांवर समदृष्टि ठेवणारा असा हो ॥२४॥ तूळ, मकर, मेष या संक्रांतीचे कार्तिक, माघ व वैशाख या महिन्यांत नेहमीं प्रातः स्नान कर एकादशीव्रत करुन तुलसीचें रक्षण कर ॥२५॥ ब्राह्मण, गाई व वैष्णव यांची सेवा कर. मसुरा, कांजी व वांगीं खाऊं नको. ॥२६॥ म्हणजे आमच्याप्रमाणेंच धर्मदत्ता ! तूं त्या विष्णूच्या भक्तीनें देह सोडल्यावर उत्तम जें विष्णूचें स्थान वैकुंठ, ते पावशील ॥२७॥ विष्णूला संतुष्ट करणारें हें व्रत, तूं जन्मापासून केलेंस त्यापेक्षा यज्ञ, दान, तप, तीर्थे हीं अधिक नाहींत ॥२८॥ हे ब्राह्मणश्रेष्ठा ! तूं धन्य आहेस; कारण तूं विष्णूला प्रिय असें कार्तिकव्रत केलेंस व त्याचें अर्धे पुण्य कलहेला मिळाल्यामुळें आम्ही विष्णूच्या वैकुंठलोकीं इला नेतों ॥२९॥ नारद म्हणतात - राजा ! याप्रमाणें धर्मदत्ताला उपदेश करुन, ते गण त्या कलहेसह विमानांत बसून, वैकुंठास निघून गेले ॥३०॥ प्रत्यक्ष अनुभव आलेला असा धर्मदत्त नित्य कार्तिकादिव्रत करीत असतां, देह सोडल्यावर तो दोन्ही स्त्रियांसहवर्तमान वैकुंठास गेला ॥३१॥ ही पूर्वी घडलेली कथा जो कोणी ऐकेल व दुसऱ्याला श्रवण करवील, त्याला विष्णूच्या कृपेनें हरीची प्राप्ति करुन देणारी बुद्धि उत्पन्न होईल ॥३२॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये त्रयोविंशोऽध्यायः ॥२३॥

## अध्याय २४

पृथु म्हणतात - नारदा ! कृष्णा व वेण्या यांच्या तीरीं, शिव व विष्णु यांच्या वाण्याच्या देहांतून पिशाचीण कलहेला काढून टाकिली असें आपण पूर्वी सांगितलें ॥१॥ तर हे धर्मज्ञा ! हा प्रभाव त्या नद्यांचा, कीं त्या क्षेत्राचें सामर्थ्य हे आपण मला सांगा. कारण मला त्या सामर्थ्यांचा मोठा चमत्कार वाटला ॥२॥ नारद म्हणतातः-- ही कृष्णानदी प्रत्यक्ष विष्णूचें स्वरुप व वेण्या शिवस्वरुप अशा आहेत, त्या कृष्णावेणीच्या संगमाचा महिमा वर्णन करण्यास चतुर्मुख ब्रह्मदेवही समर्थ नाहीं ॥३॥ तथापि कृष्णा - वेणींची उत्पत्ति तुला सांगतों ऐक. पूर्वी चाक्षुप मनूच्या मन्वंतरामध्यें, रम्य अशा सह्याद्रि पर्वताच्या शिखरावर यज्ञ करावा असा विचार करुन ब्रह्मदेवानें त्या यज्ञाकरितां सर्व देवांस बोलाविलें. त्यांच्यासह त्यानें यज्ञाची तयारी केली ॥४॥५॥ विष्णु शंकर यांसह आपण त्या पर्वताच्या शिखरावर आला. तेथें भृगु आदिकरुन सर्व ऋषीनी उत्तम, ब्राह्म मुहूर्तावर ब्रह्मदेवाला यज्ञदीक्षा देण्याकरितां तेथें आदरानें सभा भरविली; तेव्हां ऋषि ब्रह्मदेवाची थोरली स्त्री सावित्री हिला बोलाविते झाले ॥६॥७॥ तिला येण्यास उशीर लागला, तेव्हां भृगु विष्णूला विचारते झाले - भृगु म्हणतात - हे विष्णो ! सावित्रीला आपण बोलाविलें तरी ती लौकर कां येत नाहीं ॥८॥ मुहुर्त संपण्याची वेळ आली; दीक्षाविधि कसा संपूर्ण होणार ? विष्णु म्हणाले - सावित्री लौकर येत नाहीं, तर गायत्री येथें आहे; तिजकडून कार्य पूर्ण करावें. पुण्यकार्यांत ब्रह्मदेवाची ही पत्नी नाहीं काय ॥९॥ नारद म्हणतात - या विष्णूच्या म्हणण्याला शंकरांनींही अनुमोदन दिलें ॥१०॥ हें भाषण ऐकून, भृगुनें ब्रह्मदेवाच्या उजव्या बाजूला गायत्रीला बसवून पुण्याहवाचनादि यज्ञाचा दीक्षाविधि केला ॥११॥ हे राजा ! तें ब्रह्मदेवाचें दीक्षाविधीचें काम ऋषि

चालवीत आहेत इतक्यांत त्या यज्ञस्थळाला सावित्री आली ॥१२॥ हे राजा ! तेव्हां ब्रह्मदेवासह गायत्रीला दीक्षाविधि झाला असें पाहून, सवतीमत्सर मनांत येऊन रागानें सावित्री बोलती झाली ॥१३॥ सावित्री म्हणते - जेथें पूजेला योग्य नाहींत त्यांची पूजा होते, पूज्य आहेत त्यांचा अपमान होतो तेथें दुष्काळ, मरण व भय हीं तीन उत्पन्न होतात ॥१४॥ माझ्या स्थानावर या माझ्याहून धाकटीला तुम्हीं बसविले, म्हणून तुम्ही जड देहाचे असे नदी रुप व्हाल ॥१५॥ ही गायत्री ब्रह्मदेवाच्या उजव्या बाजूला माझ्या आसनावर बसली म्हणून लोकांना न दिसणारी अशी गुप्तरुपी नदी होऊन राहील ॥१६॥ नारद म्हणतात - याप्रमाणें खरेचा शाप ऐकून, संतापानेंच जिचे ओंठ थरथर कांपताहेत अशी गायत्री उठली व देवांनी निवारण केलें असतांही तिनें सावित्रीला शाप दिला ॥१७॥ गायत्री म्हणते - ब्रह्मदेव जसा तुझा पति तसा माझाही पति आहे. असें असतां तूं मला व्यर्थ शाप दिलास. तर मजप्रमाणें तूंही नदी हो ॥१८॥ नारद म्हणाले - राजा ! तेव्हां मोठा हाहाःकार झाला. शंकर विष्णु आदिकरुन सर्व देव सावित्रीला नमस्कार करुन तिची विनंति करु लागले ॥१९॥ देव म्हणाले - हे देवि ! ब्रह्मादिक सर्व देवांना तूं शाप दिलास कीं, आम्ही आतां सर्व जड अशा नद्या होऊं ॥२०॥ परंतु आम्ही जड नद्या झालों तर त्या योगानें आमचे व्यवहार बंद राहून हें त्रैलोक्य खरोखर नाश पावेल. तूं फार अविचारानें दिलेल्या या शापाचें निवारण कर ॥२१॥ सावित्री म्हणाली - हे देवहो ! तुम्ही यज्ञाचे आरंभी गणपतिपूजन केलें नाहीं, म्हणुन माझ्या क्रोधापासून विघ्न उत्पन्न झालें असे वाटतें ॥२२॥ आतां माझें भाषण कधींही खोटें होऊं शकणार नाहीं, म्हणून हे देवहो ! तुम्ही आतां अंशरुपानें नद्या व्हा ॥२३॥ व आम्ही दोघी सवती पश्चिमेकडे वाहणाऱ्या अशा अंशरुपानेंच नद्या होऊं ॥२४॥ नारद म्हणाले - हे राजा ! असें तिचें भाषण ऐकून त्या कालीं ब्रह्मा विष्णु व शंकर हे आपआपल्या अंशानें नद्या झाले ॥२५॥ त्या नद्यांत विष्णु कृष्णा नदी, शंकर वेण्या नदी व ब्रह्मदेव ककुद्मती ' कोयना ' नदी, याप्रमाणे पृथक् पृथक् अंशानें नदीरुप झाले ॥२६॥ सर्व देवही आपआपल्या अंशानें सह्याद्रि शिखरापासून निरनिराळया लहान लहान नद्या झाले ॥२७॥ देवांचे अंश ते पूर्वेकडे वाहणाऱ्या नद्या व त्यांच्या स्त्रियांचे अंश त्या पश्चिमेकडे वाहणाऱ्या नद्या असे शेंकडों उदकप्रवाह झाले ॥२८॥ गायत्री व सावित्री या जोडीनें पश्चिमेकडे एकप्रवाहानें वाहणाऱ्या नद्या झाल्या व त्या एकत्र असल्याकारणानें सावित्री हें एकच नांव पावल्या ॥२९॥ ब्रह्मदेवानें यज्ञाचे वेळीं तेथें विष्णु व शंकर यांची स्थापना केली; ते तेथें महाबळेश्वर व अतिबळेश्वर या नांवाने प्रसिद्ध झाले ॥३०॥ ज्यामध्यें सर्व ब्रह्मादिदेव आपापल्या अंशांनी राहतात त्यांतील कृष्णा व वेण्या या दोन नद्यांचे माहात्म्य वर्णन करण्यास मी समर्थ नाहीं ॥३१॥ हें पाप हरण करणारें कृष्णावेणीचें माहात्म्य, जो भक्तीनें श्रवण करील किंवा दुसऱ्याला श्रवण करवील त्या मनुष्याला त्यांचें दर्शन स्नान व यात्रा केल्याचें संपूर्ण पुण्यफळ प्राप्त होईल ॥३२॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये चतुर्विंशोऽध्यायः ॥२४॥

## अध्याय २५

श्रीकृष्ण म्हणालेः- हे प्रिये सत्यभामे, याप्रमाणें नारदाचें भाषण ऐकून पृथुराजाच्या मनाला अद्भुत कथेबद्दल विस्मय व आनंद झाला. नंतर नारदाची उत्तम प्रकारे पूजा करुन त्यांना निरोप दिला ॥१॥ त्या कारणाकरितां माघमास, कार्तिकेमास व एकदशी हीं तीन व्रतें मला फार प्रिय आहेत ॥२॥ वनस्पतींत तुलसी, महिन्यांत कार्तिकमास, तिथींत एकादशी तिथी व क्षेत्रांत द्वारका हीं मला फार प्रिय आहेत ॥३॥ इंद्रियनिग्रह करुन या तिहींचे जो सेवन करील तो मला जसा फार प्रिय होतो, तसा यज्ञादिकांनीं प्रिय होणार नाहीं ॥४॥ या व्रतत्रयाचें सेवन करणाराला माझे कृपेनें पातकासंबंधी भय करण्याचें मुळींच कारण नाहीं ॥५॥ सत्यभामा म्हणतेः-- हे नाथ ! तुम्ही जें दुसऱ्यानें दिलेल्या पुण्यानें कलहा मुक्तिला गेली असें सांगितले, हें मोठें आश्चर्यकारक आहे ॥६॥ असें सामर्थ्य ह्या कार्तिकमासाचें आहे म्हणून तुम्हाला तो प्रिय आहे कीं त्यांतील केवळ स्नानाच्या पुण्यानें पतिद्रोहादि पातकें गेलीं ॥७॥ दुसऱ्यांना केलेलें पुण्य दिलें तर मिळतें, न दिलेलें पुण्य मिळण्याचा कांहीं मार्ग आहे कीं नाहीं तें सांगा ॥८॥ श्रीकृष्ण म्हणालेः-- दुसऱ्यांनीं न दिलेलीं पुण्यपाताकें जशीं ज्या कर्मानी प्राप्त होतात तें तुला विस्तारानें सांगतों, श्रवण कर ॥९॥ कृतादि तीन युगांमध्यें कर्म करणाराचे फलभागी क्रमानें देश, गांव व कुल हीं होतात, कलींत मात्र पापपुण्य करणारासच सुखदुःख फल भोगावें लागतें ॥१०॥ संसर्ग न करितां फल कसें प्राप्त होतें त्याची व्यवस्था सांगितली; आतां संसर्गापासून पाप पुण्य दुसऱ्यास कसें प्राप्त होतें तें ऐक ॥११॥ एकत्र मैथुनानें, विवाहादि शरीरसंबंध केल्यानें, एकत्र पात्रांत भोजन केल्यानें, पुण्य पाप जें असेल त्याचें अर्ध फल प्राप्त होतें ॥१२॥ अध्ययन शिकविल्याने, दुसऱ्याचें याज्ञिक केल्यानें व एका पंक्तीला जेवल्यानेंही, पापपुण्याचा चवथा भाग अप्रत्यक्ष पर्यायानें प्राप्त होतो ॥१३॥ एका आसनावर बसल्यानें, एका यानांत बसल्यानें, अंगाला अंग लावल्यामुळे व दुसऱ्याचा उच्छास लागल्यानें त्याच्या पापपुण्याचा सहावा भाग प्राप्त होतो ॥१४॥ स्पर्शास्पर्श केल्यानें, भाषण केल्यानें व दुसऱ्याची स्तुति केल्यानें, त्याच्या पापपुण्याचा दहावा भाग प्राप्त होतो ॥१५॥ एकाद्याची भेट घेणें अथवा त्याच गोष्टी ऐकणें, व त्याचें स्वरुप मनांत आणणें यापासून त्याचे पापपुण्याचा शंभरावा हिस्सा प्राप्त होतो ॥१६॥ जो दुसऱ्याची निंदा, कपट व धिक्कार करतो, तो आपलें पुण्य त्याला देतो व त्याचें पातक आपण घेतो ॥१७॥ जो मनुष्य पुण्य करणाराची सेवा करितो तो त्याची स्त्री, चाकर किंवा शिष्य नसेल व सेवेप्रमाणें त्याला द्रव्य दिलें नसेल तर तोही सेवेच्या योग्यतेप्रमाणें पुण्य करणाराचें पुण्यांशाचा भागी होतो ॥१८॥१९॥ एका पंक्तीला जेवणारांकरितां वाढलेल्या पात्रांचें जो उल्लंघन करील तो त्याला स्वपुण्याचा सहावा हिस्सा देईल ॥२०॥ स्नानसंध्यादिक करीत असतां जो दुसऱ्याला स्पर्श करील किंवा त्याशीं भाषण करील, त्याला आपले कर्माच्या पुण्याचा सहावा हिस्सा देईल ॥२१॥ धर्मकृत्याकरतां जो दुसऱ्याजवळ द्रव्य मागतो व त्या द्रव्यानें जें धर्मकृत्य करितो त्या धर्मकृत्याचें सर्व पुण्य द्रव्य देणाराला मिळतें ॥२२॥ दुसऱ्याचे द्रव्याचें हरण करुन जो पुण्यकर्म करितो त्याला द्रव्य चोरल्याचे पाप लागतें व पुण्यकर्माचें फल द्रव्याचे मालकाला मिळतें ॥२३॥ दुसऱ्यांचे ऋण परत न देतां जो मरतो, त्याचें पुण्य द्रव्याचे मानाप्रमाणें त्या सावकाराला मिळतें ॥२४॥ बुद्धि सांगणारा, अनुमोदन देणारा, साहित्य देणारा, बळ उत्पन्न करणारा हे

पापपुण्याचा सहावा हिस्सा घेणारे आहेत ॥२५॥ राजा आपल्या प्रजेच्या पापपुण्याचा सहावा हिस्सा घेतो ॥२६॥ शिष्यापासून गुरु, स्त्रीपासून पति, पुत्रापासून बाप; तसें पतीपासून स्त्री हीं पुण्याचा अर्धा भाग घेतात. मात्र ती स्त्री पतीच्या मर्जीप्रमाणें वागणारी, पतीला संतोष देणारी असावी ॥२७॥ दुसऱ्याकडून दानादिक पुण्यकर्म करविणाराचें पुण्य त्याचे ते करणारे चाकर किंवा पुत्र नसतील तर कर्त्याला सहावा भाग मिळतो ॥२८॥ वृत्ति देणारा, वृत्ति भोगणाराच्या पुण्याचा सहावा भाग घेतो; मात्र तो त्यापासून आपली किंवा दुसऱ्याची सेवा करुन घेणारा नसावा ॥२९॥ याप्रमाणें दुसऱ्यांनी केलेलीं पापपुण्यें, त्यांनी दिलीं नाहींत तरी प्राप्त होतात; कलीमध्यें हा नियम नाहीं. पापपुण्य करणारा ज्याचा तो आपल्या कर्माचें फळ भोगितो ॥३०॥ पूर्वी याविषयीं एक पुण्यकारक गोष्ट घडली ती तुला सांगतों ऐक. जी ऐकली असतां पुण्य व ज्ञान प्राप्त होतें ॥३१॥इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये पंचविशोऽध्यायः ॥२५॥

## अध्याय २६

श्रीकृष्ण म्हणतातः-- पूर्वी अवंती नगरामध्यें कोणी धनेश्वर नांवाचा ब्राह्मण होता. तो ब्राह्मणाचे कर्मापासून भ्रष्ट, दुष्टबुद्धी, पापकर्मे करणारा, मीठ, गूळ वगैरे रस, लोकरीचीं वस्त्रें, कातडी यांचा व्यापार करणारा, वरवर खरें पण खोटें बोलून वागणारा, चोरी, वेश्यागमन, दारु पिणें, जुगार खेळणें अशीं कर्मे करुन मनाला समाधान मानणारा असा होता ॥१॥२॥ व्यापार करण्याकरितां देशोदेश फिरत असतां, एकदां तो माहिष्मती नगरीला आला ॥३॥ महिष्मत राजानें तें नगर केलें म्हणून त्याला माहिष्मती असें नांव पडलें; पापनाशिनी नर्मदा नदीच्या तीराला ती नगरी आहे ॥४॥ तेथें कार्तिकव्रत करणारे नाना देशचे लोक पुष्कळ आलेले पाहून विक्री करण्याकरितां तो धनेश्वर तेथें एक महिनाभर राहिला ॥५॥ तो विक्रीकरितां माल घेऊन नर्मदेच्या तीरीं यात्रेकरी लोकांत फिरत असतां, स्नान, जप, देवपूजा करीत आहेत असे ब्राह्मण पाहता झाला ॥६॥ कोणी पुराण वाचीत आहेत, कोणी तें ऐकण्यांत निमग्न आहेत, कोणी विष्णुप्रीत्यर्थ नृत्य, गायन, वाद्यें वाजविणें वगैरे कामें करीत आहेत ॥७॥ कोनी मुद्रा गोपीचंदन लावून अंगावर तुळशीच्या माळा धारण केल्या आहेत असें जिकडे तिकडे पाहून धनेश्वराला मोठी मौज वाटली ॥८॥ याप्रमाणें नित्य हिंडत असतां, त्या वैष्णव लोकांचें दर्शन, भेट, भाषण, विष्णूंचे नामश्रवण यांचा त्याला लाभ होत होता ॥९॥ असा एक महिना तेथें असतां त्यानें ते विष्णुभक्त कार्तिकव्रताचें उद्यापन करीत आहेत व हरिजागर करीत आहेत असें पाहिलें ॥१०॥ पौर्णिमेच्या दिवशीं व्रत करणारे लोक ब्राह्मण व गाई यांची पूजा करुन ब्राह्मणांना भोजन व दक्षिणा देत आहेत ॥११॥ सूर्यास्तसमयीं त्रिपुरारि शंकराप्रीत्यर्थ दीपोत्सव करीत आहेत असें पाहिलें ॥१२॥ त्या कार्तिकमहिन्यांतील पौर्णिमातिथीला शंकरांनीं त्रिपुराला जाळिलें, म्हणून त्या दिवशीं भक्त मोठा दीपोस्तव करितात ॥१३॥ जो मजमध्यें व शंकरामध्यें भेद समजतो त्याची सर्व पुण्यकर्मे निष्फळ होतात ॥१४॥याप्रमाणें सर्व पुण्यकर्मे चाललीं आहेत,

असें पाहत पाहत तो धनेश्वर व्यापाराकरितां फिरत होता. इतक्यांत एक कृष्णसर्प त्याला चावला; तेव्हां तो विव्हळ होऊन पडला ॥१५॥ तो असा पडलेला पाहून दयाळु लोक त्याच्या भोंवतीं जमले व त्यांनीं तो सावध होण्याकरितां तुलसीमिश्रित पाणी त्याचे मुखावर शिंपडलें व तोंडांत घातलें. तोंच त्यानें प्राण सोडले ॥१६॥त्यानें प्राण सोडतांच यमदूत त्याला रागानें बांधून चावकानें मारीत मारीत यमपुरी संयमिनीला नेते झाले ॥१७॥ चित्रगुप्त त्याला पाहतांच त्याची निर्भर्त्सना करुन, त्यानें बाळपणापासून केलेलीं सर्व पातकें यमाला सांगूं लागला ॥१८॥ चित्रगुप्त म्हणालाः-- हे यमा, यानें उपजल्यापासून कांहीं देखील पुण्य केलें नाहीं. यानें इतकी पापें केलीं आहेत कीं, तीं सांगण्याला एक वर्षही पुरणार नाहीं ॥१९॥ हा दुष्ट केवळ पापाची मूर्ति दिसत आहे, म्हणून कल्पांतापर्यंत यानें नरकांत तळमळत पडावें ॥२०॥श्रीकृष्ण म्हणालेः-- याप्रमाणें चित्रगुप्ताचें भाषण ऐकून यम संतापला व आपले प्रलयकाळचें अग्नीप्रमाणें उग्ररुप प्रगट करुन दूताला म्हणाला ॥२१॥ यम म्हणतोः-- अरे, प्रेतपतींनो ! तुम्ही आपल्या मुद्गलांनी या दुष्ट पाप्याला मारीत मारीत कुंभीपाक नरकामध्यें टाकून द्या ॥२२॥ श्रीकृष्ण म्हणालेः-- त्या प्रेतपतींनीं मुद्गलानें त्याचें मस्तक फोडलें व ज्यामध्यें तेल कडकड कढत आहे अशा कुंभीपाकांत त्याला टाकिलें ॥२३॥ त्यास टाकतांच तो कुंभीपाक, जसा पूर्वी प्रल्हादाचे रक्षणाकरितां अग्नि थंड झाला तसा थंड झाला ॥२४॥ तो मोठा चमत्कार पाहून प्रेतपतींना विस्मय वाटला व त्यामुळें ते धांवत जाऊन यमाला सर्व हकीकत सांगूं लागले ॥२५॥ तें ऐकून यमानें प्रत्यक्ष जाऊन पाहिलें. तेव्हां त्याला चमत्कार वाटून, अहो ! हें काय आश्चर्य असें, बोलून त्या धनेश्वराला बोलावून विचारुं लागला ॥२६॥ इतक्यांत तेथें नारद आले, यमानें त्यांना पाहतांच त्यांची पूजा करुन त्यांना हें वर्तमान सांगितलें, तेव्हां त्या धनेश्वराला पाहून नारद म्हणाले ॥२७॥ नारद म्हणतातः-- हे अरुणनंदना, यमा हा नरक भोगण्याला योग्य नाहीं. कारण, याचे हातून शेवटीं नरकभोग चुकविण्याजोगें पुण्य घडलें आहे ॥२८॥ जो कोणी मनुष्य पुण्यकर्म करणारांचें दर्शन, स्पर्शन व त्यांशीं भाषण करील त्याला त्यांचे पुण्याचा सहावा भाग निश्चयानें मिळतो ॥२९॥ या धनेश्वरानें कार्तिकव्रत करणारांचें सख्य करुन एक महिना सहवास केला म्हणून त्यांचे पुण्याचा भाग याला मिळाला ॥३०॥ व त्यांची सेवा केली तिचें सर्व पुण्य याला मिळालें. म्हणून कार्तिकव्रतापासून किती पुण्य प्राप्त होतें त्याची गणती नाहीं ॥३१॥ कार्तिकव्रत करणारांचीं पातकें कितीही मोठीं असलीं तरी भक्तवत्सल विष्णु तीं सर्व नाहीशीं करितो ॥३२॥ म्हणून याचीं सर्व पापें गेलीं आहेत. वैष्णवांनीं याजवर अनुग्रह केला आहे; करितां हा नरक भोगण्यास योग्य नाहीं. याला सद्गतीच मिळाली पाहिजे ॥३४॥ आर्द्र व शुष्क पातकांनीं जसा नरक भोगावा लागतो, तसा पुण्यकर्मांनीं स्वर्ग प्राप्त होतो ॥३५॥ याजकरितां याचे हातून नकळत सहज पुण्य घडलें आहे, म्हणून हा हे सर्व पापामुळें भोगावे लागणारे नरक पाहून नंतर यक्षाचे योनींत राहील ॥३६॥ श्रीकृष्ण म्हणालेः-- याप्रमाणें बोलून नारद केल्यानंतर नारदाच्या भाषणानें त्या धनेश्वराचें पुण्यकर्म ज्याला समजलें आहे असा तो यम आपले दूतांकडून त्या धनेश्वराला नरकदर्शन करवून आणविता झाला ॥३७॥ इति श्रीकर्तिकमाहात्म्ये षड्विंशतितमोध्यायः ॥२६॥

# अध्याय २७

श्रीकृष्ण म्हणालेः-- नंतर प्रेतपति यमाच्या आज्ञेनें धनेश्वराला नेऊन सर्व नरक दाखवीत असतां म्हणाला ॥१॥ प्रेतपति म्हणतोः-- हे धनेश्वरा ! हे महाभयंकर नरक पहा. या नरकांमध्यें पापी लोकांना यमाचे दूत नेऊन पचवितात ॥२॥ हा तापलेल्या वाळूचा तप्तवालुक नांवाचा भयंकर नरक पहा; यांत हे पापी लोक देह भाजत असतां ओरडत आहेत ॥३॥ जे वैश्वदेवाचे अंतीं भुकेलेला अतिथी आला असतां त्याची पूजा करुन अन्नदान करीत नाहींत, ते या तप्तवालुक नरकांत आपले कर्मानें भाजले जातात ॥४॥जे गुरु, ब्राह्मण, अग्नि, गाई, अभिषिक्त राजे व देव यांना ताडन करितात, ते आपआपल्या कर्मानें या नरकांत भाजले जातात ॥५॥ या नरकाचे दुसरे सहा प्रकार आहेत. नाना प्रकारचे पातक्यांना ते प्राप्त होतात. हा दुसरा अंधतामिस्र नांवाचा मोठा नरक पहा ॥६॥ येथें अंधार असून यांत पापी लोकांना सुईच्या अग्राप्रमाणें भयंकर मुखाच्या किड्यांनी, टोचून देहाला फाडून टाकलें जातें ॥७॥ याचेही सहा प्रकार आहेत; यांत कुत्रे, गिधाड इत्यादिक पक्ष्यांनी दुसऱ्याचा मर्मभेद करणारे पाप्याला पचविलें जातें ॥८॥ तिसरा क्रकच नांवाचा भयंकर नरक पहा; येथें पापी मनुष्याला करवतीनें कापून पीडा देतात ॥९॥ असिपत्र ( तरवारीचें ) वन आदिकरुन ह्याचे सहा प्रकार आहेत; जे दुसऱ्याच्या स्त्री पुत्र यांचा व इष्टमित्रांचा वियोग करवितात ते या नरकांत दुःख भोगताहेत पहा ॥१०॥ कोणाला तरवारीनें तरवारीनें तोडताहेत, कोणी तोडण्याचे भयानें पळताहेत असे हे पापी आरडत ओरडत पळत नरकांत पचताहेत ते पहा ॥११॥ अर्गल नांवाचा हा चौथा नरक पहा ॥१२॥ येथें यमाचे दूत नानाप्रकारच्या पाशांनीं पापी लोकांना बांधतात व अडसरांनीं मारतात. याचेही वधादि भेदानें सहा भेद आहेत ॥१३॥ कूटशाल्मली नांवाचा हा पांचवा नरक पहा, येथें अग्नीप्रमाणें संतप्त अशा कांट्यांनीं युक्त सावरी आहेत ॥१४॥ येथेंही पापीलोकांना सहा प्रकारच्या यातनांनीं दुःख देतात. जे दुसऱ्याची स्त्री हरण करितात, दुसऱ्याचा द्वेष करितात व दुसऱ्याचें द्रव्य घेतात, त्यांना येथें तप्तसावरीला बांधतात ॥१५॥ रक्तपूय नांवाचा हा सहावा घोर नरक पहा. येथें पापी मनुष्याला वर पाय खाली तोंड करुन रक्त, पू, यांमध्यें लोंबत सोडतात ॥१६॥ अभक्ष्य पदार्थ व मद्य मांसादि भक्षण करणारे, दुसऱ्याची निंदा करणारे व दुसऱ्याचें कपटानें छिद्र उघडकीस आणणारे, नीच यांना येथें मारतात, तोडतात, त्यामुळें ते मोठमोठ्यानें भयंकर ओरडतात. विगंध आदि करुन याचेही सहा प्रकार आहेत ॥१७॥ हे धनेश्वरा ! कुंभीपाक नांवाचा हा सातवा भयंकर नरक पहा ॥१८॥ तप्त तेल आदि करुन सहा प्रकारच्या द्रव्यांनीं याचे सहा प्रकार आहेत. ब्रह्महत्यादि महापातकें करणारे लोकांना यमाचे दूत येथें यातना भोगवितात ॥१९॥ हजारों वर्षे यमयातना जेथें भोगतात, ते हे चाळीसांपेक्षां जास्त रौरव नरक आहेत पहा ॥२०॥ न समजून घडलेलें तें शुष्कपातक व मुद्दाम केलेलें तें आर्द्र पातक, अशीं दोन प्रकारांनीं असलेली चौऱ्यांयशीं पातकें पृथक् पृथक् भेदांनीं आहेत ॥२१॥ तीं प्रकीर्ण, अपांक्तेय, मलिनीकरण, जातिभ्रंशकर, उपपातक, अतिपातक, महापातक अशीं सात प्रकारचीं मुख्य पातकें आहेत ॥२२॥ त्या सात पातकांनीं क्रमाप्रमाणे सात नरक भोगावे

लागतात ॥२३॥ तुला कार्तिकव्रत करणारांचा सहवास झाला. त्या पुण्यानें तुझे हे नरक चुकले ॥२४॥ श्रीकृष्ण म्हणाले - याप्रमाणें प्रेतपतीनें त्याला सर्व नरक दाखवून यक्ष लोकाला आणिलें ॥२५॥ व तो धनेश्वर तेथें धनयक्ष नांवाचा यक्ष होऊन कुबेराचा सेवक झाला ॥२६॥ त्याच्या नांवानें विश्वामित्रानें अयोध्येंत एक तीर्थ केलें आहे ॥२७॥ कार्तिकमासाचा एवढा महिमा आहे कीं, त्याचे योगानें सर्व भोग व मुक्ति मिळते व त्या व्रताचे दर्शनानें हीं सर्व पापें जाऊन मुक्ति मिळते ॥२८॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये सप्तविंशोऽध्यायः ॥२७॥

## अध्याय २८

सूत म्हणतात - राजा, श्रीकृष्ण याप्रमाणें सत्यभामेशीं असें अति प्रिय भाषण करुन संध्याकाळचा संध्याविधि करण्याकरितां मातोश्री देवकीच्या घरास गेले ॥१॥ सूत म्हणतात - ऋषीहो ! या प्रकाराचा कार्तिकव्रताचा महिमा पापनाश करणारा, विष्णूला प्रिय, भोग व मोक्ष देणारा असा तुम्हांला सांगितला ॥२॥ हरिजागर, प्रातः स्नान, तुलसीची सेवा, उद्यापन व दीपदान अशीं कार्तिकांत पांच व्रतें आहेत ॥३॥ अशा पांच प्रकारांनीं कार्तिकव्रत संपूर्ण होतें व त्यापासून सांगितल्याप्रमाणें भुक्तिमुक्ति आदिकरुन फळ मिळतें ॥४॥ ऋषि म्हणतातः-- हे सूता ! विष्णूला प्रिय असा हा कार्तिकव्रताचा महिमा इतिहासासह मोठा चमत्कारिक व आनंदकारक आपण सांगितला ॥५॥ त्याप्रमाणें हें कार्तिकव्रत पाप व दुःखनिवारणाकरितां आणि ऐश्वर्याची व मोक्षाची इच्छा करणारांनी अवश्य करावें ॥६॥ याप्रमाणें कार्तिकव्रत करणारा जर कदाचित् संकटांत असला व घोर अरण्यांत पडला किंवा व्याधींनीं पीडिला ॥७॥ तर त्यानें हें शुभ कार्तिकव्रत कसें करावें ? कारण मनुष्यांनीं हें अत्यंत फल देणारें कार्तिकव्रत अत्याज्य आहे ॥८॥ सूत म्हणालेः-- नेहमीं नेमानें व्रत करणारा याप्रमाणें संकटांत पडला असतां त्यानें कार्तिकव्रत कसें केलें असतां पूर्ण होईल ॥९॥ तें तुम्हांला सांगतों. हे ऋषिहो ! ऐका. कार्तिकव्रत करणारानें विष्णूच्या किंवा शिवाच्या देवालयांत हरिजागर करावा ॥१०॥ शिव विष्णूंची देवळें नसतील तर कोणत्याही देवालयांत करावा; अरण्यांत किंवा डोंगरावर असेल तर किंवा इतर विपत्तींत असेल तर ॥११॥ पिंपळाखालीं किंवा तुळशीच्या वनांत विष्णूशेजारी विष्णूचीं नामें, गीतें, पदें गावीं ॥१२॥ विष्णूच्या संनिध गायन केलें असतां, हजार गाई दान दिल्याचें पुण्य मिळतें व वाद्य वाजविणाराला वाजपेय यज्ञाचें फळ मिळतें ॥!३॥ नाचणाराला सर्व तीर्थांत स्नान केल्याचें पुण्य मिळतें; या सर्वांना द्रव्य देणाराला हें सर्व पुण्य मिळतें ॥१४॥ नृत्य, गीत पाहिल्यानें व ऐकल्यानें पुण्याचा सहावा भाग मिळतो. संकटांत असतां, जर कोठें स्नानाकरितां पापी न मिळेल तर ॥१५॥ अथवा आजारी असून स्नानाला अशक्त असेल तर विष्णूच्या नामांनीं मार्जन करावें. कोणास सांग उद्यापन करण्यास सामर्थ्य नसेल तर ॥१६॥ व्रत संपूर्ण होण्याकरितां शेवटीं ब्राह्मण भोजन घालावें. ब्राह्मण हे पृथ्वीवर विष्णूचीं अव्यक्तरुपी स्वरुपें आहेत ॥१७॥ त्यांचा संतोष झाला म्हणजे विष्णु सर्वदा संतुष्ट होतात. कोणास दीपदान देण्यास सामर्थ्य नसल्यास दुसऱ्यानें लाविलेल्या दिव्याची वात

सारावी ॥१८॥  किंवा त्या दिव्याचें प्रयत्नानें वातादिकांपासून रक्षण करावें. तुलसीवनादि न मिळाल्यास विष्णुभक्त ब्राह्मणाची पूजा करावी ॥१९॥  कारण, विष्णु आपल्या भक्तांजवळ सर्वदा राहतात. वैष्णव ब्राह्मण न मिळाल्यास व्रत करणारानें व्रत संपूर्ण होण्याकरितां गाई, पिंपळ, वड यांची सेवा करावी ॥२०॥  ऋषि म्हणालेः-- पिंपळ व वड हे ब्राह्मणाचे बरोबरीचे कसे सांगितले ॥२१॥  सर्व वृक्षांपेक्षां तेच पूज्यतम कशाकरितां केले ? सूत म्हणालेः-- भगवान विष्णूच, प्रत्यक्ष अश्वत्थरुपी आहेत; यांत संशय नाहीं ॥२२॥  वड हा रुद्ररुपी आहे व पळस ब्रह्मदेवस्वरुपी आहे. त्यांचें दर्शन व पूजा पापनाश करणारीं आहेत ॥२३॥  व त्यापासून दुःख विपत्ति, व्याधि व शत्रु यांचा नाश होतो. ऋषि म्हणतातः-- सूता ! ब्रह्मा, विष्णु व शंकर हे वृक्षरुप कसे झाले ॥२४॥  याविषयीं आम्हाला मोठी शंका उत्पन्न झाली आहे; तरी हे धर्मज्ञा ! ती कथा सांगा. सूत म्हणतातः-- पूर्वी देवांनीं पार्वती व शंकर यांचें सुरत चाललें असतां अग्नीला ब्राह्मणरुपानें पाठवून विघ्न केलें. तेव्हां रतिसुखांत विघ्न झालें म्हणून पार्वती संतापानें थरथर कंपायमान होऊन देवांना शाप देती झाली ॥२५॥२६॥ पार्वती म्हणालीः-- हे कृमिकीटादिक सुद्धां रतिसुख जाणतात, त्या रतिसुखाला विघ्न करणारे देवहो ! तुझी वृक्ष व्हा ॥२७॥  सूत म्हणालेः-- याप्रमाणें पार्वतीनें संतापून देवांना शाप दिला. त्यामुळें सर्व देवसमुदाय वृक्ष झाले ॥२८॥  हे ऋषिहो ! तेव्हांपासून विष्णु अश्वत्थ ( पिंपळ ) व शंकर वड झाले. पिंपळाला शनिवारीं स्पर्श करावा, इतर वारीं त्याला स्पर्श करुं नये ॥२९॥  इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये अष्टाविंशोध्यायः ॥२८॥

## अध्याय २९

ऋषि म्हणालेः-- हे सूता ! पिंपळाचा वृक्ष इतर दिवशीं शिवण्यास अयोग्य व शनिवारीं शिवण्यास योग्य कसा झाला हें सांगा ॥१॥  सूत म्हणालेः-- समुद्रमंथनापासून जीं रत्नें देवांनीं मिळविलीं, त्यांपैकीं लक्ष्मी व कौस्तुभ त्यांनीं विष्णूला दिलीं ॥२॥  जेव्हां विष्णु लक्ष्मीला आपल्या स्त्रीत्वानें वरुं लागले, तेव्हां लक्ष्मी त्या चक्रपाणी विष्णूची प्रार्थना करुं लागली ॥३॥  लक्ष्मी म्हणालीः-- थोरलीचा विवाह झाल्याशिवाय धाकटीचें लग्न कसें करितां ? याकरितां माझी थोरली बहीण अलक्ष्मी ॥४॥  हिचें लग्न करुन मग मला वरा. असाच परंपरेचा धर्म आहे. सूत म्हणालेः-- असें लक्ष्मीचें भाषण ऐकिलें तेव्हां श्रीविष्णूंनीं महान् तपस्वी उद्दालक ऋषि याला ती आक्काबाई दिली व त्यानें विष्णूचे आज्ञेनें वरली ॥५॥६॥  ती अलक्ष्मी मोठें तोड, दांत पांढरे, रजोगुण शरीर, लाल व विस्तृत डोळे, अंग व डोकीचे केंस रुक्ष, अशी होती ॥७॥  तो धर्मज्ञ ऋषि विष्णूच्या आज्ञेनें अशा त्या अलक्ष्मीचा स्वीकार करुन, वेदघोषानें युक्त अशा आपल्या आश्रमाला तिला घेऊन गेला ॥८॥  होमाच्या धुरानें सुगंधित झालेला व वेदांच्या घोषानें गर्जलेला असा तो आश्रम पाहून तिला दुःख झालें व ती पतीला म्हणाली ॥९॥  ज्येष्ठा म्हणालीः-- हा वेदध्वनियुक्त आश्रम मला राहण्याला योग्य नाहीं, हे ब्राह्मणा ! मला दुसरे ठिकाणीं ने. मी येथें येणार नाहीं ॥१०॥  उद्दालक म्हणालाः-- तूं येथें कां येत नाहींस ? येथें तुला अमान्य काय आहे ?

तुला राहण्याला योग्य जागा तरी कोणती तें मला सांग ॥११॥ ज्येष्ठा म्हणालीः-- जेथें वेदघोष होत असेल, अतिथीची पूजा होत असेल, यज्ञदानादिक कर्मे होत असतील, तेथें मी कधीं राहणार नाहीं ॥१२॥ जेथें नवराबायको एकमेकांत प्रीति करीत असतील व पितर व देव यांची जेथें पूजा होत असेल तेथें मी राहणार नाहीं ॥१३॥ जेथें व्यापारी नीतीनें वागणारे, कुशळ, धर्मानें चालणारे, गोड बोलणारे, गुरुची पूजा करणारे असे लोक जेथें आहेत तेथें मी कधींही राहाणार नाहीं ॥१४॥ जेथें प्रत्येक रात्रीं नवरा, बायकोचें भांडण असेल व अतिथि निराक्ष होऊन उपाशीं जेथून जात असेल, तेथें राहण्याची मला आवड आहे. ॥१५॥ वृद्ध व सज्जन यांचा व ब्राह्मणांचा जेथें अपमान होतो व जेथें कठोर भाषण बोलतात, तेथें मी नित्य राहतें ॥१६॥ द्यूत खेळणारे, दुसऱ्याचें द्रव्य हरण करणारे, परस्त्रीशीं रममाण होणारे असे लोक जेथें आहेत तेथें मी प्रेमानें राहतें ॥१७॥ जेथें गाईचा वध व मद्यप्राशन रात्रंदिवस चालतें व ब्रह्महत्यादिक पापें घडतात, त्या जागेची मला फार आवड आहे ॥१८॥ सूत म्हणालेः-- हें त्या ज्येष्ठेचें भाषण ऐकून उद्दालक खिन्नमुख झाला व विष्णूची आज्ञा मानून पुन्हा कांहीं बोलला नाहीं ॥१९॥ तो ज्येष्ठेला मान्य असें स्थल पाहण्याकरितां जेथें जेथें गेला, तेथें तेथें त्याची पूजा होत होती, तें पाहून ती ज्येष्ठा म्हणाली - अशा स्थलीं मी येत नाही. तेव्हां तो उद्दालकही तिजबरोबर फिरतां फिरतां थकून गेला ॥२०॥ नंतर उद्दालक त्या अलक्ष्मीला म्हणाला - उद्दालक म्हणतो - हे अलक्ष्मी ! मी तुला राहण्याला जागा पाहून येतों तोंपर्यंत या पिंपळाच्या बुंधाशी स्वस्थ बैस. सूत म्हणतातः-- उद्दालक याप्रमाणें तिला तेथें बसवून निघून गेला ॥२१॥२२॥ तिनें तेथें बसून बहुतकालपर्यत त्या उद्दालकाची वाट पाहिली, परंतु तो तिला भेटला नाहीं. तेव्हां नवरा टाकून गेला म्हणून दुःखित होत्साती ती अलक्ष्मी करुणस्वरानें रडूं लागली ॥२३॥ तिचें तें रडणें वैकुंठांत लक्ष्मीनें ऐकिलें, तेव्हां तिला दुःख होऊन ती विष्णूची प्रार्थना करुं लागली ॥२४॥ लक्ष्मी म्हणालीः-- हे स्वामिन् माझी थोरली बहीण नवऱ्यानें टाकल्यामुळें दुःखित आहे. तुमची माझ्यावर प्रीति असेल तर तुम्ही तिचें शांतवन करण्यास चलावें ॥२५॥ सूत म्हणालेः-- नंतर कृपानिधि विष्णु लक्ष्मीसह तेथें आले व तिचें शांतवन करुन तिला म्हणाले ॥२६॥ विष्णु म्हणतातः-- हे अलक्ष्मी ! तूं पिंपळाच्या बुंधाशीं कायम स्वस्थ बसून रहा. पिंपळ हा माझा अंशसंभव आहे, म्हणून मीही पिंपळाजवळ वास केला आहे ॥२७॥ जे गृहस्थाश्रमी दरवर्षी तुझी ज्येष्ठेची पूजा करितील त्यांचे घरीं ही तुझी धाकटी बहिण लक्ष्मी स्थिर वास करो ॥२८॥ सर्व स्त्रियांनीं नानाप्रकारचे बली, फुलें, धूप, इत्यादिकांनीं तुझी पूजा करावी. म्हणजे त्यांना लक्ष्मी प्रसन्न होईल ॥२९॥ ही कथा जो ऐकेल किंवा दुसऱ्याला ऐकवील, त्याचीं सर्व पापें नाहींशीं होऊन त्याला विष्णूचे सान्निध्य प्राप्त होईल ॥३०॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये एकोनत्रिंशोऽध्यायः ॥२९॥

## अध्याय ३०

सूत म्हणालेः-- याप्रमाणें श्रीकृष्णाचें भाषण ऐकून भाग्यशाली सत्राजिताची कन्या सत्यभामा भाषण करुं लागली ॥१॥ सत्या म्हणालीः-- हे प्रभो ! कर्तिकाचें माहात्म्य विस्तारानें ऐकिलें नाहीं. सर्व महिन्यांत कार्तिक महिनाच श्रेष्ठ कसा झाला हें मला सांगा ॥२॥ श्रीकृष्ण म्हणतातः-- सत्यभामे ! तूं कार्तिकव्रत विचारिलेंस हें उत्तम केलेंस; पूर्वी श्रेष्ठ सूतांनीं शौनकादिऋषींना ही कथा सांगितली आहे, ती तूं ऐक ॥३॥ सूत म्हणालेः-- हे ऋषिश्रेष्ठहो ! पूर्वी प्रश्न केला असतां शंकरांनीं कार्तिकस्वामीला जें सांगितलें आहे तें तुम्हांला सांगतों ऐका. ॥४॥ कार्तिकस्वामी म्हणालेः-- हे विष्णुभक्ता शंकरा ! तुम्ही मला विष्णूच्या पुष्कळ प्रिय व रहस्य कथा सांगितल्या त्या मी ऐकिल्या ॥५॥ आतां संसारसागरामध्यें ज्या दुःखलहरी प्राप्त होतात, त्यांतून तरुन पार निघण्याला कांहीं उपाय सांगा ॥६॥ ज्या योगानें मनुष्यें दुःखसमुद्रांतून तरुन उद्धार पावतात अशा कार्तिकमासाच्या व्रताचा व कार्तिकस्नानाचा विधि सांगा ॥७॥ वैष्णवधर्माचें फल विस्तारानें सांगा कीं, ज्या धर्माच्या सामर्थ्यानें लोक वैकुंठास जातील ॥८॥ दीपदानाचें माहात्म्य, अगस्त्याच्या फुलाचें, गोपीचंदनाचें व तुळसीचें माहात्म्य सांगा ॥९॥ मालिनी फुलांचें, कमळांचें, आंवळयाचें तसेंच दंवण्याचें, केवड्याच्या फुलाचें माहात्म्य व देवाचे नैवद्याचें व तीर्थोदकाचें माहात्म्य व माघस्नानाचें फल सांगा ॥१०॥११॥ तसेंच पळसाच्या पानावर भोजनाचें फल, देवाच्या आरतीचें, नंदादीपाचें व दुसऱ्याचा दिवा सारण्याचें माहात्म्य सांगा ॥१२॥ पुष्कर क्षेत्राचें, शूकर क्षेत्राचें, शालिग्रामाचें माहात्म्य व स्वस्तिक घालण्याचें विधान सांगा ॥१३॥ दानांचें, परान्न सोडल्याचें, महिनाभर उपोषण केल्याचें व पलंगशयन सोडल्याचें फल सांगा ॥!४॥ दीपावलीचें, प्रबोधिनीएकादशीचें व भीष्मपंचकाचें माहात्म्य, विस्तारानें कृपा करुन सांगा ॥१५॥ शंकर म्हणालेः-- पुत्रा ! तूं लोकांचा उद्धार व्हावा म्हणून फार चांगलें विचारलेंस. तुझ्यासारखा विष्णुभक्त कोणी नाहीं म्हणून तुला हें विस्तारानें सांगतों श्रवण कर ॥१६॥ तूं सत्पुत्र आहेस. म्हणून माझा उद्धार झाला; तुझी विष्णूचे ठिकाणीं दृढ व निश्चल भक्ति आहे ॥१७॥ जो ब्राह्मण मनुष्याला वैष्णवधर्म सांगतो त्या ब्राह्मणाला समुद्रवलयांकित पृथ्वीदान केल्याचें पुण्य प्राप्त होतें ॥१८॥ सर्व तीर्थे व सर्व दानें यांचें पुण्य एकत्र केलें तरी, तें कार्तिक महिन्याच्या पुण्याच्या कोटि हिशाचीही बरोबरी करणार नाहीं ॥१९॥ एकीकडे गोप्रदानें, दक्षिणायुक्त सर्व यज्ञ एकीकडे, पुष्करक्षेत्र, हिमालय व कुरुक्षेत्र यांचे ठिकाणीं वस्ती व ॥२०॥मथुरा काशी वराह या क्षेत्रांत वास हीं एकीकडे; केशवाला प्रिय असा कार्तिकमास एकटा एकीकडे; या सर्वाबरोबर आहे ॥२१॥सूत म्हणालेः-- ऋषिहो ! शंकर याप्रमाणें बोलून पुन्हा कार्तिकस्नानाचें माहात्म्य विस्तारानें सांगतों असें म्हणाले ॥२२॥ शंकर म्हणालेः-- कार्तिकेया ! कृतयुग ब्राह्मणांचें, त्रेतायुग क्षत्रियांचें, द्वापार युग वैश्यांचे आणि कलियुग शूद्रांचें असें सांगितलें आहे ॥२३॥पुत्रा ! कलीमध्यें मनुष्याला स्नानाचा आळस असतो; तरी कार्तिकस्नान व माघस्नान यांचें फल सांगतों ॥२४॥ ज्याचे हात, पाय, वाणी व मन हीं चांगलीं स्वाधीन आहेत; विद्या, तप, कीर्ति चांगलीं आहेत त्यालाच तीर्थाचें सर्व फळ मिळतें ॥२५॥ ज्याला श्रद्धा नाहीं, मन पापी आहे, नास्तिक आहे, मनाचा कुचका आहे व भलतीच मनाप्रमाणें बडबड करणारा या पांचांना तीर्थाचें फल मिळत नाहीं ॥२६॥ जो ब्राह्मण

प्रातःकालीं उठून नेहमीं तीर्थात प्रातः स्नान करितो, त्याचीं सर्व पापें नाहींशी होऊन त्याला ब्रह्मप्राप्ति होते ॥२७॥ षडानना ! ज्ञात्यांनीं स्नानाचे वायव्य, वारुण, दिव्य व ब्राह्म असे चार प्रकार सांगितले आहेत ॥२८॥ सत्यभामा म्हणालीः-- हे प्रभो श्रीकृष्ण ! या चार प्रकारच्या स्नानांचीं लक्षणें सांगा; म्हणजे तीं ऐकून मी आपले गृहांत समाधानानें राहीन ॥२९॥ श्रीकृष्ण म्हणालेः-- हे प्रिये ! गाईची धुळी अंगावर येऊं देणें तें वायव्यस्नान, समुद्र नद्या इत्यादिकांच्या पाण्यानें केलेलें तें वारुणस्नान, ब्राह्मणांच्या मंत्रांनीं केलेलें ब्राह्मस्नान व पर्जन्यांत उभें राहून केलेलें तें दिव्य अथवा भास्करस्नान ॥३०॥ ह्या सर्व स्नानांमध्यें वारुणस्नान श्रेष्ठ आहे. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांनीं समंत्रक स्नान करावें ॥३१॥ हे षडानना ! शूद्रांनीं व स्त्रियांनीं अमंत्रक स्नान करावें. बाल, तरुण, वृद्ध असे पुरुष, स्त्रिया व नपुंसक, हे सर्व कार्तिक व माघस्नानानें सर्व पापांपासून मुक्त होतात; कार्तिकस्नान करणारे सर्व इच्छित फलाला पावतात ॥३२॥३३॥ इति श्रीपद्मपुराणे उत्तरखंण्डे कार्तिकमहात्म्ये त्रिंशोऽध्यायः ॥३०॥

## अध्याय ३१

सूत म्हणालेः-- वृषध्वजशंकर भक्तिमान् कार्तिकस्वामीस जवळ बोलावून पुन्हा कथन करुं लागले ॥१॥ शंकर म्हणालेः-- विष्णूला प्रिय, कार्तिक महिना सर्व महिन्यांत उत्तम आहे; कलियुगांत या महिन्यामध्यें तेहतीस कोटी देव वास्तव्य करितात ॥२॥ कार्तिकमहिन्यांत ब्राह्मणाला भोजन घालावें, तिल, धेनु, सोनें, रुपें, जमीन, वस्त्रें, गोप्रदानें विष्णुप्रीतीकरितां प्रेमानें देतात. सर्व दानांमध्यें कन्यादान श्रेष्ठ आहे ॥३॥४॥ जे यथाविधि ब्राह्मणाला कन्या दान देतात, त्यांना चौदा इंद्र होततोंपर्यंत वैकुंठांत वास्तव्य घडतें ॥५॥ लव उत्पन्न होण्याचे वेळीं कन्येचा उपभोग चंद्र घेतो, रजाचे वेळीं गंधर्व व कुचदर्शनाचे वेळीं अग्नि हे उपभोग घेतात ॥६॥ याकरितां ऋतुप्राप्तीचे पूर्वी बारावर्षाचें आंत कन्येचा विवाह करावा. आठवे वर्षी विवाह करणें हें सूज्ञानी प्रशस्त मानिलें आहे ॥७॥ श्रोत्रिय, तपस्वी, विधिपूर्वक वेद पठण केलेला व ब्रह्मचारी असा ब्राह्मण पाहून त्याला विधीने कन्यादान करावें ॥८॥ कन्यादान करण्याचा हा मुख्य विधि आहे. याप्रमाणें दान केलें असतां, कन्येच्या आंगावर जितके रोमांच असतील ॥९॥ तितकीं हजार वर्षे कन्यादान करणारा रुद्रलोकीं राहतो हजार गाई दानाबरोबर शंभर बैलांचें दान, दहा बैलांबरोबर एक यानदान, दहा यानांबरोबर एक अश्वदान, व हजार घोडे दिल्यापेक्षां एक हत्तीदान अधिक आहे ॥१०॥११॥ हजार हत्तीदानाबरोबर एक सुवर्णदान आहे व हजार सुवर्णदानाबरोबर एक विद्यादान आहे ॥१२॥ विद्यादानाच्या कोटीपट भूमिदानाचें पुण्य आहे व हजार भूमिदानापेक्षां गोप्रदान विशेष आहे ॥१३॥ व हजार गोप्रदानांपेक्षां वेळेवर अन्नदानाचें पुण्य अधिक आहे. कारण, हें सर्व स्थावर जंगम ॥ ( अचल व चल ) जग अन्नाच्या आधारावर आहे ॥१४॥ याकरितां षडानना ! कार्तिकांत अन्नदान द्यावें. सर्व इच्छा पूर्ण करणारी गाय, भूमि व विद्या, हीं तीन दानें सारखीं आहेत, असें विद्वान् म्हणतात ॥१५॥ कार्तिकेय म्हणतातः-- देवा ! आणखी कांहीं दुसरे धर्म सांगा; कीं, जे केले असतां सर्व पापें जाऊन देवतुल्य होतो ॥१६॥ सूत म्हणालेः--

याप्रमाणें विचारल्यावर शंकर कार्तिकेयाचें बहुत अभिनंदन करुन भाषण करुं लागले. तें तुम्हांला सांगतो; तर सर्व तपोधनहो ! श्रवण करा ॥१७॥ शंकर म्हणालेः-- जो कार्तिकव्रत करुन परान्न सोडील, त्याला चांद्रायणव्रताचें फळ मिळेल ॥१८॥ कार्तिकमास प्राप्त होतांच जो परान्न वर्ज करील त्याला दररोज अतिकृच्छ्राचें फल मिळेल ॥१९॥ कार्तिकांत तेल व मध सोडावीं ॥२०॥ कार्तिकांत काशाचें पात्र वर्ज्य करावें. विशेषेंकरुन मद्य उत्पन्न करुं नये. कार्तिकांत जर एक वेळ मांस भक्षण केलें तर त्याला राक्षस जन्म प्राप्त होतो ॥२१॥ साठ हजार वर्षे विष्ठेमध्यें दुःख भोगतो; नंतर त्यांतून निघाल्यावर विष्ठा भक्षण करणारा गांवडुकर होतो. ॥२२॥ जो शाकव्रतादि भक्ष्यांचा कार्तिक महिन्यांत नियम करितो त्याला मोक्ष देणारें असें विष्णु स्वरुप व वैकुंठ प्राप्त होतें ॥२३॥ कार्तिकासारखा उत्तम महिना नाहीं, केशवापेक्षां दुसरा श्रेष्ठ देव नाहीं, वेदासारखें शास्त्र नाहीं व गंगेसारखें तीर्थ नाहीं ॥२४॥ सत्याप्रमाणें दुसरें श्रेष्ठ वर्तन नाहीं, कृतयुगसारखें दुसरें युग नाहीं, भोजनासारखी तृप्ति नाहीं व दानासारखे सुख नाहीं ॥२५॥ धर्मसारखा मित्र नाहीं व नेत्रासारखें दुसरें तेज नाहीं ॥२६॥ जो दामोदराला प्रिय असा कार्तिकमास व्रतावांचून घालवील ॥२६॥ तो कर्मभ्रष्ट समजावा व तो नीच योनींत जन्म पावेल; कार्तिकमास हा श्रेष्ठ म्हणून वैष्णवांना सदा प्रिय आहे ॥२७॥ समुद्राला मिळणारी पुण्य नदी स्नानाला मिळणें दुर्लभ, उत्तम कुलशीलाची कन्या बायको करण्यास मिळालेंलें दांपत्य दुर्लभ ॥२८॥ आई व विशेषतः बाप यांचें फार दिवस सुख मिळणें दुर्लभ, साधूंचा सत्कार दुर्लभ व धर्मशील पुत्र दुर्लभ ॥२९॥ द्वारकेंत राहण्यास मिळणें दुर्लभ, कृष्णाचें दर्शन दुर्लभ, गोमतीचें स्नान दुर्लभ व कार्तिकाचें व्रत दुर्लभ आहे ॥३०॥ हे कार्तिकेया ! चंद्र व सूर्यग्रहणामध्यें ब्राह्मणाला भूमिदान दिल्याचें जें पुण्य तें कार्तिकांत भूमीवर निजल्यानें मिळतें ॥३१॥ ब्राह्मणांचे दांपत्यास भोजन घालावें. त्यांचे अंगाला चंदन लावून पूजन करावें, शालजोड्या, रत्नें व नानाप्रकारचीं वस्त्रें ॥३२॥ अभऱ्यासह गाद्या, जोडा व छत्री हीं दानें, हे कार्तिकेया ! तूं कार्तिकांत दान दे ॥३३॥ जो मनुष्य कार्तिक महिन्यांत पानावर भोजन करतो, तो चौदा इंद्र होईत तोंपर्यंत दुर्गतीला जात नाहीं ॥३४॥ पळसाच्या पानावर जेवलें असतां सर्व मनोरथ पूर्ण होऊन सर्व तीर्थांचें फळ मिळतें. तो कधींही नरक पाहणार नाहीं ॥३५॥ पळस साक्षात् ब्रह्मदेव आहे म्हणून सर्व मनोरथ पूर्ण करणारा आहे. हे कार्तिकेया ! कार्तिक महिन्यांत त्याचें मध्यम पान वर्ज्य करावें. ॥३६॥ ब्रह्मा, विष्णु व शंकर असे तीन देव तीन पानांवर आहेत. त्यांत शंकराचें मधलें पान वर्ज्य करावें ॥३७॥ बाकी ब्रह्मा व विष्णूच्या पात्रांवर भोजन केलें असतां सर्व पुण्य प्राप्त होतें. शूद्रांनीं मधल्या पानावर भोजन व कपिला गाईचें दूध प्राशन केलें असतां नरक प्राप्त होतो ॥३८॥ जर शुद्र न समजून कपिला गाईचें दूध प्याला ॥३९॥ तर त्यानें ब्राह्मणाला कपिला गाय दान द्यावी, म्हणजे शुद्ध होतो ॥४०॥ तिळांचें दान, नदीचें स्नान, नेहमी साधूचें दर्शन व पळसाच्या पानावर भोजन, हीं कार्तिकांत मुक्ति देणारीं आहेत ॥४१॥ कार्तिकांत मौन धरुन पळसाच्या पानावर भोजन करणें, तीळ लावून स्नान करणें व नेहमीं क्षमावान् असणें, भुईवर निजणें यांपासून एक युगाचें पाप नाहीसें होतें ॥४२॥ कार्तिकांत अरुणोदयाचे वेळी जो विष्णूपुढें हरिजागर करितो, त्याला हे षडानना ! हजार गाई दान केल्याचें फल मिळतें

॥४३॥ पितृपक्षांत अन्न दान दिल्यानें व ज्येष्ठ आषाढ मासीं अर्थात् उन्हाळयांत उदक दिल्यानें जें पुण्य मिळतें, तितकेंच कार्तिकांत नंदादीप लावल्यानें फळ मिळतें ॥४४॥ दुसऱ्याचा नंदादीप उजळणें, वैष्णवांची सेवा करणें हीं कार्तिकांत अश्वमेध व राजसूय यज्ञांचे फळ देणारी होतात ॥४५॥ नदीचें स्नान करणें, विष्णूच्या कथा ऐकणें व वैष्णवांचें दर्शन हीं ज्याला कार्तिकांत घडत नाहींत, त्याचें दहा वर्षांचें पुण्य जातें ॥४६॥ कार्तिकमहिन्यांत जो ज्ञानी कर्मानें, मनानें व वाचेनें, पुष्कराचें स्मरण करील; तर त्याला लक्षकोटीपट पुण्य प्राप्त होतें ॥४७॥ माघमासीं प्रयागांत, कार्तिकांत पुष्कर तीर्थात तसेंच वैशाखांत उज्जयिनी येथें स्नानदानादि केल्यानें एक युगाचें पातक नाहींसेम होतें ॥४८॥ हे स्कंदा ! जे मनुष्य नित्य भक्तीनें विशेषतः या कलिकालांत हरीचें पूजन करितात ते धन्य आहेत ॥४९॥ गयेमध्यें पिंड देऊन अथवा श्राद्धादिक करुन काय करावयाचें ? त्यानें कार्तिकांत हरीचें पूजन केल्यानेंच आपले पितर नरकापासून तारिले असेंच निःसंशय समजावें ॥५०॥ आपल्या पितरांच्या संतोषाकरितां जे विष्णूला दुग्धादिकांनीं स्नान घालितात, ते कोटिकल्पपर्यंत स्वर्गांत जाऊन देवांसह राहतात ॥५१॥ ज्यांनीं कार्तिकमहिन्यांत कमलनेत्र कृष्णाची पूजा कमलांनीं केली नाहीं, त्यांचे घरांत कोटिजन्मपर्यंत लक्ष्मी वास करणार नाहीं ॥५२॥ अहो ! ज्यांनीं भक्तीनें पांढऱ्या, काळ्या किंवा तांबड्या कमलांनीं हरीची पूजा केली नाहीं ते फसले व ते नाश पावून कलीच्या गुहेमध्यें पडले असें समजावें ॥५३॥ जो एका कमलानें कमलापति हरीची पूजा करील, तो आपलें दहा हजार वर्षांचें पातक नाहीसे करील ॥५४॥ विष्णूची एका कमलानें पूजा करुन नमस्कार केला असतां विष्णू त्याचे एक हजार सातशें अपराधांची क्षमा करितात ॥५५॥ जो कार्तिक महिन्यांत लक्ष तुलसीपत्रांनी विष्णूची पूजा करील त्याला दर पत्राला एक एक मोतीं वाहिल्याचें फल मिळतें ॥५६॥ देवाला अर्पण करण्याचें जलादि पदार्थ तुलसीनीं सुगंधित करुन अर्पण केले असतां, त्यानें हजारों कोटी कल्पपर्यंत विष्णु संतुष्ट होतो ॥५७॥ हे स्कंदा ! जो कृष्णाला वाहून काढलेल्या तुळसी आपल्या मुखांत, मस्तकावर व देहावर प्रीतीनें धारण करील त्याला कलि स्पर्श करणार नाहीं ॥५८॥ हे षण्मुखा ! विष्णूवरच्या तीर्थादि निर्माल्यानें जो आपलें शरीर परिमार्जन करिल, तो सर्व रोगांपासून व पापांपासून मुक्त होतो ॥५९॥ विष्णूचे निर्माल्याचा ज्याचे अंगाला स्पर्श होईल, त्याचीं पापें व व्याधि छिन्नभिन्न होऊन नाश पावतात ॥६०॥ शंखोदक, विष्णूची भक्ति, निर्माल्य, शालिग्रामाचें तीर्थ, गंध व अंगारा हीं ब्रह्महत्या नाहींशी करणारीं आहेत ॥६१॥ इति श्रीपद्मपुराणे उत्तरखंण्डे कार्तिकमहात्म्ये एकत्रिंशोऽध्यायः ॥३१॥

## अध्याय ३२

शंकर म्हणालेः-- हे वैष्णवोत्तमा स्कंदा ! तुझ्यासारखा विष्णुभक्त या लोकांत कोणी नाहीं. आतां तुला माघस्नानाचें माहात्म्य सांगतों ऐक ॥१॥ चक्रतीर्थी हरीचें दर्शन व मथुरेमध्यें केशवाचें दर्शन घेतल्यानें जेवढें पुण्य प्राप्त होतें तेवढेंच पुण्य माघस्नान केल्यानें प्राप्त होतें ॥२॥ इंद्रियें जिंकून शांत मनानें व सदाचरणानें जो

माघमहिन्यांत प्रातः स्नान करितो, तो पुन्हा मृत्युसंसारांत पडणार नाहीं ॥३॥ कृष्ण म्हणालेः-- शूकरक्षेत्राचें माहात्म्य तुला सांगतों श्रवण कर. ज्याचे ज्ञानानें माझी प्राप्ति सर्वदा होते ॥४॥ सूत म्हणालेः-- कृष्णांनीं याप्रमाणें बोलून सत्यभामेला सांगितलें, तें तुम्हाला सांगतों; सर्व ऋषिहो ! ऐका ॥५॥ श्रीकृष्ण म्हणालेः-- शूकरक्षेत्र पांच योजनें विस्तीर्ण असून त्यांत माझें मंदिर आहे. हे देवि ! त्या क्षेत्रांत राहणारा गर्दभ असला तरी मुक्त होऊन चतुर्भुज होतो ॥६॥ तीन हजार हात लांब व तीनशें तीन हात रुंद्र असें शूकरक्षेत्राचें परिमाण आहे ॥७॥ साठ हजार वर्षे दुसरे ठिकाणीं तप केल्यानें मिळणारें फळ, शूकर क्षेत्रांत अर्ध प्रहर तप केल्यानें मिळतें ॥८॥सूर्यग्रहणाचे वेळीं कुरुक्षेतामध्ये तुलापुरुषदान केल्यानें जें फळ मिळतें, त्याचे दसपट काशींत मिळतें व शंभरपट कृष्णावेणीतीरीं मिळतें ॥९॥ हजारपट फल गंगा व समुद्र यांचे संगमीं मिळतें. व शूकर क्षेत्रांत माझे मंदिरांत अनंतपट फल मिळतें ॥१०॥ इतरठिकाणीं लक्षदान दिलें असतां जें पुण्य, तें शूकरक्षेत्रीं एकदां दान दिल्यानें मिळतें ॥११॥ शूकरक्षेत्रांत, तसेंच कृष्णवेणीतीर्थांत व गंगासागरसंगमांत, मनुष्यानें एक वेळ स्नान केलें तरी ब्रह्महत्येचें पातक नाहीसें होतें ॥१२॥ षडानना ! अलर्कानें शूकरक्षेत्रांचें माहात्म्य ऐकलें, म्हणून त्याला सर्व पृथ्वीचें राज्य मिळाले; करितां हे षडानना ! तूं मार्गशीर्ष शुद्ध द्वादशीला तेथें जा ॥१३॥ इति श्रीकार्तिकमाहात्म्ये द्वात्रिंशोऽध्यायः ॥३२॥

## अध्याय ३३

सूत म्हणालेः-- ऋषिहो ! षडानन असें शंकराचें भाषण ऐकून पुन्हा शालिग्रामाच्या पूजेचें माहात्म्य शंकरास विचारुं लागला, ती कथा ऐका ॥१॥ कार्तिकेय म्हणालाः-- हे योगिश्रेष्ठ ! देवा, मी सर्व धर्म आपले मुखांतून ऐकले; हे प्रभो ! आतां शालिग्रामाच्या पूजेचें माहात्म्य विस्तारानें मला सांगा ॥२॥ शंकर म्हणाले - हें तूं फार चांगलें विचारलेंस; हे प्रियपुत्रा ! तें तुला सांगतों. श्रवण कर ॥३॥ हे महासेना ! शालग्रामशिलेमध्ये हें सर्व स्थावरजंगमासह त्रैलोक्य सर्वदा भरुन असतें ॥४॥ शालग्रामाचें दर्शन, त्याला नमस्कार, अभिषेक, त्याची पूजा ज्यानें केली त्याला कोटी यज्ञांचें व कोटी गाई दिल्याचें पुण्य प्राप्त होतें ॥५॥ ज्यानें विष्णुरुपी शालग्रामाचें तीर्थ प्राशन केलें, त्यानें आपला भयंकर गर्भ वास नाहींसा केला ॥६॥ जो भक्तिभावाखेरीज फलाची इच्छा धरुनही शालग्रामाची पूजा करील, तोही विष्णुरुप होऊन मुक्त होईल ॥७॥ शालग्राम व शिवाचें लिंग यांचें स्मरण, कीर्तन, ध्यान, पूजा व नमस्कार करणाराचें कोटिहत्यांचें पाप नाहीसें होतें ॥८॥ सिंहाला पाहून जसे मृग अरण्यांत पळत सुटतात, तसें शालग्रामाचें दर्शन घडतांच सर्व पापें दूर जातात ॥९॥ मनुष्यानें शालग्रामाला भक्तीनें किंवा भक्तीवांचूनही पूजासमयीं नमस्कार केला असतां त्याला मुक्ति प्राप्त होते ॥१०॥ जो नित्य शालग्रामाची पूजा करितो, त्याला यमाचें व जन्ममरणांचें भय नाहीं ॥११॥ जो मनुष्य, या कलीमध्यें मोठ्या भक्तीनें गंध, पाद्य, अर्घ्य, नैवेद्य, धूप, दीप, उटी, गायन, वाद्य व स्तोत्र इत्यादि उपचारांनीं शालग्रामाची पूजा करितो, तो

सहस्रकोटिकल्पपर्यंत विष्णूच्या वैकुंठलोकांत आनंदानें राहतो ॥१२॥१३॥ मनुष्य अभक्तीनें जरी शालग्रामाला नमस्कार करील, तरी तो पृथ्वीवर मनुष्यजन्माला येणार नाहीं ॥१४॥ हे स्कंदा ! जे माझे भक्त माझ्या भक्तीनें गर्विष्ठ होऊन पापानें मोह पावलेले असे, माझा प्रभु जो वासुदेव त्याला नमस्कार करणार नाहींत ते खास माझे भक्त नव्हेत असें समजावें ॥१५॥ जो माझा भक्त होऊन एकादशीला भोजन करील, तो माझा द्वेषी होऊन अंधतामिस्र नरकाला जाईल ॥१६॥ त्यानें माझे लिंगाला स्पर्श करावा; ह्याखेरीज त्याला शुद्धि नाहीं. जी तिथि विष्णूला प्रिय, ती एकादशी तिथि मला प्रिय आहे ॥१७॥ त्या एकादशी तिथीला उपवास करणार नाहीं, तो चांडाळापेक्षांही अधिक पापी समजवावा, हे पुत्रा ! मी सर्वदा शालिग्रामशिलेमध्यें वास करितों; विष्णूनें संतुष्ट होऊन माझ्या भक्तीकरितां मला आपलें स्थान दिलें ॥१८॥ हजार कोटी कमळांनीं माझी पूजा केली असतां जें फळ मिळतें, त्याच्या कोटीपट फळ शालग्रामाची पूजा केल्यानें प्राप्त होतें ॥१९॥ ज्या मनुष्यांनी या मृत्युलोकांत शालिग्रामाची पूजा केली नाहीं त्यांचे नमस्कार व पूजा मी घेत नाहीं ॥२०॥ शालिग्रामशिलेचे पुढें जे माझी पूजा करितात, त्यांना एकवीस युगें माझी पूजा केल्याचें फळ मिळतें ॥२१॥ हे स्कंदा ! शालिग्रामाची पूजा न करितां त्यांनीं विष्णूचे भक्तीखेरीज शेंकडों लिंगांची पूजा केली तरी त्याचें फळ काय मिळणार ॥२२॥ माझी नैवेद्य, पुत्र, पुष्प, फल, उदक हीं स्वतंत्र ग्राह्य नाहींत. शालिग्रामशिलेचे पुढें मला अर्पण केलीं तर सर्व पवित्र होतात ॥२३॥ ब्राह्मणांनीं इतर देवांचा नैवेद्य भक्षण केला तर चांद्रायण प्रायश्चित्त करावे. विष्णूचा नैवेद्य भक्षण केला तर कोटीयज्ञांचें फल मिळतें ॥२४॥ विष्णूचें पादोदकतीर्थ घेतल्यानें कोटिहत्या घडल्या असल्या तरी ते शुद्ध होतात. तसेच शंखोदकानेंही शुद्ध होतात ॥२५॥ जो शंकरभक्त होऊन विष्णूची पूजा करीत नाहीं, तो दुष्ट चौदा इंद्र होत तोंपर्यंत नरकांत जातो ॥२६॥ज्याच्या घरीं संन्यासी एक मुहूर्त राहील, त्याचे पितर आठयुग अमृत भक्षण करणारे असे होतील ॥२७॥ कृष्णाची आराधना न करणारे नराधम या दुःखमय अरण्यांत हजार कोटी वर्षे गोंधळून जातील ॥२८॥ एकदांच शालग्राम शिलेच्या लिंगाची पूजा केली, तर त्या मनुष्यांना सांख्ययोगाचे मेहनतीखेरीज मुक्ति प्राप्त होते ॥२९॥ माझ्या कोटिलिंगांचे दर्शन व पूजा केल्यानें जें फळ मिळतें, तें एक शालग्रामाची पूजा व दर्शन यांनीं प्राप्त होतें ॥३०॥ जो विष्णुभक्त नित्य बारा शालग्रामांची पूजा करील, त्याचें पुण्य फल ऐका ॥३१॥ हजार कोटिलिंगे भागीरथीच्या तीरीं पूजिल्याचें व आठ युगें काशीवास केल्याचें जें फळ तें त्याला एका दिवसांत मिळतें ॥३२॥ मग जो वैष्णव पुष्कळ दिवस शालग्रामाची पूजा करील, त्या वैष्णवाचे पुण्याची संख्या करण्याला मी व ब्रह्मादिक देव समर्थ नाहींत ॥३३॥ यासाठीं हे पुत्रा ! माझ्या भक्तांनीं माझ्या प्रीतीकरितां शालग्रामाची भक्तीनें पूजा करुन माझी पूजा करावी ॥३४॥ शालग्रामशिलेच्या रुपानें विष्णु जेथें आहेत तेथें सर्व देव असुर यक्ष व चौदा भुवनें राहतात ॥३५॥ दुसऱ्या कोटिदेवांची कीर्तनें केल्यानें, जें फळ मिळतं तें कलीमध्यें एका विष्णूचे कीर्तनानें मिळतें ॥३६॥ जे मनुष्य शालग्रामशिलेपुढें एकवेळ पिंड अर्पण करितील, त्यांचे पितर असंख्य वर्षे स्वर्गांत तृप्त राहतील ॥३७॥जे मनुष्य भक्तीनें शालग्रामतीर्थ प्राशन करितील, त्यांना हजारों पंचगव्यें पिण्याचें काय कारण आहे ॥३८॥ प्रायश्चित्त घेण्याचा प्रसंग आल्यास शालिग्रामाचें

यथायुक्त तीर्थ घेतले असतां दान उपोषणें व चांद्रायण हीं करण्याचें कारण उरत नाही ॥३९॥ जो सरोवरामध्यें मंदिर बांधून जलशायी विष्णूची स्थापना करितो, त्याला माझे ब्राह्य सौर इत्यादि प्रासाद बांधण्याची गरज नाहीं ॥४०॥ सरोवरामध्यें जलशायी प्रतिमेचें पूजन केलें तर दुसऱ्या कोटी देवतांचें पूजन करण्याचें कर्तव्य काय ? ॥४१॥ षडानना ! विष्णुमुख सर्व देव म्हणतात कीं, सर्व पुण्याला परिमिति आहे ॥४२॥ परंतु शालग्रामाच्या पूजेच्या पुण्याला गणती नाहीं. जो शालग्रामशिला विष्णुभक्त ब्राह्मणाला दान देतो, त्याला शेंकडों यज्ञ केल्याचें फळ मिळतें व घरांत राहूनही दररोज गंगास्नानाचें फळ मिळतें ॥४३॥४४॥ जो मनुष्य शालग्रामाच्या तीर्थानें मार्जन करितो त्यानें सर्व तीर्थात स्नान केले व सर्व यज्ञांत दीक्षा घेतली असें समजावें ॥४५॥ स्वर्ग, मृत्यु व पाताळ यांमध्यें असंख्य पाषाण आहेत परंतु शालग्रामशिलेची बरोबरी करणारा असा कोणताही नाहीं ॥४६॥ या दुर्लभ मनुष्यलोकीं रोज रोज शंभर प्रस्थ तीळ भक्तीनें दान करितो त्याचें जीवित सफळ आहे. ते नित्य शंभर शेर तीळ दान केल्याचें फळ केवळ शालिग्रामाच्या पूजेपासून मिळतें ॥४७॥ पत्र, पुष्प, फळ, उदक,मूळ, दूर्वा हीं शालग्रामाला समर्पण केलीं असतां, तीं मेरुप्रमाणें दिल्याचें फळ मिळतें ॥४८॥ विधिवांचून क्रिया व मंत्राखेरीजही जो पूजा करितो तो चक्र धारण करणारा असल्यास त्याला शास्त्रोक्त पूजेचें फल मिळून विष्णूची प्राप्ति होते ॥४९॥ मीं पूर्वी क्लेशहरण करणाऱ्या विष्णूला विचारिलें होतें, तें तुझ्या प्रेमास्तव तुला सांगतों ॥५०॥ हे विष्णो ! तुम्ही कोणते ठिकाणीं राहताम, तुमचा आधार व आश्रय कोणता, तुम्ही कशानें संतुष्ट होतां तें सर्व मला सांगा ॥५१॥ श्रीकृष्ण म्हणालेः-- हे शंभो ! मी नेहमीं शालग्रामशिलेचे ठिकाणी राहतों. शालग्रामावर चक्रें असतात त्यांवरुन व आकारावरुन त्यांचीं नामें आहेत तीं ऐक ॥५२॥ ज्या शालग्रामाचे मुखाशीं सारखीं दोन चक्रें जवळ जवळ दिसतात ती शिला वासुदेवमूर्ति जाणावी व ती श्वेत वर्णावर असेल तर जास्त शुभ समजावी ॥५३॥ द्वादश चक्रांची, निळसर तेजाची, दीर्घ आकाराची, पुष्कळ छिद्रांनी व्याप्त असें जिचें मुख, ती प्रद्युम्न मूर्ति समजावी ॥५४॥ अनिरुद्धशिला पिंवळया तेजाची वाटोळी उत्तम समजावी. जिचे मुखावर तीन रेषा व पद्माचें चिन्ह असतें ॥५५॥ जिची नाभिचक्रें वर असतात, ज्या चक्राच्या रेषा लांब लांब असतात व उजवे बाजूस बारीक छिद्रें असतात व श्यामवर्ण असते तिला नारायणमूर्ति समजावें ॥५६॥ ज्या शिलेला मुख ऊर्ध्व असतें तिला हरिमूर्ति समजावें. ती हरिमूर्ति सर्व इच्छा पूर्ण करणारी, द्रव्य देणारी व मोक्ष देणारी अशी आहे ॥५७॥ तोंडल्याच्या आकाराची, पृष्ठावर मोठें छिद्र असून पद्म व चक्र यांनीं युक्त, शुक्लवर्ण ती परमेष्ठीमूर्ति समजावी ॥५८॥ जिचे मुखाचेवर मध्यरेषेपासून रेषा असते, रेषेचे मुळाशीं दोन चक्रें असतात व शिला कृष्णवर्ण असते तिला विष्णूमूर्ति म्हणतात ॥५९॥ नरसिंह मोठाल्या चक्रांचा व कपिल वर्ण असतो. त्याची ब्रह्मचर्यानें पूजा करावी; नाहीं तर विघ्नें उत्पन्न करितो ॥६०॥ पाठीवर एक व मुखांत दोन अशा विषम चक्रांची इंद्रनील मण्याप्रमाणें तेजस्वी, नाभीपासून तीन रेषांनीं युक्त व स्थूल अशी वराहमूर्ति समजावी ॥६१॥ लांबट, सुवर्णवर्णाची, तीन बिंदूनीं शोभायमान अशी जी शिला तिला मत्स्यमूर्ति म्हणतात. ती भोग व मुक्ति देणारी आहे ॥६२॥ कूर्म मूर्तीची पाठ उंच असून तीवर वर्तुलचक्र असते. तिचा रंग हिरवा असून तीवर

कौस्तुभाचें चिन्ह असतें ॥६३॥ हयग्रीवशालग्राम घोड्याच्या मुखाचे आकाराचा असून त्यावर सुशोभित पांच रेखा असतात. निळसर रंगाचा असून त्यावर पुष्कळ बिंदु असतात ॥६४॥ वैकुंठमूर्तीवर तरवार, एक चक्र व ध्वज हीं चिन्हें असतात. द्वारावर गुंजाकार एक रेखा असते ॥६५॥ श्रीधर शालग्रामावर वनमालेचें चिन्ह असतें. त्याचा आकार कदंबाचे फुलासारखा असून तो पांच रेखांनीं भूषित असतो ॥६६॥ जवसाच्या फूलाप्रमाणें कांति असून ज्याच्या बिंदु असतात व जो वर्तुल असुन लहान असतो तो वामनमूर्ति शालग्राम समजावा ॥६७॥ श्यामवर्ण महातेजस्वी असा तो सुदर्शन मूर्ति, ज्याचे डावे बाजूवर गदा व चक्र असतें, उजवे बाजूवर रेखा असते ॥६८॥ दामोदर मूर्ति मोठी असून मध्यावर एक चक्र असतें; दूर्वांसारखा रंग असून मुखावर पिंवळ्या रेघा असतात ॥६९॥ अनंतमूर्ति शालग्राम नाना भोग, नाना प्रकारच्या चिन्हांनीं अनेक मूर्तीच्या लक्षणानीं युक्त असा असतो. हा सर्व काम पूर्ण करणारा आहे ॥७०॥ ज्याचे अर्घ्यावर सभोंवार ऊर्ध्व सर्व बाजूकडे मुखें असतात त्याला पुरुषोत्तम म्हणावें. तो भोग व मुक्ति देणारा आहे ॥७१॥ ज्या शालग्रामाचे शिखरावर लिंगासारखें चिन्ह असतें त्याला योगेश्वर म्हणावें; त्याचे पूजनानें ब्रह्महत्या जाते ॥७२॥ पद्मनाभ आरक्तवर्ण असून त्याजवर चक्रयुक्त कमळ असतें; त्याचे पूजनानें दरिद्री धनसंपन्न होतो ॥७३॥ शालग्राम चक्रांनीं युक्त, सोन्यासारखा झगझगीत, पुष्कळ सुवर्णाच्या रेघा असलेला, स्फटिकाप्रमाणें तेजस्वी असा असावा ॥७४॥ शिला पांढरी अति स्निग्ध असेल तर ती सिद्धि देणारी, काळी असेल तर कीर्ति देणारी होते ॥७५॥ शिला पांढरी असेल तर पाप नाहींसे करणारी, पिंवळी पुत्रफळ देणारी होते. नीलवर्ण असेल तर लक्ष्मी देणारी व तांबडी रोग उत्पन्न करणारी जाणावी ॥७६॥ रुक्षवर्ण दुःख उत्पन्न करणारी, वक्र दरिद्र देणारी होते. एकच चक्र असेल तर तो सुदर्शन, दोन चक्रें असल्यास लक्ष्मी नारायण ॥७७॥ तीन चक्रांचा असल्यास अच्युत, चार चक्रांचा असल्यास जनार्दन, पांच चक्रें असल्यास वासुदेव, सहा चक्रें असल्यास प्रद्युम्न समजावा ॥७८॥ सात चक्रांचा संकर्षण व आठ चक्रें असल्यास पुरुषोत्तम, नऊ चक्रें असल्यास नवव्यूह, दहा चक्रें असल्यास दशात्मक ॥७९॥ अकरा चक्रें असल्यास अनिरुद्ध, बारा चक्रें असल्यास द्वादशात्मक. यांहून जास्त चक्रें अनंतमूर्ति शालग्रामांत दिसतात. शालग्राम तुटलेला फूटलेला असल तरी त्याला दोष नाहीं. ज्याला ज्या मूर्तीची आवड असेल, त्यानें त्या मूर्तीची यत्नानें पूजा करावी ॥८०॥ जो शालग्राम खांद्यावर घेऊन मार्ग चालेल, त्याला सर्व जग वश होईल ॥८१॥ जेथें शालग्रामशिला आहे तेथें हरीचें सान्निध्य आहे. तेथें स्नान, दान, जप इत्यादि कृत्यें केली असतां तीं काशीहून शतपट अधिक फलप्रद होतात ॥८२॥ कुरुक्षेत्र, प्रयाग, पुष्कर, नैमिषारण्य या ठिकाणीं केलेलें पुण्य कोटिगुण असतें. काशींत केलेलें त्याहून जास्त होतें ॥८३॥ ब्रह्महत्यादिक कांहीं पाप मनुष्यानें केले असतां ॥८४॥ तें पाप शालग्रामाची पूजा केल्यानें भस्म होतें. जेथें शालग्राममूर्ति व द्वारकेंतील चक्रांकित या दोहोंचा संगम आहे तेथें मोक्ष मिळतो यांत संशय नाहीं ॥८५॥ ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यासी या सर्वांनीं विष्णूचा नैवेद्य भक्षण करावा; त्यांचा विचार करुं नये ॥८६॥ शालग्रामाच्या पूजेला मंत्र नको, जप नको, भावना नको, स्तुति नको, आचार नको ॥८७॥ शालग्रामापुढें विशेषेंकरुन कार्तिकांत भक्तीनें स्वस्तिक काढलें तर सात

कुळांचा उद्धार होतो ॥८८॥ मृत्तिका व रंग यांनी अगदीं लहान जरी स्वस्तिक काढिलें, तरी तो कोटि कल्पपर्यंत स्वर्गांत राहील ॥८९॥ कार्तिकांत देवापुढें स्वस्तिक काढिलें असतां त्याच्या पासून मिळणारें फल व एक वर्ष अग्निहोत्रोपासना करणारास मिळणारें फल हीं दोन्हीं सारखीच आहेत ॥९०॥ अगभ्यागमन केलें असतां किंवा खाऊं नये तें खाल्लें असतां जें पाप लागतें, तें पाप हरीच्या मंदिरांत रांगोळया घालून मंदिर सुशोभित केलें असतां नाहीसे होते ॥९१॥ जी स्त्री केशवापुढें नित्य रांगोळयांनीं मंडळें काढील, तिला सात जन्म सौभाग्य प्राप्त होईल ॥९२॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये त्रयस्त्रिंशोऽध्यायः ॥३३॥

## अध्याय ३४

शंकर म्हणतातः-- कार्तिकेया ! जो आवळीच्या छायेखालीं बसून पितरांना पिंडदान करील, त्याचे पितर माधवाचे कृपेनें मुक्तीला जातील ॥१॥ जो मस्तकावर, हातांत, मुखांत, बाहूंवर व गळयांत आवळे धारण करुन भूषित होईल आवळे भक्षण करील तो मनुष्य नारायण होईल ॥२॥ जो वैष्णव आवळे धारण करितो, तो देवांनाही प्रिय होतो; मग मनुष्यांना प्रिय होईल म्हणून काय सांगावें ? ॥३॥ तुळशीची माळ व आवळयांची माळ, ज्याचे कंठांत आहे त्याच्या अंगावर केशव लोळतो असें समजावें ॥४॥ आवळे तुळशी व द्वारकेंतील मृत्तिका ( गोपीचंदन ) हीं तीन ज्याचे घरांत आहेत, त्याचें जन्म सफळ समजावें ॥५॥ जितके दिवस मनुष्य आवळीची माळा धारण करील तितके हजार वर्षे पर्यंत त्याची वस्ती वैकुंठांत होईल ॥६॥ तुळसीची व आवळीची आशा दोन माळा जो आपल्या गळयांत घालील, तो मनुष्य कोटी कल्पपर्यंत स्वर्गांत राहील ॥७॥ जो इंद्रियें स्वाधीन ठेवून शालग्रामाची पूजा तुलसीमंजिरींनीं करील, त्याला प्रत्येक तुळसीफुलाला अश्वमेध यज्ञाचें फल मिळतें ॥८॥ देवांमध्यें जसा विष्णु श्रेष्ठ, तशी फुलांमध्यें तुळसी श्रेष्ठ आहे ॥९॥ ( जो दररोज तुळसींनीं विष्णूची पूजा करितो, त्याची जन्मापासूनची दुःखें, जरा, रोग हीं नाहींशी होऊन, त्याला मुक्ति मिळते ) ॥१०॥ जो कार्तिकांत तुळसीची माळा करुन तिनें विष्णूची पूजा करितो, त्याच्या पापांच्या अक्षरांची माळा कृष्ण खरोखर तोडून टाकून देतो ॥११॥ श्रीचंदन, कापूर अगरु व केशर यानीं मिश्रित गंध, केवडा, व दीपदान हीं केशवाला नेहमीं प्रिय आहेत ॥१२॥ कलियुगांत कार्तिक महिन्यामध्यें केवडा दिला, व दीपदान केलें तर हे कार्तिकेया ! त्याच्या शंभर कुलांचा उद्धार होतो ॥१३॥ कमळें, तुळसी, केवडा अगस्त्याचें फूल व पांचवें दीपदान हीं कार्तिकांत विष्णूला अर्पण करावीं ॥१४॥ हे वत्सा ! जो मालतीच्या मालांनीं कार्तिकांत केशवाचा मंडप सुशोभित करील, त्याला स्वर्गांत वस्ती प्राप्त होईल ॥१५॥ केवड्याच्या पुष्पांनी जर विष्णूची पूजा केली तर तो त्याला हजार वर्षेपर्यंत सुप्रसन्न होतो ॥१६॥ हे षडानना ! केवड्याच्या फुलांनीं विष्णूची पूजा केली असतां, त्या पुण्यानें तो मंगलकारक वैकुंठाला जातो ॥१७॥ चैत्र वैशाख, आला असतां दवण्यानें विष्णूची पूजा केली तर शंभर गाई दान दिल्याचें पुण्य मिळतें ॥१८॥ अगस्त्याच्या फुलांनीं विष्णूची पूजा केली तर

त्याला पाहतांच नरकाग्नि थंड होतो ॥१९॥ अगस्त्याच्या फुलांनीं पूजा केली असतां जसा विष्णु संतुष्ट होऊन फल देतो, तसा तप करुन फल देत नाहीं ॥२०॥कार्तिकांत सर्व फुलें सोडून अगस्त्यपुष्पांनींच केशवाची पूजा केली तर त्याला अश्वमेधाचें फल मिळतें ॥२१॥ अगस्त्यपुष्पांची माळा करुन जो विष्णूला अर्पण करितो, त्याची इंद्र देखील स्तुति करितो ॥२२॥ हजार गाई दान केल्यानें जें फळ मिळतें तें एक अगस्त्यपुष्प कार्तिकांत विष्णूला अर्पण केल्यानें मिळतें ॥२३॥ हरि जसा कौस्तुभमण्यानें किंवा वनमालेनें संतुष्ट होतो, तसाच कार्तिकांत तुलसीपत्रांनीं संतुष्ट होतो ॥२४॥ सूत म्हणालेः-- वृषध्वज शंकर, आपला पुत्र कार्तिकेय भक्तितत्पर होऊन विनयानें नम्र झाला आहे, असें पाहून पुन्हा बोलूं लागले ॥२५॥ ईश्वर म्हणालेः-- मयूरवाहना षडानना ! कार्तिकांतील दीपाचें माहात्म्य सांगतों; श्रवण कर ॥२६॥ पितर पितृगणांसह इच्छा करितात कीं, आमच्या कुलांत सत्पुत्र पितृभक्त, कार्तिकांत दीपदानानें केशवाला संतुष्ट करणारा असा होईल काय ? ॥२७॥ तुपानें किंवा तेलानें देवापुढें जो दिवे लावितो, त्याला अश्वमेध करुन काय करावयाचें ? ॥२८॥ कार्तिकामध्यें केशवापुढें ज्यानें दीपदान केलें त्यानें सर्व यज्ञ केलें. सर्व तीर्थांत स्नान केल्याप्रमाणें आहे ॥२९॥ विशेषेंकरुन कार्तिक कृष्णपक्षांतील शेवटचे दिवाळीचे पांच दिवस विशेष पुण्यकारक आहेत. त्या पांच दिवशीं जो दीपदान करील त्याला अक्षय्य पुण्य प्राप्त होतें ॥३०॥ दुसऱ्यानें लाविलेला दिवा एका चिचुंद्रीचे पायाने वात सारुन मोठा झाला म्हणून तिला दुर्लभ असा मनुष्यजन्म प्राप्त होऊन ती उत्तम गतीला गेली ॥३१॥ एक पारधी चतुर्दशीला शंकराची पूजा करुन सहज उपाशीं राहिला, म्हणून त्याला उत्तम असा विष्णुलोक प्राप्त झाला ॥३२॥ लीलवती नांवाची चांडालीण दुसऱ्यानें लाविलेल्या दिव्याचें संरक्षण केल्यानें शुद्ध होऊन अक्षय स्वर्गाला गेली ॥३३॥ कोणीं एक गोपानें अमावास्येला विष्णूची पूजा पाहून, जय जय असा वरचेवर शब्द उच्चार केला, म्हणून तो सार्वभौम राजा झाला ॥३४॥ म्हणून सूर्यास्त झाल्यावर कार्तिकांत घरांत, गोठ्यांत व सर्व ठिकाणी दिवे लावावे ॥३५॥ देवळांत, स्मशानांत, सरोवराच्या तीराला, दिपवाळींत पांच दिवस आपल्या कल्याणाकरितां तुपानें अथवा तेलानें दिवे लावावे ॥३६॥ दीपदानापासून पुण्य प्राप्त होऊन, ज्यांच्या श्राद्धादिक क्रिया नष्ट झाल्या आहेत अशा पापी पितरांचा देखील उद्धार होतो ॥६७॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये चतुस्त्रिंशोऽध्यायः ॥३४॥

## अध्याय ३५

कार्तिकस्वामी म्हणतातः-- हे शंकरा, दिवाळीचें माहात्म्य विस्तारेंकरुन सांगा. दिवाळी कशाकरितां करावी व तिची देवता कोण आहे तें सांगा ॥१॥दिवाळीमध्यें काय दान द्यावें, काय देऊं नये, कोणत्या प्रकारचा आनंद करावा व कोणते खेळ खेळण्याला योग्य आहेत ॥२॥ सूत म्हणाले, कामशत्रु शंकर याप्रमाणें स्कंदाचें भाषण ऐकून हर्ष पावून बरें म्हणून बोलूं लागले ॥३॥ शिव म्हणालेः-- ( आश्विन ) कार्तिकवद्य त्रयोदशीला दरवाज्या बाहेर यमदीप लावावा म्हणजे अपमृत्यु नाहींसा होतो ॥४॥ ' दीपमंत्र ' " या त्रयोदशीच्या दीपदानापासून

पाशहस्त मृत्यु, काल व श्यामा यांसह यम संतुष्ट होवो " असें म्हणावें ॥५॥ कार्तिक वद्य चतुर्दशीला पहाटे चंद्रोदयाचे वेळीं अवश्य स्नान करावें म्हणजे नरकाची भीति राहत नाहीं ॥६॥ पर्व म्हणजे अमावास्यासह चतुर्दशीला पहांटेस अवश्य आळस टाकून स्नान करावें ॥७॥ दिवाळीच्या नरकचतुर्दशीला तेलामध्यें लक्ष्मी व जलामध्यें गंगा असते. या दिवशीं जो प्रातःस्नान करतो, तो यमलोक पहाणार नाहीं ॥८॥ स्नान करितांना मध्यें आघाडा, कडूभोपळा, टाकळा, कडूशेंदनीचें फळ हीं नरकाचे क्षयाकरितां अंगावरुन ओंवाळून टाकावी ॥९॥ अंगावरुन फिरवितांना " पांढऱ्या माचीचे ढेंकळासह कांटे व पानांसह आघाडा अंगावरुन ओंवाळीत असतां आमचें पाप नाहींसें कर " असें म्हणावें ॥१०॥ स्नान करितांना अपामार्ग ( आघाडा ) व प्रपुन्नाट ( टाकळा ) हे मस्तका वरुन फिरवावे. नंतर यमधर्माचें नांवांनीं तर्पण करावें ॥११॥ यमं, धर्मराजं, मृत्युं, अंतकं, वैवस्वतं, कालं, सर्वभूतक्षयकरं, औदुंबरं, दघ्नं, नीलं, परमेष्ठिनं, वृकोदरं, चित्रं, चित्रगुप्तं, या नांवांनीं प्रत्येक नांवापुढें ' तर्पयामि ' असे म्हणून तर्पण करावें ॥१२॥१३॥ देवतांची पूजा करुन नरकाला दीप द्यावा. नंतर संध्याकाळीं पुष्कळ सुंदर दिवे लावावे ॥१४॥ विशेषानें ब्रह्मा, विष्णु व शंकर यांच्या देवालयांत, तळघरांत चवाठ्यावर, सभेंत, नदीकांठाला पुष्कळ दिवे लावावे ॥१५॥ बागेंत, गांवकुसवावर, विहिरींत, सज्ज्यावर, दरवाज्यापुढें, पागेंत, हत्तीखान्यांत, दिवे लावावे ॥१६॥ त्याच प्रमाणें अमावास्येला पहांटे दिवे लावावे. स्नान करुन देव व पितर यांची भक्तीनें पूजा करुन त्यांना नमस्कार करावा ॥१७॥ पार्वणश्राद्ध करुन दूध, दहीं, तूप व नानाप्रकारचे अन्नांनीं ब्राह्मणांना भोजन घालावें. त्यांची प्रार्थना करावी ॥१८॥ नंतर राजानें दुपारुन गांवांतील लोकांचा आदरसत्कार करुन गोष्टी व गोड भाषण बोलून संतोष करावा ॥१९॥ या योगानें पितर एक वर्ष तृप्त राहतात. विष्णु जागृत होण्यापूर्वी स्त्रियांनीं लक्ष्मीला जागृत करावी ॥२०॥ लक्ष्मीला जागृत करुन तिच्या जागृतीच्या वेळीं जी स्त्री अथवा पुरुष भोजन करितात, त्या मनुष्यांचें घरी लक्ष्मीं एक वर्ष स्थिर राहते ॥२१॥ विष्णूपासून भय पावलेले दैत्य ब्राह्मणांपासून अभय पावले. भगवान् क्षीरसमुद्रांत निजलेले पाहून लक्ष्मी कमलामध्यें निजली ॥२२॥ हे लक्ष्मी, तूं ज्योति, श्री, रवि, चंद्र, वीज, सुवर्ण, तारका यांचें तेज आहेस. सर्व तेजस्वी पदार्थाचें तेजांत व दीपांचे तेजांत रहणारे हे लक्ष्मी, तुला नमस्कार असो ॥२३॥ जी लक्ष्मी, कार्तिकमासीं पुण्य दिवसांत दिवाळींत पृथ्वीवर व गाईच्या गोठ्यांत असते, ती लक्ष्मी मला वर देणारी होवो ॥२४॥ शंकर व पार्वती हे द्यूत खेळण्यास बसले असतां, पार्वतीनें प्रार्थना केल्यावरुन लक्ष्मी गाईच्या रुपानें तेथें राहिली ॥२५॥ पार्वतीनें द्यूतांत शंकराला जिंकून नग्न करुन सोडला, म्हणून शंकर दुःखी व पार्वती सुखांत राहिली ॥२६॥ करितां खेळांत प्रथम ज्याला जय येतो तो वर्षभर सुखी असतो. याप्रमाणें खेळत असतां मध्यरात्र झाल्यावर लोक झोपेंत असतांना स्त्रियांनीं तुताऱ्या, डमरु वगैरे वाद्यें वाजवून मोठ्या आनंदानें आपल्या घराच्या अंगणांतून अलक्ष्मी घालवून द्यावी ॥२७॥२८॥ प्रतिपदेला सूर्योदयानंतर द्यूत खेळावें. खेळांत पराजय झाला तर अपशय येतें. सकाळी गोवर्धनाची पूजा करावी व रात्रींही द्यूत खेळावें ॥२९॥ गाईवर वस्त्रें अलंकार घालूत सुशोभित कराव्या. त्यांचें दूध काढूं नये. बैलांवर ओझें घालूं नये. गोवर्धनाची प्रार्थना करावी. हे गोवर्धना ! तूं

पृथ्वीला आधार असून गोकुळाचें रक्षण करणारा आहेस ॥३०॥ कृष्णांनी तुला हातांनीं उचलून धरिलें असा तूं आम्हांला कोटी गाई देणारा हो. इंद्रादिलोकपालांची जी लक्ष्मी गाईच्या रुपानें राहून यज्ञाकरितां तूप देते, ती माझें पाप नाहीसें करो ॥३१॥ माझे पुढें व मागें गाई असोत. हदयांत गाई वास करोत. असा मी गाईमध्यें वास करीन. याप्रमाणें गोवर्धनाची पूजा करावी ॥३२॥ देवांना, सत्पुरुषांना व इतरांना भक्तीनें संतुष्ट करावें. इतरांना अन्नानें व पंडितांना उत्तम भाषणानें, घरांतील स्त्रियादिकांना वस्त्रें, विडे, फुलें, धूप, कापूर, केशर, उत्तम प्रकारचे भक्ष्यादि पदार्थ यांनीं संतुष्ट करावें ॥३३॥३४॥ शेतीवाल्यांना बैल वगैरे देऊन, राजाला व अधिकारी लोकांना धन द्यावें. राजानें कंठ्या, कडीं वगैरे आपल्या नांवाचा छाप मारलेलीं देऊन, पदाति जनांचा व सज्जनांचा संतोष करावा ॥३५॥३६॥ याप्रमाणें सर्वांस संतुष्ट करुन राजांनीं मंचकावर बसून मल्ल, बैल, रेडे, यांच्या झुंजी पहाव्या ॥३७॥ मांडलिक राजे, योद्धे, पायदळ, नट, नाचणारे व स्तुतिपाठक भाट यांच्या भेटी घ्याव्या ॥३८॥ बैल रेड्यांना युद्धानंतर सोडावें. गाई व वासरें यांना मोकळे सोडून द्यावें ॥३९॥ नंतर तिसरे प्रहरीं दर्भाची व मोळाची मार्गपाली ( मांगोली ) करुन पूर्वेच्या वेशीला अगर झाडाला बांधावी. तिच्या खालून हत्ती, घोडे, गाई, बैल म्हशी, रेडे वगैरे न्यावे. ब्राह्मणांनीं होम करुन ती मार्गपाली बांधावी ॥४०॥४१॥४२॥ नंतर या मंत्रानें नमस्कार करावा. " हे मार्गपाली, तूं सर्व लोकांना सुख देणारी अशा तुला नमस्कार असो." हे स्कंदा मार्गपाली खालून गाई बैल यांना न्यावें. राजा, राजपुत्र, ब्राह्मण हे पाली उल्लंघून गेले असतां त्यांना रोग होणार नाही व ते सुखी होतील ॥४३॥४४॥ दिवसा याप्रमाणें केल्यानंतर रात्रीं भूमीवर मंडल काढून त्यावर दैत्यपति जो बळी त्याची पूजा करावी ॥४५॥ पांचप्रकारे रंग घेऊन त्यांनीं सर्व अलंकार व विंध्यावली स्त्रीयुक्त बळीचें चित्र काढावें. मधु नांवाचा दैत्य जवळ आहे असा बळी, हस्त, मुख, किरीट, कुडलें घातलेला, दोन हातांचा असा काढावा. तो आपल्या घरामध्यें मोठ्या दिवाणखान्यांत काढावा. आपली आई भाऊ व सर्व आप्तइष्ट यांसहवर्तमान नानाप्रकारचीं कमळें, गंध, फुलें, दूध, गूळ, खीर, पक्कान्नें यांनीं समाधानानें पूजा करावी ॥४६॥४७॥४८॥४९॥ मद्यमांस, लेह्य ( चाटण्याचे ) चोष्य, ( चोखण्याचे ) पदार्थ, फराळाचे जिन्नस अर्पण करावे. राजानें प्रधान उपाध्याय यांसह बसून पुढील मंत्रानें पूजा करावी म्हणजे एक वर्ष सुखदायक जातें. हे विरोचनाच्या पुत्रा, पुढें इंद्र होणाऱ्या प्रभु बलिराजा, ही मीं केलेली पूजा ग्रहण कर. याप्रमाणें पूजाविधी व प्रार्थना करुन रात्रीं जागरण करावें ॥५०॥५१॥५२॥ त्या रात्रीं गाणें, नाच, कथा वगैरे करुन करमणूक करावी. इतर लोकांनी आपल्या घरीं शुभ्र तांदुळांचा बळी काढून फूलें, फळें इत्यादिकांनीं पूजा करावी. बळीकरीतां सर्व मंगलादि करावें ॥५३॥५४॥ सूज्ञ ऋषि जें जें अक्षय म्हणून सांगतात, त्यामध्यें या कार्तिकांत बलिप्रतिपदेला जें थोडें फार दान द्यावें, तें अक्षय होऊन विष्णूला प्रीतिकर व शुभ होतें ॥५५॥ हे बले ! जे रात्रीं तुझी पूजा करणार नाहींत, त्यांचीं सर्व धर्म, पुण्यें तुला मिळोत ॥५६॥ विष्णूंनी पुन्हां संतुष्ट होऊन बळीला उपकारक दैत्यांना हा आनंदोत्सव दिला. तेव्हां पासून हे स्कंदा ! ही कौमुदी ( दिवाळी ) नांवाचा उत्सव सुरु झाला ॥५७॥५८॥ ही कौमुदी सर्व उपद्रव नाहींसे करणारी व सर्व विघ्नें घालविणारी आहे. तसेंच लोकांचा शोक घालविणारी व इच्छा पूर्ण करणारी, धन पुष्टि, सुख देणारी

आहे ॥५९॥कु म्हणजे पृथ्वी व मुद म्हणजे हर्ष या युक्त शब्दाला व्याकरण व शास्त्रजाणणारांनीं कौमुदी असें म्हटलें आहे ॥६०॥ या दिवशीं पृथ्वीवर नानाप्रकारच्या गोष्टींनी लोक एकमेकांत आनंद करितात, आनंदित होतात, संतुष्ट होतात, सुख पावतात, म्हणून ही कौमुदी समजावी ॥६१॥ हे षण्मुखा ! राजे आपल्या कल्याणाकरितां बळीला कुमुद ( कमळें ) अर्पण करितात. म्हणून हिला कौमुदी म्हणतात ॥६२॥ ही एक बलिप्रतिपदेची रात्र व दिवस प्रत्येक वर्षी कार्तिकांत बलिराजाला या पृथ्वीवर आरशाप्रमाणें दिली आहे ॥६३॥ जो राजा याप्रमाणें दिवाळी करितो त्याच्या राज्यांत व्याधीचें भय कोठून राहील ? त्याचे राज्यांत सुभिक्ष, क्षेम, आरोग्य, उत्तम संपत्ति हीं राहतात ॥६४॥ सर्वजण निरोगी व उपद्रवरहित होतात. अशा दिवाळीचा उत्सव केल्यानें त्या राज्यांत सुख होतें ॥६५॥ या कौमुदीला ( बळिप्रतिपदेला ) जो जशा भावानें राहील, तशा भावानें तो वर्षभर हर्षांत किंवा दुःखांत राहील ॥६६॥ त्या दिवशीं रडला, तर वर्षभर रडेल. आनंदांत राहिला तर वर्षभर आनंदी राहील. सुखाचा उपभोग घेतला तर वर्षभ सुखोपभोग मिळेल. स्वस्थ असला तर स्वस्थ राहील ॥६७॥ म्हणून सर्वांनीं आनंदानें दिवाळी करावी. कार्तिकांतही दिवाळी पाडवा वैष्णवांची व दैत्यांची ही एक तिथी आहे ॥६८॥ जे लोक सर्व जनांना आनंद देणारा दीपोत्सव करुन मोठ्या आनंदानें बळीची पूजा करितात, त्यांच्या कुळाला तें वर्ष मोठ्या आनंदाचें व सुखोपभोगाचें जातं ॥६९॥ हे स्कंदा ! पर्जन्यकाळीं चार महिन्यांतील चार द्वितीयातिथी सुखकारक आहेत ॥७०॥ पहिली श्रावण महिन्यांतील द्वितीया, दुसरी भाद्रपद महिन्यांतील, तिसरी अश्विनांतील, चौथी कार्तिकांतील ॥७१॥ श्रावणमासांतील द्वितीया कलुपा नांवाची, भाद्रपदांतील अमला नांवाची, आश्विनांतील प्रेतसंचारा नांवाची व कार्तिकांतील याम्यका नांवाची द्वितीया होय ॥७२॥ स्कंद म्हणतातः-- शंकरा ! कलुपा, अमला, प्रेतसंचारा, याभ्यका, अशीं त्या द्वितीयांना नावें कां प्राप्त झालीं तें सांगा ॥७३॥ सूत म्हणालेः-- या प्रमाणें स्कंदाचें भाषण ऐकून भगवान् शंकर हंसून बोलले ॥७४॥ शंकर म्हणालेः-- पूर्वी इंद्र वृत्रासुराचा वध करुन राज्यावर बसला त्याला ब्रह्महत्या लागली. तीचे शमनार्थ अश्वमेध केला ॥७५॥ तेव्हां इंद्रानें क्रोधानें त्या ब्रह्महत्येचे वज्रानें सहा भाग करुन पृथ्वीवर टाकिले ॥७६॥ ते सहा विभाग वृक्षावर, जलावर, भूमीवर, भ्रणघ्नावर, अग्नीवर, पडले ॥७७॥ श्रावणांतील द्वितीयेला स्त्री, वृक्ष, नदी, भूमि, अग्नि, भ्रूणघ्न हीं अशुद्ध झालीं म्हणून या द्वितीयेला कलुषा द्वितीया म्हणतात ॥७८॥ पूर्वी मधुकैटभ दैत्यांच्या रक्तानें पृथ्वी आठ अंगुळें भरल्यामुळें अपवित्र झाली. स्त्रियांचें रज हा मल आहे ॥७९॥ नद्या पर्जन्यकाळीं मलिन होतात. अग्नीचा वरचा धूर मल आहे. वृक्षांचा डिंक मल आहे. भ्रूणहत्त्या करणारांची संगती हा मल आहे ॥८०॥ या श्रावण द्वितीयेला हीं मलिन झालीं म्हणून हिला कलुषा म्हणतात. देव, ऋषि, पितर यांची व धर्माची निंदा करणारे नास्तिक शठ यांच्या वाणीच्या मलापासून भाद्रपद द्वितीयेला ती निर्मल झाली ॥८१॥ अनध्यायाचे दिवशीं जे पठण करितात दुसऱ्याला पढवितात असे सांख्यशास्त्री, तर्कशास्त्री व वैदिक यांच्या शब्दापशब्दांच्या मलापासून ती भाद्रपद द्वितीयेला निर्मल झाली ॥८२॥८३॥ तसेंच भाद्रपदमासीं कृष्ण जन्म झाल्यामुळें सर्व त्रैलोक्य पवित्र झालें म्हणून या भाद्रपदांतील द्वितीयेला निर्मला म्हणतात ॥८४॥ आश्विनमासींचे द्वितीयेला

आग्निष्वात्त, बर्हिषद, आज्यप, सोमप व पितर प्रेतरुपानें या द्वितीयेला संचार करितात म्हणून इला प्रेतसंचरा म्हणतात ॥८५॥ या तिथिला पुत्र, नातु, कन्येचे पुत्र हे स्वधा मंत्रांनी त्या पितरांचीं पूजा करितात ॥८६॥ श्राद्ध, दान यज्ञ करुन तृप्त करितात. म्हणून ही प्रेतसंचरा होय. महालयामध्यें पृथ्वीवर प्रेतांचा ( पितरांचा ) संचार दिसतो म्हणून आश्विनांतील द्वितीयेला प्रेतसंचरा म्हणतात ॥८७॥ कार्तिकांतील द्वितीयेचे दिवशीं यमाची पूजा करितात म्हणून तिला याम्यका म्हणतात असें मी खरें सांगतो ॥८८॥ कार्तिकशुद्ध द्वितीयेला दोन प्रहरच्या आंत यमाची पूजा करावी. त्या दिवशीं यमुनेमध्यें स्नान केलें असतां मनुष्य यमलोक पाहणार नाहीं ॥८९॥ पूर्वी यमुनेनें कार्तिक शुद्ध द्वितीयेला यमाला आपले घरी बोलावून त्याची पूजा करुन भोजनास घातलें ॥९०॥ नरकांतील सर्व पापी प्राणी मुक्त करुन सर्वांना भोजन देऊन तृप्त केलें. ते पापापासून व सर्व बंधांपासून मुक्त होऊन आपले मर्जीप्रमाणे जेवून संतुष्ट होऊन मोकळेपणें राहिले ॥९१॥९२॥ त्यांचा यमाच्या राज्यांत त्या दिवशीं सुखावह असा मोठा उत्सव झाला म्हणून ही यमद्वितीया नांवानें त्रैलोक्यांत प्रसिद्ध झाली ॥९३॥ या द्वितीयेला आपल्या घरांत जेवूं नये. प्रेमानें बहिणीच्या हातचें जेवावें. म्हणजे तें पुष्टिवर्धक होतें ॥९४॥ त्या दिवशीं बहिणींना अलंकार वस्त्रेम वगैरे देऊन त्यांची सत्कारपूर्वक पूजा करावी ॥९५॥ आपल्या सख्या बहिणीच्या हातचे भोजन करावें. इतर सर्व बहिणीचें हातचेंही जेवावें म्हणजे त्यापासून बलवृद्धि होते ॥९६॥ कार्तिक शुद्ध द्वितीयेला, पूजित व तृप्त असून रेड्यावर बसलेला, दंड मुद्गल घेतलेला, ज्याचे बरोबर आनंदित दूत आहेत अशाप्रकारच्या यमा, तुला नमस्कार असो ॥९७॥ ज्यांनीं आपल्या सुवासिनी भगिनीला, वस्त्र अलंकार देऊन संतुष्ट केलें, त्यांना वर्षभर कलह व शत्रु यांचे पासून भय नाहीं ॥९८॥ ही यमद्वितीयेची श्रेष्ठ, यश व आयुष्य देणारी, धर्म, काम, अर्थ साधणारी अशी गुप्त सुंदर कथा कार्तिकेया, तुला मीं सांगितली ॥९९॥ ज्या या द्वितीया तिथीला यमुनेनें यमराज देवाला प्रेमानें भोजन दिलें, त्या यमद्वितीयेला दरवर्षी आपल्या बहिणीच्या घरी जो भोजन करील, त्याला सर्व प्रकारचें शुभ, संपत्ति व द्रव्य होतात ॥१००॥ इति श्रीपद्मपुराणे कार्तिकमाहात्म्ये पंचत्रिंशोऽध्यायः ॥३५॥

## अध्याय ३६

कार्तिकेय प्रश्न करितातः -- हे भगवन् व्रतांमध्यें उत्तम व्रत जें कर्तिकांत मासोपवास करणें, याचा विधि व त्याचें यथोचित्त फल काय तें सांगा ॥१॥ मनुष्यांनी त्याचा विधि कसा करावा आरंभ कसा करावा, समाप्ति कशी करावी ॥२॥ त्याची मुदत किती दिवस वगैरे सर्व व्रत विस्तारानें मला सांगा ॥३॥ शंकर म्हणतातः-- हे भक्त श्रेष्ठा स्कंदा, तूं फार चांगलें विचारलेंस. तूं भक्तिमान् आहेस. तुला सांगतो श्रवण कर ॥४॥ ज्या प्रमाणें सर्व देवांत विष्णु श्रेष्ठ व ग्रहांमध्यें रवि, पर्वतांमध्यें जसा मेरु श्रेष्ठ, पक्ष्यांमध्यें जसा गरुड श्रेष्ठ ॥५॥ तीर्थांमध्येम जशी गंगा श्रेष्ठ, प्रजेमध्यें व्यापारी श्रेष्ठ, तसें सर्व व्रतांमध्यें मासोपवास व्रत श्रेष्ठ आहे. ॥६॥सर्व व्रतें, सर्व तीर्थे केल्याचें

व सर्व दानें दिल्यापासून जें पुन्य मिळतें तें सर्व, मास उपोषण कर्त्याला प्राप्त होतें ॥७॥ एक मासोपवासानें जें पुण्य मिळतें, तितकें पुष्कळ दक्षिणायुक्त अग्निष्टोमादि यज्ञापासूनही मिळत नाहीं ॥८॥ ज्यानें मासउपोषण केलें, त्यानें सर्व जप, होम, दानें, तपें व श्राद्धें केल्याप्रमाणें आहे ॥९॥ प्रथम विष्णु प्राप्तीच्या उद्देशानें संकल्प करावा. विष्णूचें पूजन करावें व गुरुची आज्ञा घेऊन मासोपवासाला आरंभ करावा ॥१०॥ द्वादशी आदिकरुन जीं विष्णूचीं व्रतें आहेत, ती अगोदर करावीं ॥११॥ तसेंच अतिकृच्छ्र, पाराक वगैरे प्रायश्चित्ते आपल्या शक्तीनुरुप प्रथम करावीं, नंतर मासोपवासव्रताला आरंभ करावा ॥१२॥ वानप्रस्थ, संन्यासी, विधवा स्त्री, यांनीं गुरु व ब्राह्मण यांची आज्ञा घेऊन मास उपोषण करावें ॥१३॥ आश्विन शुद्ध एकदशीला उपोषण करुन हें व्रत घ्यावें. तें तीस दिवसपर्यंत करावें ॥१४॥ सर्व कार्तिक महिना विष्णूची पूजा करुन उपोषण करावें, म्हणजे तो मोक्ष फलभागी होतो ॥१५॥ विष्णु मंदिरांत जाऊन त्रिकाळ भक्तींनें, इंदीवर, पद्म, कमळ इत्यादि कमळें, मालती व सुगंधीफुलांनी, केशर, वाळा, कापूर, चंदन मिश्रित गंधानें व धूप, दीप, नैवेद्य यांनीं पूजा करावी ॥१६॥१७॥ पुरुष स्त्रिया व विधवा, यांनीं मनानें, वाचेनें शरीरानें इंद्रियें जिंकून, भक्तिपूर्वक, गरुडध्वजाची पूजा करुन त्याच्या नामांनीं कीर्तन, गायन करावें. खोटें न बोलतां, विष्णूची रात्रंदिवस स्तुति करावी ॥१८॥१९॥ सर्व प्राणिमात्रांवर दया करणारा, हिंसा न करणारा, शांतवृत्ति असा राहून निजतांना किंवा आसनावर बसूनही भगवंताचे गुणानुवाद वर्णन करीत असावें ॥२०॥ अन्नाचा स्वाद, अगर घास घेणें, स्मरण करणें, पहाणें, वर्णन वगैरे सर्व वज्य करावें ॥२१॥ अंगाला मस्तकाला तेल लावणें, विडा खाणें, गंधाची उटी लावणें, हें सर्व व इतर सर्व निषिद्ध, व्रत करणारानें वर्ज्य करावें ॥२२॥ व्रतस्थानें कोणा विकर्म्याला शिवूं नये. व्रत मोडेल म्हणून कोणाबरोबर कोठें जाऊं नये. देवालयांत राहून गृहस्थानें व्रत आचरण करावें ॥२३॥ यथाविधि पुरुष, सुवासिनी, विधवा, साध्वी स्त्रिया, यांनीं महिनाभर उपोषण करुन भगवान् वासुदेवाची पूजा करावी ॥२४॥ इंद्रियें जिंकून मन स्वाधीन ठेवून कमी अगर अधिक न करितां तीस दिवस उपोषण करावें ॥२५॥ नंतर द्वादशीला विष्णूची पूजा करावी. गंध, माळा, धूप, दीप, विलेपन, वस्त्र, अलंकार, वाद्यें, यांनीं देवाला संतुष्ट करावें. चंदनयुक्त पाण्यानें स्नान घालावें. चंदनानें आंगाला लेप करावा. सुवासिक पुष्पें वाहवी. ब्राह्मणांना वस्त्रें देऊन भोजन घालावे ॥२६॥२७॥२८॥ त्यांना दक्षिणा देऊन नमस्कार करुन त्यांची प्रार्थना करावी. याप्रमाणें ब्राह्मणांची पूजा करुन पाठवणी करावी ॥२९॥ ज्या प्रमाणें द्रव्य असेल त्याप्रमाणें भक्तिपूर्वक उपोषण करुन विष्णुपूजा करुन ब्राह्मणभोजन घालावें, म्हणजे तो विष्णुलोकीं आनंदांत राहतो. याप्रमाणें एक मास उपवास झाल्यानंतर उद्यापनाकरितां एकादशीला उपोषण करुन तेरा ब्राह्मण ऋत्विज करुन त्यांच्यावर हवन यज्ञ सोपवावा ॥३०॥३१॥३२॥ असा वैष्णव यज्ञ पूर्ण केल्यावर गुरुची आज्ञा घेऊन हरीची पूजा करावी. गुरुची पूजा करुन नमस्कार करावा. शुद्ध कुळांतले चांगल्या आचरणाचे भक्तीनें विष्णुपूजन करणारे असे ब्राह्मण बोलवून नमस्कार करुन त्यांना भोजन घालावें ॥३३॥३४॥ अशा तेरा ब्राह्मणांना व इतरांना भोजन घातल्यावर त्यांना विडे, दोन दोन वस्त्रें, यज्ञोपवीतें, दक्षिणा, योगपट्ट सूत्रें देऊन त्या द्विजश्रेष्ठांना नमस्कार करावे ॥३५॥३६॥ नंतर एक शय्या तयार करावी. तीवर अभ्रा,

उश्या, गिरद्या वगैरे घालून उत्तम सुशोभित करावी. शक्तीप्रमाणें सुवर्णाची आत्ममुर्ति करुन त्या शय्येवर ठेवून मालादिक घालून पूजन करावें ॥३७॥३८॥ आसन, पादुका, छत्र, दोन वस्त्रें, जोडा व उत्तम पुष्पें हें सर्व त्या शय्येवर ठेवावें ॥३९॥ याप्रमाणें शय्या तयार करुन दान करावी. त्या मंडपांत असलेल्या सर्व ब्राह्मणांस नमस्कार करुन प्रार्थना करावी; आपले कृपेनें विष्णूचें स्थान जो वैकुंठ तेथें मी गमन करीन, असें म्हणावें, म्हणजे तो वैकुंठाला जातो ॥४०॥४१॥ मंत्र, कर्म, भक्ति यांवांचून जें जें कांहीं घडलें असेल तें सर्व हे द्विजोत्तमहो ! आपल्या वचनानें संपूर्ण व्हावें, अशी ब्राह्मणांची प्रार्थना करावी. हे स्कंदा ! याप्रमाणें कार्तिकमासउपोषणाचा विधि सांगितला आहे तो मी तुला सांगितला ॥४२॥ इति श्रीकार्तिकमाहात्म्ये षटत्रिंशोऽध्यायः ॥३६॥

## अध्याय ३७

शंकर म्हणालेः-- स्कंदा, प्रबोधिनीचे माहात्म्य पाप - नाशकर पुण्य वाढविणारे व तत्त्वज्ञान्याला मुक्ती देणारें आहे, ते श्रवण कर ॥१॥ कार्तिकांतील हरिबोधिनी जोंपर्यंत आली नाहीं तो पर्यंतच भागीरथी पृथ्वीवर पवित्रतेची गर्जना करील ॥२॥ विष्णुप्रिया हरिबोधिनी एकादशी येईपर्यंतच समुद्रसहित सर्व तीर्थे पवित्रतेचीं गर्जना करितील ॥३॥ प्रबोधिनी एकादशीचें एक उपोषण केलें असतां हजार अश्वमेध केल्याचें व शंभर राजसूय यज्ञ केल्याचें पुण्य प्राप्त होतें ॥४॥ या चराचर त्रैलोक्यांत जें दुर्लभ व कठिण असेल, तें सर्व इच्छिलें असतां प्रबोधिनी व्रत प्राप्त करुन देतें ॥५॥प्रबोधिनीचा सहज उपास केला तरी ऐश्वर्य, संतति, ज्ञान, राज्य, सुखसंपत्ति हीं प्राप्त होतात ॥६॥ मेरुमंदर पर्वताएवढी जरी पातकें घडलीं असलीं, तरी एका प्रबोधिनेच्या उपवासानें तीं सर्व नष्ट होतात ॥७॥ प्रबोधिनीचा उपवास समजून जो यथाविधि करील त्याला यथोक्त संपूर्ण फल मिळतें ॥८॥प्रबोधिनीला जागरण केलें असतां पूर्वीच्या हजार जन्मांत जें पातक घडलें असेल, तें सर्व कापसाच्या राशीप्रमाणें सहज जळून जातें ॥९॥ हे स्कंदा ! तुला जागराचें लक्षण सांगतों ऐक. जें समजलें असतां विष्णूची प्राप्ति दुर्लभ नाहीं ॥१०॥ जागरांत गायन, वाद्यें, नाचणें, पुराण वाचणें, धूप, दीप, नैवेद्य, गंध, फुलें , अर्घ्य फल अर्पण करणें ॥११॥ श्रद्धापूर्वक दान, इंद्रियनिग्रह, सत्यभाषण, झोंप न घेणें, आनंदयुक्त असणें इत्यादि क्रियायुक्त असणें ॥१२॥ आश्चर्य व उत्साहयुक्त मन असून आलस्यरहित राहून प्रदक्षिणा नमस्कार करणें ॥१३॥ हरीला प्रहरा उत्साहित अत करणानें ओंवाळून आरती करणें ॥१४॥ अशा सर्व उपचारांनीं युक्त एकग्रमनानें जागरण करावें, म्हणजे त्याला पुन्हा पृथ्वीवर जन्म प्राप्त होणार नाहीं ॥१५॥ शक्तीप्रमाणें द्रव्य खर्च करुन भक्तीनें हरिजागर करितो, तो परमात्याचे सायुज्य मुक्तीला जातो ॥१६॥ जो कार्तिक महिन्यांत पुरुषसूक्तानें नित्य हरीची पूजा करितो, त्यानें हजारकोटी वर्षे विष्णूची पूजा केल्याप्रमाणे आहे ॥१७॥ नारदपंचरात्रांत सांगितलेल्या विधानाप्रमाणे जो कार्तिकांत नित्य पूजा करील त्याला मुक्ति प्राप्त होते ॥१८॥ कार्तिकांत " नमो नारायण " या मंत्रानें जो नित्य पूजा करील तो नरकाचे दुःखा पासून मुक्त होऊन, नित्य अविनाशी अशा वैकुंठस्थानाला जातो

॥१९॥ जो कार्तिकांत विष्णुसहस्रनाम व गजेंद्रमोक्ष नित्य पठण करील, त्याला पुनः जन्म प्राप्त होणार नाहीं ॥२०॥ कार्तिकांत द्वादशीला जो जागर करितो तो हजार कोटी युगें व शंभर मन्वंतरें होईपर्यंत स्वर्गांत वास करील ॥२१॥ हरिजागर करणाऱ्याच्या शंभर कुलांमध्यें जे हजारों मनुष्य जन्मास येतील त्यांनाही वैकुंठप्राप्ति होईल, म्हणून जागर अवश्य करावा ॥२२॥ कार्तिकांत रात्रीं शेवटच्या प्रहरीं जे हरीचें स्तवन, गायन करितील, ते आपल्या पितरांसह श्वेतद्विपांत राहतील ॥२३॥ पूर्वरात्रीं जे हरीला नैवेद्य अर्पण करितील, ते अनंतयुगे स्वर्गांत राहतील ॥२४॥ हे ऋषीहो, जे मालती व कमळें यांनी देवदेवेश विष्णूची नित्य पूजा करितात, त्यांना उत्तम पद प्राप्त होते ॥२५॥ कार्तिकशुक्ल एकादशीला उपोषण करुन द्वादशीला सकाळीं उत्तम प्रकारचे कुंभ उदक भरुन दान द्यावे म्हणजे त्याला माझ्या वैकुंठाची प्राप्ति होईल ॥२६॥ कार्तिकेय म्हणतातः-- शंकरा, आपण सांगितलें कीं, कार्तिकव्रतांमध्यें उत्तम असें भीष्मपंचक व्रत करावें ॥२७॥ तर हे मुनिश्रेष्ठा शंकरा ! त्याचें विधान काय व तें केल्याचे फल काय तें कृपा करुन सांगावें ॥२८॥ ईश्वर म्हणालेः-- महापुण्यकारक सर्व व्रतांत श्रेष्ठ असें पांच दिवसांचें हे भीष्मपंचक व्रत सांगतों ॥२९॥ हें व्रत भीष्माला वासुदेवापासून मिळालें, म्हणून या व्रताला भीष्मपंचक म्हणतात. याचा महिमा केशवाशिवाय वर्णन करण्याला कोण समर्थ आहे ॥३०॥ कार्तिक शुक्लपक्षांतील पुरातनधर्मरुप हे भीष्मपंचक व्रत कृतयुगांत वसिष्ठ, भृगु, गर्ग इत्यादि ऋषींनी आचरिले आहे ॥३१॥ त्रेतायुगांत अंबरीषादिकांनी आचरिलेलें ब्राह्मणांनी ब्रह्मचर्यांचा नेम करुन व होम करुन आचरिलेले ॥३२॥ सत्य व शुद्ध आचरण करणारे क्षत्रिय, वैश्य यांनी आचरिलेले असें आहे. हे व्रत सत्यहीन मूर्ख बुद्धिचे लोकांना घडणें कठीण आहे ॥३३॥ भीष्म म्हणजे करण्याला कठीण असे हें व्रत प्राकृत जनांला घडणें कठीण आहे; याकरितां जो हें करील, त्यानें सर्व व्रतें केल्याप्रमाणें आहे ॥३४॥ हें भीष्मपंचक व्रत मोठें पुण्यकारक व सर्व पापें नाहीसें करणारें आहे, म्हणून मनुष्यांनी मोठ्या प्रयत्नानी करावे ॥३५॥ कार्तिकशुक्लपक्षामध्यें एकादशीला यथाविधि प्रातः स्नान करुन पांच दिवसांचें भीष्मपंचकव्रत ग्रहन करावे ॥३६॥ व्रत घेणारानें प्रातः स्नान करुन दोन प्रहरीं पुनः गाईचे शेण अंगाला लावून नदी, झरा अगर विहीर यांत स्नान करावें. उत्तम प्रकारें यवांनी देवांचे, तांदुळांनी ऋषीचें व तिळांनीं पितराचें तर्पण करावें. स्नान केल्यावर बोलूं नये. धुतलेली स्वच्छ वस्त्रें नेसावी व पांघरावीं ॥३७॥३८॥ भीष्माचें तर्पण करावें. अर्घ्य द्यावें. भीष्माची पूजा करुन दानें द्यावीं ॥३९॥ विशेषेंकरुन ब्राह्मणाला पंचरत्नें द्यावीं. लक्ष्मीसह वासुदेवाची पूजा करावी ॥४०॥ अशी पांच दिवस पूजा केली असतां कोटि जन्म सुख मिळतें ॥४१॥ हें व्रत केल्यानें एक वर्षांतील सर्व व्रतांचें फल प्राप्त होतें. भीष्माचें पुढील मंत्रानें तर्पण करावें. अर्घ्यदान करावें म्हणजे मुक्ति मिळते ॥४२॥ मंत्रार्थः -- " ज्याचें गोत्र वैयाघ्रपाद, प्रवर सांकृत्य व ज्याला अपत्य नाहीं, त्या भीष्माला उदक देतों " ॥४३॥ वसूंचा अवतार, शंतनूचा पुत्र, आजन्म ब्रह्मचारी असणाऱ्या अशा भीष्माला मी अर्घ्य देतो " ॥४४॥ अशा विधीनें जो भीष्मपंचकव्रत समाप्त करील, त्याला अश्वमेध यज्ञाचें पुण्य मिळतें ॥४५॥ याप्रमाणें यत्नानें पांच दिवस व्रत करावें. या महिन्यांत नियमावांचून राहूं नये ॥४६॥ उत्तरायण नसतांनाही हरीनीं भीष्माला हे पांच दिवस दिले. हे पांच दिवस शुभ आहेत. या पांच

दिवसांत लग्नशुद्धि शुभवेळा पाहण्याचें कारण नाहीं ॥४७॥ प्रथम सर्व पापें नाहींशी करुन मोक्ष देणाऱ्या हरीची पूजा यत्नानें करावी. नंतर भीष्मपंककव्रतविधि करावा ॥४८॥ श्रीकृष्णाला उदकानें दूध, दहीं, मध, तूप, साखर या पंचामृतानें स्नान घालावें. नंतर सुवासिक गंधाच्या पाण्याने स्नान घालावें. ॥४९॥ नंतर चंदन, केशर, कापूर, वाळा यांचें गंध करुन तें गरुडध्वजाचें अंगाला लावावें ॥५०॥ नंतर भक्तीनें सुंदर सुवासिक पुष्पें वाहून गुग्गुळ तूप मिश्रित सुगंधी धूप दाखवावा ॥५१॥ पांच दिवस सारखा नंदादीप ठेवावा. खीर व पक्कान्नांचा नैवेद्य अर्पण करावा ॥५२॥ याप्रमाणें विष्णूचें पूजन करुन नामस्मरण करीत नमस्कार घालावे. ' ॐ नमो भगवते वासुदेवाय ' असा एकशें आठ वेळा जप करावा ॥५३॥ धृत, तीळ, तांदूळ, यव, यांनी सहा अक्षरांच्या कृष्णमंत्रानें होम करावा ॥५४॥संध्याकाळची सध्या करुन गरुडध्वज भगवंताला नमस्कार करावा. पुन्हा मंत्र जपून भूमीवर निजावें ॥५५॥ याप्रमाणें पांच दिवस करावें. या व्रतांत ज्या योगानें व्रत पूर्ण होतें असें विशेष आहे तें ऐक ॥५६॥ व्रत करणाऱ्यानें पहिले दिवशीं कमळांनीं देवाचे पायांची पूजा करावी; दुसरे दिवशी बेलाच्या पानांनी गुडघ्यांनी पूजा करावी ॥५७॥ नंतर पुढें मालतीनें देवाच्या मस्तकावर पूजा करावी. याप्रमाणें कार्तिकांत मोठ्या भक्तीनें हरीकडे अंतःकरण ठेवून त्याची पूजा करावी ॥५८॥ एकादशीला पूजा करुन गोमय ( गाईचें शेण ) प्राशन करुन उपवास करावा ॥५९॥ द्वादशीला गोमूत्र मंत्रयुक्त प्राशन करावें, त्रयोदशीला दूध प्यावें व चतुर्दशीला दहीं प्यावें ॥६०॥ देहशुद्धीकरितां याप्रमाणें प्राशन करुन चार दिवस उपवास करावा; पांचवेदिवशीं स्नान करुन यथाविधि देवाची पूजा करावी ॥६१॥ ब्राह्मणाला भोजन घालून दक्षिणा द्यावी, पापबुद्धि टाकून बुद्धिमंतांनी ब्रह्मचर्यानें रहावें ॥६२॥ मद्य, मांस, पापकारी मैथुन वर्ज्य करावें. भाजीपाल्यांचा आहार करुन कृष्णपूजेंत तत्पर असावें ॥६३॥ पंचगव्य घेऊन संध्याकाळी भोजन करावें. याप्रमाणें व्रताची समाप्ति करणाराला संपूर्ण फल मिळतें ॥६४॥ जन्मापासून मरेपर्यंत दारु पिणारा असला तरी हें भीष्मपंचक केलें असतां तो मोक्षास जातो ॥६५॥ बायकांनींही नवऱ्याचे आज्ञेनें हें धर्म वाढविणारे व्रत करावें म्हणजे धर्मवृद्धि होते. विधवांनीं केले असता मोक्ष व सुख प्राप्त होतें ॥६६॥ हे स्कंदा ! कार्तिकांत नित्यस्नान, दान, उपवास केल्यानें सर्वकर्मसमृद्धि, पुण्य व अर्थ प्राप्त होतात ॥६७॥ विष्णुभक्तांनी वैश्वदेव करावा, म्हणजे आरोग्य व पुत्रप्राप्ति होऊन महापातक नाहींसे होतें ॥६८॥ कार्तिकव्रताची समाप्ति प्रयत्नानें तीर्थाचे ठिकाणीं करावी. सर्व संवत्सरव्रतांची समाप्ति कार्तिकांत करावी ॥६९॥ एक सोन्याची पापाची प्रतिमा भयंकर सुखाची अशी करावी, जिच्या हातांत खड्ग, लोहाच्या दाढांनी भयंकर, काळीं वस्त्रे गुंडाळलेली, अशी एक शेर तिळांच्या ढिगावर ठेवावी ॥७०॥ तांबड्या फूलांच्या तुरा व सोन्याची झगझगीत कुंडले घालून तिची भक्तीनें यमधर्माच्या नांवानें पूजा करावी ॥७१॥ ओंजळीत फुलें घेऊन पुढील मंत्रांनीं प्रार्थना करावी. " मी पूर्वजन्मीं व या जन्मीं जें पातक केलें असेल तें तुझ्या पायाच्या प्रसादानें नाहीसें होवो." याप्रमाणे विधिपूर्वक पूजा करुन ती सोन्याची प्रतिमा ॥७२॥७३॥ सर्व दुःखाचा परिहार करणारा भगवान् श्रीकृष्ण याच्या संतोषाकरितां वैदिक ब्राह्मणाची पूजा करुन ॥७४॥ मंत्र पूजा सांगणाऱ्या ब्राह्मणाला यथाशक्ति दक्षिणा देऊन, धर्म प्रसन्न होवो, असें म्हणून दान करावी ॥७५॥ सोनें व गाय वाचक ब्राह्मणाला

देऊन श्रीकृष्णाला अर्पण असो असें म्हणावें. याप्रमाणें सर्व कृत्य झाल्यावर विरक्त जितेंद्रिय होऊन स्वस्थ असावें ॥७६॥ इतरांनाही शक्तीप्रमाणें दानें करावी. त्या योगानें शांतचित्त व निरोगी होऊन मनुष्य उत्तमपदाला जातो ॥७७॥ नीलकमलाप्रमाणें शामवर्ण ज्याला चार दाढा, चार भुज, आठ पाय, ज्यास एक डोळा, शंकूसारखे कान व मोठा आवाज मस्तकाला जटा, दोन जिभा, लाल डोळे, सिंहासारखें रुप धारण करणाऱ्या नरहरीचें चिंतन करावें ॥७८॥७९॥ शरपंजरीं असतांना भीष्मानें याप्रमाणें मला सांगितलें हें करण्यास कठीण असें भीष्मपंचक व्रत मी तुला सांगितलें ॥८०॥ धर्मराजा ! हें धन्य, पुण्य कारक, पाप घालविणारें, मोठें व्रत आहे. हें केलें असतां ब्रह्महत्या व गोहत्या करणारे देखील पापापासून मुक्त होतात ॥८१। एकादशीपासून पौर्णिमेपर्यंत पांच दिवसांचें हें भीष्मपंचक व्रत पृथ्वीवर प्रसिद्ध असलेलें सांगितले. भोजन करणाराला याचा निषेध आहे. तें व्रत करणाराला विष्णु शुभ फळ देतात ॥८२॥ सूत म्हणालेः-- हें व्रत सर्वापेक्षां अधिक पुण्य देणारें, कलीमध्यें दुर्लभ असें आहे. शस्त्रांतील सार व गुह्य हें व्रत मी तुम्हाला सांगितलें ॥८३॥ देवांना देखील माहीत नाहीं, असें गुप्त गुह्य असून मोक्ष देणारें असें आहे; हें ऐकले असतां अगम्य स्त्रियांशीं रत होणारे, कन्येचा व बहिणीचा विक्रय करणारे हे सर्व दोषमुक्त होतात. मोक्ष देणारें हें शास्त्र इतर लोकांना उघड करुन सांगूं नये ॥८४॥८५॥हें एक समयीं ऐकिलें असतां मनुष्याला मोक्ष मिळतो. जे अधर्मी आहेत त्यांपासून हें गुप्त ठेवावें ॥८६॥ षण्मुखा, त्यांना हें पुण्यव्रत खचित सांगूं नये. याप्रमाणें हें सर्व तुला कार्तिकाचें फल सांगितलें ॥८७॥ विष्णु म्हणालेः-- शंकरांनी कार्तिकेयाला सर्वांच्या कल्याणाचे इच्छेनें ही कथा सांगितलीं. पित्यानें सांगितलेली कथा ऐकून षडाननाला फार आनंद झाला ॥८८॥ सर्व जण हात जोडून जगच्चालक शंकराला म्हणाले, आम्ही कार्तिकाचें माहात्म्य ऐकून कृतकृत्य झालों ॥८९॥ आतां दुसरें कांहीं ऐकावयाचें राहिले नाहीं. आमचे जन्म सफल झालें. हें माहात्म्य ऐकून पुराण वाचणाराची पूजा करावी ॥९०॥ तो विष्णुतुल्य आहे असें समजून त्याला गाय, जमीन, सोनें, वस्त्रें, द्यावी, त्याची पूजा केली असतां विष्णूची पूजा केल्याचे फल आहे ॥९१॥ म्हणून ज्याला शुभदायक फलप्राप्ति व्हावी अशी इच्छा असेल त्यानें त्या वाचकाची नित्य पूजा करावी ॥ धर्मेच्छूंनीं पुराण सांगणारांना धर्मशास्त्र, पुराण, वेदविद्या इत्यादि पुस्तकें दान करावीं. पुराणविद्या दान करणाराला अनंत फल मिळतें ॥९२॥९३॥ हें माहात्म्य जे पठण करतील व भक्तीनें ऐकून ध्यानांत ठेवितील, ते सर्व पापांपासून मुक्त होऊन विष्णुलोकास जातील ॥९४॥ माहात्म्य श्रवणापासून धन, धान्य, यश, पुत्र, आरोग्य हीं निःसंशय प्राप्त होतात ॥९५॥ सूत म्हणालेः-- कृष्णाचा व सत्यभामेचा संवाद, तसाच नारदाचा व पृथुराजाचा संवाद तुम्हांला सांगितला. आणखी कांहीं विचारण्याची इच्छा असल्यास प्रश्न करा, मी विस्तारानें कथन करितों ॥९६॥ हें सूताचें भाषण ऐकून सर्व ऋषि आनंद पावले व एकमेकांशीं कांहीं न बोलतां स्वस्थ राहिले ॥९७॥ व सर्व शांत मनानें बदरीनारायणाचे दर्शनाकरितां निघून गेले ॥९८॥ इति श्रीपद्मपुराणे उत्तरखण्डे कार्तिकमाहात्म्ये श्रीकृष्णसत्यभामासंवादे सप्तत्रिंशोऽध्यायः ॥३७॥ इति कार्तिकमाहात्म्यं संपूर्णम् ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥